सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २४३ | पाने : ४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाचा मार्ग मोकळा!

## एकनाथ शिंदेनी घेतली माघार, अडीच वर्षे संधी दिल्याबद्दल मोदी- शाह यांचे मानले आभार

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई, दि.२७ नोव्हेंबर: प्रचंड बहुमत असतानाही राज्य सरकार स्थापन करण्यात महायुतीला येत असलेला अडथळा आता दूर झाला आहे. निवडणुकीचा निकाल लागल्यापासून मुख्यमंत्री पदासाठी आग्रही असलेल्या एकनाथ शिंदे यांनी आता या शर्यतीतून माघार घेतली आहे. भाजपाचे दिल्लीतील श्रेष्ठी मुख्यमंत्री पदासाठी जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल, असे त्यांनी बुधवारी जाहीर केले. त्याचबरोबर गेल्या अडीच वर्षाच्या काळात आपल्याला कंपनी केलेल्या दिलेल्या खंबीर पाठबळाबद्दल पंतप्रधान मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे जाहीर आभार मानले.

राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यभार पाहत असलेल्या शिंदे यांनी आज ठाण्यातील आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेत याबद्दलची भूमिका जाहीर केली. मोदी व शाहा यांना काल रात्री फोन करून आपली भूमिका स्पष्ट केली असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे भाजपाचाच मुख्यमंत्री होणार व देवेंद्र फडणवीस हे पुन्हा महायुती सरकार-२ प्रमुख होणार हे आता निश्चित झाले आहे.

विधानसभा निवडणुकी तब्बल २३६ जागा जिंकूनही महायुतीकडून गेली चार दिवस मुख्यमंत्रीपदाचे चेहरा जाहीर करण्यात आलेला नाही. शिंदे हे पुन्हा मुख्यमंत्री बनण्यासाठी इच्छुक असल्याने त्यामध्ये अडसर होता. त्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न भाजपा श्रेष्ठीकडून सुरू होती. त्यातून देवेंद्र फडणवीस यांच्याशी त्यांचा दुरावा झाल्याचेही दोन दिवसापासून देहबोलीतून जाणवत होते .त्यामुळे सत्ता स्थापनेच्या नाट्याचा शेवट कसा होईल? याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता लागून राहिलेली असताना आज दुपारी एकनाथ शिंदे यांनी आपली भूमिका जाहीर केली. ते म्हणाले की, आपण कोणावरही नाराज नव्हतो. माध्यमामधून काहीही चालवलं जात होते. आम्ही महायुती म्हणून एक असून यापुढेही एक राहून महाराष्ट्राच्या गतिशील विकासासाठी कार्यरत राहणार आहे. घरी अडीच वर्ष मी स्वतःला सीएम म्हणजे कॉमन मॅन समजून कार्यरत राहिलो सर्वसामान्य जनतेच्यात मिसळून त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. सामान्य जनतेसाठी महाराष्ट्राचे सरकार जे काही करता येणे शक्य आहे ते करत राहिलो. त्यातून सर्वसामान्य लोकांसाठी लाडके बहिण, लाडके भाऊ लाडके शेतकरी लाडके जेष्ठ नागरिक या सर्वांसाठी योजना राबविल्या. परिवारातील प्रत्येक सदस्याला सरकारच्यावतीने काहीतरी देण्याचा प्रयत्न केला . त्याची पोचपावती म्हणून नागरिकांनी आम्हाला भरघोस मतांनी निवडून दिले त्यांच्यामुळे ऐतिहासिक विजय महायुतीला साध्य करता आला. असे सांगून ते म्हणाले की, अडीच वर्षाच्या काळात मी समाधानी आहे.

### लाडका भाऊ ही ओळख महत्त्वाची : शिंदे

मी सर्वसामान्य कुटुंबातून आलो असल्याने महिलांना भगिनींना काय समस्या उद्भवतात याची जाणीव होती त्यामुळेच आपण लाडके बहीण व लाडका भाऊ योजना राबवून सर्वसामान्यांना हातभार लावण्यास प्रयत्न केला त्यातून भगिनींनी दिलेली लाडकी बहीण लाडका भाऊ हा सन्मान मुख्यमंत्री पदापेक्षा मला महत्त्वाचा व समाधानकारक वाटतो, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### सरकारच्या फॉर्मुल्याबाबत आज दिल्लीत बैठक

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदावरून आपला दावा बाजूला केल्याने सरकार स्थापनेतील हालचाली वेगावल्या आहेत. गुरुवारी महायुतीतील तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते दिल्लीला जाणारा असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेणार आहेत. त्यामध्ये मुख्यमंत्री पदाचे नाव घोषित करण्याबरोबरच कोणत्या पक्षाला किती मंत्रीपद व कोणते खाते दिले जाईल, याबाबत निश्चिती करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ठाकरे गट स्वबळावर लढणार

### बैठकीत पदाधिकाऱ्यांची मागणी

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२७ नोव्हेंबर : विधानसभा निवडणुकीत दारुण पराभवाला सामोरे जावे लागलेल्या महाविकास आघाडीतही आता सारे काही अलबेल नसल्याचे स्पष्ट होत आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने बोलावलेल्या बैठकीत पराभवाला घटक पक्ष ही जबाबदार असल्याचे सांगत यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्यात , अशी मागणी काही नेत्यांनी केली आहे. विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ही काही कार्यकर्त्यांची भावना असून त्याबाबत पक्षप्रमुखांनी कोणताही भूमिका जाहीर केली नसल्याचे स्पष्ट केले. उद्धव ठाकरे यांनी बोलवलेल्या उमेदवारांच्या बैठकीत अनेकांनी पुढील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वतंत्रपणे लढविण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

विधानसभा निवडणुका महायुतीने प्रचंड बहुमताने जिंकल्याने त्यांचा आत्मविश्वास प्रचंड दुणावला आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून रेंगाळलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाचे बिगुल येत्या काही महिन्यात वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे, येणाऱ्या निवडणुका महाविकास आघाडीत न लढता स्वतंत्र स्वबळावर लढल्या पाहिजेत, अशा प्रकारचा सूर शिवसेना ठाकरे गटातील काही पराभूत उमेदवारांनी व्यक्त केला आहे. उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी बोलवलेल्या पराभूत उमेदवारांच्या बैठकीत ईव्हीएम गोंधळाच्या मुद्द्यासोबतच पराभूत उमेदवारांनी स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा मुद्दा देखील पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासमोर मांडला. आघाडीमध्ये निवडणूक लढवून फारसा फायदा विधानसभेला झाला नसल्याचे काही पराभूत उमेदवारांचे म्हणणे आहे. मात्र, यावर कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आला नाही, पक्षप्रमुखांनी केवळ त्यांचे म्हणणं ऐकून घेतले. असे अंबादास दानवे यांनी सांगितले. आमच्या पराभूत उमेदवारांची बैठक झाली. जिंकलेल्या उमेदवारांच्या पण अनेक तक्रारी होत्या, अनेकांच्या तक्रारी समोर येत आहेत. मतांमध्ये देखील अनेक तफावत आहेत. या सगळ्या गोष्टींचा विचार केला तर कुठेतरी पाणी मुरतंय हे स्पष्ट होतय. ईव्हीएममध्ये पाणी मुरत आहे, असा आरोप त्यांनी केला.

# राष्ट्रवादीचे नेते पंतप्रधान मोदी, अमित शहांच्या भेटीला



नवी दिल्ली: राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. राज्यातील महायुतीच्या विजयानंतर या दोन्ही भेटी केवळ अभिनंदनासाठी होत्या, असे सुनील तटकरे यांनी सांगितले.

संसद परिसरात झालेल्या या भेटींसदर्भात तटकरे म्हणाले की, राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढे मोठे यश एखाद्या युतीला मिळाले. तसेच आम्ही महायुतीचा भाग झाल्यापासून अमित शाह यांचे सातत्याने मार्गदर्शन, सहकार्य आहे. त्यामुळे आभार व्यक्त करण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भेट झाली. अमित शाह हे भाजपचे नेते आहेतच मात्र महायुतीचेही नेते आहेत. योगायोगाने संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट झाली. त्यांचेही आभार व्यक्त केले आणि अभिनंदन केले. राज्यातील जनतेने जे यश आम्हाला दिले त्यात पंतप्रधान मोदींचा मोठा वाटा आहे, असेही तटकरे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पदाबाबत बोलताना तटकरे म्हणाले की, कोणाचे नाव ठरले याबद्दल मला माहिती नाही. आमची भेट केवळ सदिच्छा भेट होती. आमच्या पक्षाने विधिमंडळ पक्षनेते म्हणून अजित पवारांची निवड केली आणि मंत्रिमंडळाबद्दल किंवा सरकारबद्दल निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अजित पवारांना दिले. तसेच तीन पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करत आहेत, त्यामुळे सरकार स्थापनेला थोडा वेळ लागत आहे.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य बँकेचा केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते गौरव

नवी दिल्ली : नवी दिल्ली येथील भारत मंडपमच्या भव्य सभागृहात नॅफस्कॉबच्या रजत जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या देखण्या कार्यक्रमात देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या राज्य सहकारी बँका, जिल्हा सहकारी बँका आणि विविध कार्यकारी संस्थांमधून उत्कृष्ट कामगिरी करणा-या संस्थांना देशाचे गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते गौरविण्यात आले. त्यावेळी व्यासपिठावर सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व कृष्णपाल गुजर, एन.सी.यु.आयचे अध्यक्ष दिलीप संघानी, नॅफस्कॉबचे अध्यक्ष रविंद्रन राव आणि केंद्रीय सहकार खात्याचे मुख्य सचिव



आशिषकुमार भुतानी हजर होते.

राज्य सहकारी बँकांच्या प्रवर्गात महाराष्ट्र राज्याची शिखर बँक असलेल्या दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल अमित शहा यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. राज्य बँकेच्यावतीने मा.प्रशासक विद्याधर अनास्कर व व्यवस्थापकीय संचालक दिलीप दिघे यांनी अमित शाह यांच्या हस्ते सन्मान चिन्ह स्वीकारले.

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक ही संपूर्ण भारतात सर्वात जास्त ऊलाढाल, नेटवर्थ व निव्वळ नफा कमाविणारी राज्य सहकारी बँक आहे. दिनांक ३१ मार्च २०२४ अखेर राज्य बँकेची ऊलाढाल रु.७,२६५ कोटी, स्व-निधी रु.७,१२१ कोटी, नक्त नफा रु.६१५ कोटी, नेटवर्थ रु.४,६१८ कोटी इतके आहे.

राज्य सहकारी बँकेने भांडवल पर्याप्तता व इतर सर्वच आर्थिक आघाड्यांवर रिझर्व्ह बँकेचे आदर्श प्रमाण व राष्ट्रीय सरासरी मानांकनापेक्षा सरस कामगिरी केली आहे. याप्रसंगी बोलताना केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सहकारी आर्थिक संस्थांच्या सक्षमीकरणासाठी ऋसहकारांतर्गत सहकार' हे सहकाराचे मुलभूत तत्व राबविण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. तसेच सहकाराच्या या तत्वानुसार सर्व प्राथमिक सहकारी संस्थांनी आपल्या ठेवी संबंधित जिल्हा बँकांमध्ये व सर्व जिल्हा बँकांनी आपल्या ठेवी संबंधित राज्याच्या शिखर बँकेतच ठेवण्याचे आवाहन केले. या संदर्भात गुजरातमधील दोन जिल्हयांचे उदाहरण देताना या तत्वाचे पालन केल्याने तेथील जिल्हा व राज्य बँकेच्या ठेवींमध्ये २० टक्केची वाढ झाल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले व सर्वांनी गुजरातमधील या संबंधित बँकांना भेट देण्याचे निमंत्रण दिले.

### सायबर फसवणुकीमुळे भारताला ९ महिन्यात ११ हजार कोटींचे नुकसान

नवी दिल्ली : सायबर गुन्हेगार गेल्या काही दिवसांपासून नवीन पद्धतीने लोकांची फसवणूक करत आहेत. याविषयी कल्पना नसल्यामुळे आतापर्यंत अनेक जण या फसवणुकीला बळी पडले आहेत. भारतामध्ये सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. २०२४ च्या पहिल्या ९ महिन्यात सायबर फसवणुकीमुळे भारताला अंदाजे ११,३३३ कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे, अशी धक्कादायक माहिती भारतीय सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरने दिली आहे.

सायबर गुन्हेगारांनी आपल्या फसवणुकीच्या पद्धतीत चांगलीच प्रगती केली आहे. नवीन पद्धती, ज्या 'डिजिटल अरेस्ट' म्हणून ओळखल्या जातात, त्या इंटरनेट आणि डिजिटल सेवा वापरणाऱ्या नागरिकांना लक्ष्य करतात. यामध्ये, सायबर गुन्हेगार नागरिकांना कायद्याच्या नावावर आणि 'डिजिटल अरेस्ट' होईल अशी भीती दाखवून त्यांच्या बँक खाते किंवा इतर वैयक्तिक माहिती चोरतात. या प्रकाराच्या फसवणुकीत गुन्हेगार एक बनावट कॉल किंवा संदेश पाठवतात, ज्यात त्यांना कायद्याच्या उल्लंघनासाठी अटक होण्याची धमकी दिली जाते. ते नागरिकांना सांगतात की, जर त्यांनी ताबडतोब काही रक्कम पैसे भरले नाहीत, तर त्यांना सायबर गुन्ह्यामुळे अटक केली जाईल. अशा भीतीच्या धमक्यांमुळे नागरिक घाबरून फसवणुकीच्या जाळ्यात अडकतात आणि आपले पैसे गमावतात.

यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मध्ये नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. या प्रकारच्या फसवणुकीला समजून घेऊन योग्य माहिती घेणे आणि अधिकृत स्त्रोतांकडून खात्री करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकांना अशा फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी सायबर सुरक्षा आणि सतर्कता महत्त्वाची आहे. अधिकृत माहिती, सरकारी वेबसाईट्स आणि हेल्पलाइनद्वारे तपासणी करणे आणि कोणत्याही अज्ञात कॉल्स किंवा संदेशांना त्वरित दुर्लक्ष करणे, हे सर्वांची जबाबदारी आहे.

# मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी काँग्रेसची राज्यव्यापी सह्यांची मोहीम : नाना पटोले



तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २७ नोव्हेंबर : महाराष्ट्र विधानसभेच्या निकालावर कोणाचाही विश्वास बसत नाही. निकालात काहीतरी गडबड असल्याची भावना सर्वस्तरातून व्यक्त होत आहे. आपण एकाला दिलेले मत दुसऱ्यालाच जात असल्याची भावना जनतेत आहे. त्याचा आदर करत मतपत्रिकेवर निवडणुका घ्याव्यात, या मागणीसाठी काँग्रेस पक्ष राज्यभर सह्यांची मोहिम सुरु करणार आहे., अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

टिळक भवन येथे पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक झाली . यावेळी नाना पटोलेसह, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुजफ्फर हुसेन, कुणाल पाटील, डॉ. नितीन राऊत, अमित देशमुख, अस्लम शेख, अमिन पटेल, नांदेडचे नवनिर्वाचीत खासदार रविंद्र चव्हाण, मा. खा. कुमार केतकर, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना पटोले म्हणाले की, मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी जनआंदोलन उभे करण्याची घोषणा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी संविधानदिनी दिल्लीत केली आहे. महाराष्ट्रात लवकरच या मागणीसाठी सह्यांची मोहीम सुरु केली जाणार आहे. जनतेच्या सह्यांचे लाखो अर्ज राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश, व निवडणूक आयोगाला पाठवले जाणार आहेत. भारत जोडो यात्रेला महाराष्ट्रात ऐतिहासीक प्रतिसाद मिळाला होता. आता पुन्हा राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी यात्रा काढली जाणार आहे, या यात्रेलाही महाराष्ट्रात प्रचंड प्रतिसाद मिळेल. लोकशाही वाचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्याची लढाई लढलेली आहे, लोकशाही व्यवस्थेत जनताच सर्वोच्च असून जनभावनेचा आवाज काँग्रेस उठवत आहे, असे सांगून ते म्हणाले की, ईव्हीएम संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना केलेले विधान राजकीय आहे, असे मत मांडता येते का हा प्रश्न आहे. निकाल देताना कायद्यात काय तरतूद आहे. त्यावर स्पष्टता असायला हवी होती. परंतु न्यायाधीश व न्यायालयाच्या निकालावर जास्त बोलणे उचित नाही, उद्या दुपारी विधानसभेतील सर्व उमेदवारांची बैठक बोलावण्यात आले असून त्यामध्ये मतदारसंघातील परिस्थितीचा आढावा घेतला जाईल, असे पटोले यांनी सांगितले.

### काँग्रेस विधिमंडळ नेता, प्रतोद हायकमांड ठरविणार

काँग्रेसच्या विधिमंडळातील नेता गटनेते व परत याची निवड दिल्लीतील हाय कमांड करणार आहे. या पदावर नियुक्ती करण्याचे सर्वाधिकार राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांना देण्याचा ठराव एकमताने या बैठकीत करण्यात आला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी हा प्रस्ताव मांडला त्याला विजय वडेट्टीवार यांनी अनुमोदन दिले. डॉ. नितीन राऊत व अमित देशमुख यांनी या प्रस्तावाचे समर्थन केले.

### दबावामुळे शिंदेची माघार

शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घेत भाजपाचे श्रेष्ठ ज्याची निवड करतील त्याला पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले आहे त्याबाबत बोलताना नाना पटोले म्हणाले की दिल्लीतील हुकूमशाहानी दबाव टाकल्याने त्यांनी आता माघार घेतली आहे जर त्यांची इच्छा नव्हती तर चार दिवस आधी ही भूमिका का जाहीर केली नव्हती,असे सांगून ते म्हणाले की, महायुतीला पाशवी बहुमत मिळूनही चार दिवस झाले तरी मुख्यमंत्री निश्चित होत नाही आणि सरकारही स्थापन होत नाही. राज्यात शेतकऱ्यांचा समस्या आहेत, बेरोजगारी, महागाई, कायदा व सुव्यवस्था असे प्रश्न आहेत पण भाजपा युतीला जनतेची चिंता नाही. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण याचा निर्णय जोपर्यंत 'मित्र' घेत नाही तोपर्यंत सरकार व मुख्यमंत्री होणार नाही. अडीच वर्षात निम्मी मुंबई व महाराष्ट्र मित्राला विकला आहे, यापुढेही महाराष्ट्र विकण्याचे काम हे सरकार करेल, त्यामुळे 'मित्राचा' आदेश येताच मुख्यमंत्री व सरकार बनेल,असा टोला त्यांनी लगावला




# शिंदेच्या सुचनेनंतर आमदार आपापल्या मतदारसंघात परतले!

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२७ नोव्हेंबर: महायुतीला स्पष्ट बहुमत मिळूनही एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री पदाची संधी मिळणे अशक्य असल्याचे स्पष्ट झाले आहे .त्यामुळे गेल्या तीन दिवसापासून मुंबई ठिय्या मांडून असलेल्या शिवसेनेच्या नवनिर्वाचित आमदारांना काहीस्या मौनात असलेल्या शिंदे यांनी त्यांना न भेटणे पसंत केले आहे. आपापल्या मतदारसंघात जाऊन विजयाचा जल्लोष करण्याचे सूचना केल्या. त्यानुसार हॉटेल ताजलँड येथून आमदार आपल्या मतदारसंघाकडे परतले आहेत. शपथविधीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर त्यांना मुंबईत पाचारण केले जाणार आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला २३६ जागा मिळाल्या आहेत त्यामध्ये भाजपाचा वाटा १३२ तर शिवसेना शिंदे गटाचा ५७ आमदारांचा आहे. निवडणूक निकालानंतर विजयी आमदारांना सोमवारी मुंबईला बोलाविण्यात आले होते. हॉटेल ताजलँड येथे त्यांच्यासाठी सोय करण्यात आली होती. शिंदे यांची पुन्हा मुख्यमंत्री व्हावी म्हणून इच्छा असली तरी भाजपाने त्याला स्पष्टपणे नकार दिला असून यावेळी हे पद त्यांच्याकडेच ठेवण्याचे निश्चित केले आहे . भाजपाच्या आमदारांची संख्या प्रचंड असल्याने त्यांच्या दबावतंतराचाही फारसा परिणाम होत नाही. त्यामुळे नाराज असलेल्या एकनाथ शिंदे यांनी आपल्या आमदारांच्याही भेटी टाळल्या. त्यांना आपआपल्या मतदारसंघात जा, मतदारांना भेटा त्यांचे आभार माना,अशा सूचना केल्या त्यानुसार प्रमुख नेते वगळता राज्यभरातील आलेले नवनिर्वाचित सदस्य बुधवारी आपापल्या मतदारसंघात परतले आहेत. सत्ता स्थापनेचा फॉर्मुला व नव्या सरकारच्या शपथविधीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर त्यांना पुन्हा बोलावण्यात येणार आहे.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सैन्यप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या चार तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज केला प्रदान

अहमदनगर : सैन्यप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर आणि स्कूल (चखउ), अहिल्यानगर येथे पार पडलेल्या समारंभात मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या चार तुकड्यांना राष्ट्रपतींचा प्रतिष्ठित ध्वज प्रदान केला. २७ नोव्हेंबर रोजी आयोजित हा समारंभ त्यांच्या देशसेवेतील केलेल्या उल्लेखनीय व आदर्श योगदानाचा सन्मान होता. राष्ट्रपतींचा ध्वज २६ व २७ मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंटच्या तुकड्यांना तसेच २० व २२ ब्रिगेड ऑफ द गार्ड्सच्या तुकड्यांना प्रदान करण्यात आला, ज्यामुळे सैन्याच्या या तरुण तुकड्यांसाठी हा अभिमानाचा क्षण ठरला. या भव्य समारंभास अनेक माजी सैनिक, लष्करी अधिकारी आणि नागरी मान्यवर उपस्थित होते, ज्यामुळे या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित झाले.



सैन्यप्रमुखांनी ध्वज प्रदान परेडचे निरीक्षण केले आणि चार मेकॅनाइज्ड इन्फंट्री तुकड्यांच्या चाल व इन्फंट्री कॉम्बॅट व्हेइकलवर आधारित तुकड्यांनी दाखवलेल्या अचूक मानकांचे कौतुक केले. भारताचे राष्ट्रपती यांच्यावतीने त्यांनी या तुकड्यांना राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान करून त्यांच्या देशसेवेतील योगदानाचा सन्मान केला. त्यांनी सर्व सैनिकांचे, विशेषतः सन्मानित तुकड्यांचे अभिनंदन केले आणि युद्ध व शांतता या दोन्ही परिस्थितीत मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या व्यावसायिकतेचे कौतुक केले. भारतीय सैन्याच्या या तरुण व बहुपयोगी शाखेने पायदळ व यांत्रिक सैन्याचे सर्वोत्तम तत्त्व आत्मसात केले आहे. त्यांच्या तुकड्यांनी आपल्या शौर्य व कौशल्यामुळे सर्व लढाऊ क्षेत्रांमध्ये आणि संयुक्त राष्ट्र शांतता राखीव मोहिमांमध्ये योगदान दिले आहे.

आपल्या भाषणात सैन्यप्रमुखांनी नमूद केले की, १९७९ मध्ये स्थापन झाल्यापासून, मेकॅनाइज्ड इन्फंट्रीने ऑपरेशन पवन, ऑपरेशन विजय, ऑपरेशन रक्षक, ऑपरेशन स्नो लेपर्ड आणि संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमांसह अनेक महत्त्वाच्या मोहिमांमध्ये असाधारण शौर्य, शिस्त आणि कार्यक्षमतेचा परिचय दिला आहे. आज, मेकॅनाइज्ड इन्फंट्रीच्या चार तुकड्यांना त्यांच्या आदर्श सेवेसाठी व उल्लेखनीय कामगिरीसाठी राष्ट्रपतींचा ध्वज प्रदान केला जात आहे. वेगाने बदलणाऱ्या युद्धाच्या परिस्थितीत, मेकॅनाइज्ड इन्फंट्रीने भविष्यकालीन तंत्रज्ञान जसे की फ्युचुरिस्टिक इन्फंट्री कॉम्बॅट व्हेइकल्स, नाग क्षेपणास्त्र प्रणाली, कॅनिस्टर लॉंच केलेली अँटी-आर्मर प्रणाली, मिनी रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट्स आणि एकत्रित लक्ष्य साधने आत्मसात करत आपली भूमिका सशक्त केली आहे. या आधुनिकतेचे पायाभूत तत्व म्हणजे स्वावलंबन. भारतीय सैन्य त्यांची व्यावसायिकता व समर्पण याचा अभिमान बाळगते, ज्यामुळे सर्व सैनिकांना उच्च मानके राखण्यासाठी प्रेरणा मिळते आणि राष्ट्राच्या संरक्षणात मोठे योगदान देता येते. सैन्यप्रमुखांनी युनिट्सना सैन्याच्या परिवर्तन दशक उपक्रमामध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्याचे आवाहन केले. इतिहासातील लष्करी परंपरेत, जिथे ध्वज युनिटचे ओळख म्हणून कार्य करत, राष्ट्रपतींचा ध्वज हा भारतीय सैन्यातील युनिटला दिला जाणारा सर्वोच्च सन्मान आहे. पूर्वी युद्धात ध्वज सैनिकांचे प्रेरणास्थान म्हणून काम करत असत, आज ते प्रतीकात्मक असले तरीही सैनिकांमध्ये नैतिकता, प्रेरणा व एकात्मतेची भावना निर्माण करतात. ध्वजावर युनिटचे चिन्ह व घोषवाक्य असते आणि ते युनिटच्या उल्लेखनीय सेवेसाठी सन्मान म्हणून दिले जाते. हा सन्मान एका भव्य समारंभात दिला जातो, ज्यामध्ये राष्ट्रपती किंवा सैन्यप्रमुखांसारखे वरिष्ठ अधिकारी सहभागी होतात.

समारंभादरम्यान, सैन्यप्रमुखांनी चार माजी सैनिकांचा त्यांच्या माजी सैनिकांच्या कल्याणासाठी व समाजातील योगदानाबद्दल गौरव केला. त्यांनी सर्व सैनिक व कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आणि सैन्याच्या मुख्य मूल्ये व तत्त्वांशी सुसंगत राहून राष्ट्रसेवेसाठी उत्कृष्टतेकडे वाटचाल सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

---

**जा.क्र.२०२४/विधी/ज.मू. आदेश/प्र.क्र. २५३६/कावि-२४५७**
**उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१२.०८.२०२४.**

## जाहीर प्रगटन

अर्जदार : मुस्कान इसा शहा, वय-१६ वर्ष व्यवसाय- शिक्षण, अ.पा.क. वडील नामे - इसा याशिन शहा, वय ४६ वर्ष, व्यवसाय - मजुरी. रा. पेंडगाव ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय पेंडगाव. ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी इसा याशिन शहा, रा. पेंडगाव ता.सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांची मुलगी नामे मुस्कान इसा शहा हिचा दिनांक २४.०४.२००८ रोजी मौजे पेडंगाव येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मुस्कान इसा शहा याचा, दिनांक २४.०४.२००८ रोजी मौजे पेडंगाव येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर आक्षेप हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

- उपविभागीय दंडाधिकारी. सिल्लोड

---

## जाहीर नोटीस

**मा. ए. आय. आवटी मॅडम, सह दिवाणी न्यायाधिश कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७५/२०२४

अर्जदार - १- मनिषा प्र. संजय कांदे वय- ३८ वर्षे, धंद- घरकाम, रा. मेहेगाव ता. कन्नड जि. औरंगाबाद २-मंगेश पि. संजय कांदे वय २१ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. मेहेगाव ता. कन्नड जि. औरंगाबाद ३-गजानन पि. संजय कांदे वय. १९ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. मेहेगाव ता. कन्नड जि. औरंगबाद ४-पमाबाई प्र. गंगाराम कांदे वय ६५ वर्षे धंदा-घरकाम, रा. मेहेगाव ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फ जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदार यांनी त्याचे विधिज्ञ डी. के. साळवे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे की. अर्जदार हे वरील टिकाणचे कायमचे रहीवाशी आहे, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील तसेच अर्जदार क्र. ४ चा मुलगा नामे संजय गंगाधर कांदे हे होते ते दिनांक ०८/०८/२००८ रोजी उपघातात मयत झालेले आहे. सोबत ग्रामपंचायत मेहेगाव यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. मयत संजय गंगाधर कांदे यांना मृत्यु पश्चात वारस अर्जदार क्र. १ पती अर्जदार क्र. २ व ३ मुले व अर्जदार क्र. ४ ही आई आहे. हेच मयतास कायदेशीर वारस आहे.

अर्जदार यांना शासक्रिय, निमशासकीय विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी तसेच महसुल दफ्तरी नोद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात बारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक १६/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपीक | सहाय्यक आधक्षक

दिवाणी न्यायालय, क.स्तर कन्नड

---

विशेशपध, आ./मू.सा.वि/१९-म ५५५८ जा.क्र/धउआ/ नोटीस/५५५८/२०२४, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बाबा पेट्रोल पंपच्या शेजारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

दिनांक :- १९/११/२०२४

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, चौकशीची नोटीस (नमुना क्रमांक. २)**

(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम१९५० याचे कलम-२२/किरकोळ अन्वये)

सन २०२३ चा अर्ज क्रमांक १२६५/२०२३ कलम- किरकोळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ब्रम्हानंद सार्वजनिक वाचनालय, औरंगाबाद एफ-१००४ (औरंगाबाद)

अर्जदार : श्री. किरत बाबुसिंग चव्हाण रा. मु. पो. पिंपरी राजा ता. जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार : श्री. एस. आर. पाटिल, मु.पो. पिंपरी राजा, ता.जि. औरंगाबद

ज्या अर्थी मा.धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील किरकोळ अर्जान्वये कलम- किरकोळ प्रमाणे नोंदी दाखल करण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक :- १९/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर.**

---

विशेशपध, आ./मू.सा.वि/१९-म जा.क्र/धउआ/नोटीस /५४३७/२०२४, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बाबा पेट्रोल पंपच्या शेजारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

दिनांक : १३/११/२०२४

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, चौकशीची नोटीस (नमुना क्रमांक. २)**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम१९५० याचे कलम-२२/किरकोळ अन्वये)

( सन २०२३ चा अर्ज क्रमांक १२७०/२०२३ कलम- किरकोळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ब्रम्हानंद सार्वजनिक वाचनालय औरंगाबाद एफ-१००४

अर्जदार : श्री. किरत बाबुसिंग चव्हाण, रा. मु. पो. पिंपरी राजा ता.जि. औरंगाबाद

गैरअर्जदार : श्री.डॉ. शाम जोशी, रा. मु. पो. पिंपरी राजा, ता. जि. औरंगाबाद

ज्या अर्थी मा. धर्मादाय उप आयुक्त, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर यांच्या कडून वरील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेसंबंधात वरील किरकोळ अर्जान्वये कलम किरकोळ प्रमाणे नोंदी दाखकरण्यासाठी चौकशी करण्यात येणार आहे.

त्याअर्थी गैरअर्जदार यांना चौकशीची जाहीर नोटिस वृतपत्रातुन प्रसिध्द करण्यात येत आहे आणि फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत किंवा योग्य रीतीने सूचना दिलेल्या वकीलामार्फत, मा. धर्मादाय उप आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर वर दिलेल्या पत्यावर नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसाच्या आत वरील बाबींचा अखेरचा निकाल करण्यासाठी ठरविलेल्या सुनावणीस हजर रहावे. आणि चौकशीसंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि त्यासंबंधीचा तोडी व दस्तऐवजांच्या रुपातील सर्व पुरावा सादर करावा.

वर निर्दिष्ट केलेल्या जागी व वेळी हजर राहण्यास तुम्ही कसूर केल्यास तुमच्या गैरहजेरीत सदरहू चौकशी होईल, तिचे कामकाज चालविण्यात येईल आणि तिचा निकाल करण्यात येईल अशी तुम्हास नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांकः १३/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय उप आयुक्तांच्या शिक्क्यानिशी दिली.

**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग,**
**छत्रपती संभाजीनगर.**

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए.आय. आवटी मॅडम, सह- दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड, यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ३४६/२०२४

पुढील तारीख : ०४/०१/२०२४

अर्जदार : १-सौ. प्रतिभा भ्र. सोमनाथ बडें, रा.देवळाणा, ता. कन्नड, ह.मु. खरवंडी. ता. नेवासा, जि. अहमदनगर, २- सुनिल पिता रोहिदास ठाकरे, रा. देवळाणा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

- विरुध्द -

गैरअजंदर : महाराष्ट्र शासन, मार्कत- जिल्हाधिकारी छ. संभाजी नगर जिल्हा छ. संभाजीनगर

प्रकरण :कायदेशीर वारसा हक्क प्रमाण पत्र मिळणे बाबत, Legal heirship Certificate

ज्या अर्थी, अर्जदार यांचे वकील अॅड. कृष्णा जाधव यांचे मार्फत या न्यायालयात कै. श्रीमती ताराबाई भ्र. रोहिदास ठाकरे, रा. देवळाणा, ता. कल्ड, हया दिनांक २६.०८.२०२३ रोजी मौजे देवळाणा, ता. कन्नड येथे मरण पावल्या असून त्यांचे पत्ती श्री. रोहिदास पिता हरि ठाकरे हे दिनांक २८.०८.२०१० रोजी मरण पावलेले असून उभयतांस अर्जदार नामे प्रतिभा आणि सुनिल ही अपत्ये झालीत. मयत श्रीमती ताराधाई हिस अर्जदार क्रं. १ व २ हयांचे शिवाय ईतर कोणीही वारस नाहीत. मयत श्रीमती ताराबाई हिने कोण्तेही मृत्युपत्र अथवा ईच्छापत्र लिहून ठेवलेले नव्हते व नाही. अर्जदारांना शासकिय व निमशासकिय कामासाठी तसेच नदताने नांवावरील मिळकती बाबत अर्जदारांचे नांवे राजस्व कागदोपत्री अंमल होवून मिळणेसाठी व अन्य शासकिय चात्रीसाठी आयदेशीर कारण हक्क प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थों, सदरहू जाहीर प्रगटना व्दारे चर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदर हे मयताचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळगेसाठी केलेला आहे, सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेन / उलर असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आक्षेप सादर करावा, मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक १९.११.२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा. क्रोटचि शिक्रयानिशी दिल.

दिनांक १९.११.२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. रतर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- २००/२०२४.

अर्जदार : १) रमेशराव उर्फ रमेश बाबुराव निकम वयः ६९ वर्षे धंदाः शेती, २) गणेश रमेश निकम वयः- ३८ वर्षे धंदाः- शेती, ३) मंगेश रमेश निकम वयः ३५ वर्षे धंदाः शेती, ४) सौ. वैशाली सुनील पाटील वयः ४२ वर्षे धंदाः घरकाम, वरील सर्व रा. हनुमंतखेडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद ५) सौ. जयश्री रामचंद्र पाटील वयः ४० वर्षे धंदाः घरकाम रा. वसंतवाडी, जळके, ता. व जि. जळगांव. ६) योगीता रतीलाल पवार वयः ४५ वर्षे धंदाः घरकाम रा. श्रीरामनगर दादावाडी, ता. व जि. जळगांव.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. कै. मंगलबाई रमेशराव उर्फ रमेश निकम हे दिनांकः- २६/०१/२०२३ ला मौजे युनिटी ट्रुमा सेंटर आणी आय. सी. यु. सुरत, येथे उपचार घेत असतांना मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांक: १३/०१/२०२५)

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:- २७/११/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक. | सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा.श्री.डि. जी.मालविया ३ रे सह दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर औरंगाबाद, यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज क्र. १४७६/२०२४.

अर्जदार : १ रेखा प्र. निवृत्ती खोडे वयः ४८ वर्षे, धंदाः घरकाम रा. ओझर ता. निफाड जि. नाशिक. २ पुरुषोत्तम पि. किसनराव दापके वयः ४४ वर्षे, धंदाः शेती रा. शिवनगर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३ मिना भ्र. किशोर दापके वयः-३९ वर्षे, धंदाः घरकाम रा. शिवनगर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ ओम पि. किशोर दापके वयः-१९ वर्षे, घंदाः शिक्षण रा. शिवनगर ता. कब्रड जि. औरंगाबाद. ५ श्री. पि. किशोर दापके वयः-१८ वर्षे, धंदाः शिक्षण रा. शिवनगर ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : भारतिय वारसा हक्क कायदा १९६६ अन्वये सक्शेशन / वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार क्र. १ ते ५ यांनी मे. न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि. जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ चा भाऊ व अर्जदार क्र.३ चे पती नामे किशोर पि. किसनराव दापके हे होते त्यांचे दि. १२/१२/२०१६ रोजी सुसनेर मध्यप्रदेश येथे अपघाती निधन झालेले असुन त्यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.३ ते ५ हे त्यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदार क्र.१ व २ चे वडिल व अर्जदार क्र.३ चे आजोबा नामे किसनराव वाळूबा दापके हे होते ते दि. १३/८/२०२३ रोजी घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे मयत झाले असुन अर्जदार क्र.। व २ ची आई नामे सुशिला भ्र. किसनराव दापके हि होती ति देखिल दि. ६/१०/२०२० रोजी मौजे कन्नड येथे मयत झालेली आहे. अर्जदार क्र. १ व २ चे आई-वडिल व अर्जदार क्र. ३ चे सासु सासरे मयत किसनराव वाळुबा दापके व सुशिला भ्र. किसनराव दापके यांना अर्जदार क्र.। ते ५ हेच त्यांचे मृत्यु पश्चात कायदेशिर वारस आहेत. अर्जदार क्र.३ चे पती नामे किशोर पि. किसनराव दापके यांचे मृत्यू पश्चात मा. मोटार अपघात प्राधिकरण यांचे न्यायालयात एम. ए.सि.पी. प्रकरण क्र.३४४/२०१७ मिना व ईतर विरुध्द भगवान व ईतर असे अपघात नुकसान भरपाई मिळणे कामी प्रलंबित होते. सदर प्रकरणात अर्जदार क्र. ३ ते ५ व मयत किसनराव वाळुबा दापके व सुशिला भ्र. किसनराव दापके हे अर्जदार क्र. १ ते ५ म्हणुन समाविष्ट होते. सदर प्रकरणात मा. मोटार अपघात प्राधिकरण यांनी दि.५/८/२०२३ रोजी रक्कम रु.२२,५५,०००/- ऐवढी नुकसान भरपाई ६ % व्याजदराने अर्ज दाखल तारखे पासुन अर्जदार क्र. १ ते ५ यांना देणे बाबत न्यायानिर्णय पारीत केलेले असुन सदर रक्कम समान विभागणी करणे बाबत आदेशित केलेले होते त्यानुसार मो.वा.अ. प्रा. औरंगाबाद न्यायालय यांनी एम. ए.सि.पी. प्रकरण क्र.३४४/२०१७ या प्रकरणातील मा. न्यायालयाचे आदेशा नुसार बँकेत जमा असलेली अपघात नुकसान भरपाईची रक्कम हि रु. ३१,६००८४३ /- ऐवढी असुन अर्जदार क्र.। व २ चे वडिल व अर्जदार क्र.३ चे सासरे तसेच अर्जदार क्र.४ व ५ चे आजोबा किसनराव वाळुबा दापके हे दि. १३/८/२०२३ रोजी एम. ए.सि.पी. प्रकरण क्र.३४४/२०१७ या प्रकरणातील निकाला नंतर मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार क्र.१ व २ ची आई व अर्जदार क्र.३ ची सासु हि तसेच अर्जदार क्र.४ व ५ ची आजी सुशिला भ्र. किसनराव दापके हि एम. ए.सि.पी. प्रकरण क्र.३४४/२०१७ प्रलंबित असतांना मयत झाली आहे. मो.वा.अ. प्रा. औरंगाबाद न्यायालय यांनी एम. ए.सि.पी. प्रकरण क्र.३४४/२०१७ या प्रकरणात मंजुर झालेली नुकसान भरपाई बाबतची संपुर्ण रक्कम रु. ३१,६००८४३ /- हि स्टेट बँक ऑफ इंडिया शा. औरंगाबाद यांचे कडे वर्ग केलेली आहे.

एम. ए.सि.पी. प्रकरण क्र. ३४४/२०१७ मध्ये प्रकरणातिल मयत अर्जदार क्र.४ व ५ किसनराव वाळुबा दापके व सुशिला भ्र. किसनराव दापके यांना नुकसान भरपाई म्हणुन मिळणारी रक्कम रु. ६,३२,१६८.०६/- ऐवढी रक्कम प्रत्येकी मिळणार आहे. त्या करीता, मा. न्यायालयाचे वारसाहक्क सक्सेशन प्रमाणपत्र अर्जदार क्र. १ ते ५ यांचे कडे दि. १२/४/२०२४ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया शा. औरंगाबाद येथिल संबंधित बँक अधिकारी यांनी मागणी केली आहे. करिता, अर्जदार क्र. १ ते ५ यांना मा. न्यायालयाचे वारसा हक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

अर्जदारांनी सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यंनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल. दि.१९/११/२०२४

आदेशावरून

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

---

## जाहिर प्रगटन

**मा.ए.आय.आवटी साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि.अर्ज.क्रं.२११/२०२४

पुढील तारीख ३/१/२०२५.

अर्जदार : १. इस्माईल यासिन शेख, वय ८० वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. २.मंजूर यासिन शेख, वय ६३ वर्षे, धंदा शेती. रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. म्हेमुदाबी शब्बीर शेख वय ८९ वर्षे, धंदा घरकाम, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. जाबीर शब्बीर शेख, वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. शेख युनुस शब्बीर वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. अमिना मसजिद मिसरवाडी ता. व जि. औरंगाबाद. ६. रफिक शब्बीर शेख, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. बिसमिल्ला मसजिद मिसरवाडी ता. व जि. औरंगाबाद. ७. शेख हारून शेख शब्बीर, वय ५४ वर्षे, शेती, रा. पळशी व ता. कन्नड जि. औरंगाबाद. ८. शेख इब्राहिम शब्बीर, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ९. इरफानाबी नबी शेख, वय ५१ वर्षे, धंदा शेती, रा. हस्ता ता. कन्नड जि. औरंगाबाद. १०. सईदाबेगम हनीफ शेख वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. ११. हमीद हनीफ शेख वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद १२. नवीद हनीफ शेख वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. १३. इरफान हनीफ शेख वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. १४. रहीमाबी अयुब शेख वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाकोद ता. कन्नड जि. औरंगाबाद. १५. शेख इरशादबी शेख मुनीर, वय ७८ वर्षे, घरकाम, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. १६. अख्तराबी जाहेद शेख, वय ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. पळशी बु ता. कन्नड जि. औरंगाबाद. १७. शमाबी इसाक शेख, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. खेडी वाकोद. ता. कन्नड जि. औरंगाबाद १८. नजमाबी बदोददिन शेख, वय ५६ वर्षे, धंदा घरकाम, रा. शफेपूर पिशोर ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील अॅड. शेख कामरान रफिक यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख यांचे मुले असून अर्जदार क्र. १४ ते १८ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. तसेच मयत यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख यांचा मयत मुलगा नामे शब्बीर यासीन शेख हा दि.२०/०१/२०२३ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे मरण पावले आहे. जे अर्जदार क्रं. ३ चे पती व अर्जदार क्र. ४ ते ९ यांचे वडील आहेत. तसेच मयत यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख यांचा मयत मुलगा नामे हनिफ यासीन शेख हा दि.१८/०७/१९९९ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे मरण पावले आहे. जे अर्जदार क्रं. १० चे पती व अर्जदार क्र. ११ ते १३ यांचे वडील आहेत. अर्जदार क्रं. १ ते १८ हे आपसात सख्खे आऊ बहिण व नातेवाईक आहे. अर्जदार क्रं. १ ते १८ है मयत यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्रं. १,२ व १४ ते १८ यांचे वडील नामे मयत यासीन बाबन शेख हे दि.२०/०३/२००४ रोजी व अर्जदार क्रं. १,२ व १४ ते १८ यांची आई नामे मयत खातूनबी यासीन शेख हि दि.०८/११/१९८३ रोजी मौजे पळशी बु ता. कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्रं. १ ते १८ यांना मयत यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते १८ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते १८ हे व मयत नामे यासीन बाबन शेख व खातूनबी यासीन शेख हे मौजे पळशी बु ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते पळशी बु ता. कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते १८ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.२६/०८/२०२४ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/११/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कन्नड

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ५२१/२०२४

अर्जदार :१) शोभा भ्र. अशोक पाळंदे, वय ५२ वर्षे, धंदा. मजुरी रा. अगर कानडवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) अशोक कचरु पाळंदे, वय ६० वर्षे, धंदा मजुरी, रा. अगर कानडवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मनिषा भ्र. रोहिदास पाळंदे, वय ३३ वर्षे, धंदा मजुरी रा. अगर कानडवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) आश्विनी पि. रोहिदास पाळंदे, वय १२ वर्षे, अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.३ ५) सिध्दार्थ पि. रोहिदास पाळंदे, वय १० वर्षे, अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.३ ६) रुपाली पि. रोहिदास पाळंदे, वय ०८ वर्षे, अज्ञान पालन कर्ती आई अर्जदार क्र.३

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. एस. के. लोहाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने पत्नी व पत्ती असुन अर्जदार क्र.३ ही अर्जदार क्र.१ व २ यांचा मयत मुलगा नामे रोहिदास अशोक पाळंदे यांची विधवा पत्नी असुन अर्जदार क्र.४ ते ६ हे मयत रोहिदास व अर्जदार क्र.३ यांचे अपत्ये आहेत. अर्जदार क्र.१ व २ यांचा मुलगा, अर्जदार क्र.३ चे पति व अर्जदार क्र.४ ते ६ यांचे वडील नामे रोहिदास अशोक पाळंदे हे मौजे अगरकानडगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक १९/०४/२०२१ रोजी मौजे अगरकानडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत रोहिदास अशोक पाळंदे यांना अर्जदार क्र.१ व २ हे अनुक्रमे आई-वडील, अर्जदार क्र.३ ही विधवा पत्नी व अर्जदार क्र.४ ते ६ हे मुले असे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राची मागणी या न्यायालयात केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २६/११/२०२४ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ०३/०१/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

---

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती ए. के. दामटे साहेब, दिवाणी न्यायाधीश साहेब, क.स्तर सिल्लोड यांच्या न्यायालयात**

एम.ए.क.३५७/२०२४

CNR-MHAU080045932024

अर्जदार : १. रामदास गोपाळा चव्हाण वय ८३ वर्ष, व्यवसाय निरंक रा.अंधारी ता. सिल्लोड जि.छ. संभाजीनगर २. संजय रामदास चव्हाण वय ५५ वर्ष, व्यवसाय शेती रा. वरील प्रमाणे ३. पांडुरंग रामदास चव्हाण वय ४८ वर्ष, व्यवसाय शेती रा. वरील प्रमाणे ४. जनाबाई कृष्णा मोरस्कर वय ५३ वर्ष, व्यवसाय घरकाम रा. पिशोर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर ५. मीरा संतोष दाभाडे वय ४६ वर्ष, व्यवसाय घरकाम रा.छ.संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर ६. अदिती राजेंन्द्र अहिरराव वय ४१ वर्ष, व्यवसाय घरकाम रा.पुणे ता.जि.पुणे

विरूध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन मार्फत, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

विषय : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिर प्रगटानाव्दारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी अॅड.एस.एम. बडक यांच्या मार्फत जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे वच्छलाबाई रामदास चव्हाण ह्या मौजे अंधारी ता.सिल्लोड जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होत्या. त्यांचा दि.२४.०८.२०२४ रोजी मौजे अंधारी ता.सिल्लोड येथे मृत्यू झाला आहे. मयताचे अर्जदार क.१ हे पती असून अर्जदार क.२ व ३ हे मुले असून अर्जदार क.४ ते ६ ह्या मुली आहे. अर्जदार व्यतिरिक्त मयत वच्छलाबाई रामदास चव्हाण यांना इतर कुणीही कायदेशीर वारस नाही. मयत नामे वच्छलाबाई रामदास चव्हाण यांच्या वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व महसुल कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार क.१ व ६ हेच त्यांचे एकमेव वारसदार आहे. त्यामुळे मा. न्यायालयात सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण घडले आहे.

ज्याअर्थी अर्जदार हे मयत नामे नामे वच्छलाबाई रामदास चव्हाण यांचे अर्जदार वारस नाही असे समजाविण्याचे असतील व वारस प्रमापतत्र देण्या बाबत आक्षेप, उजर, हरकत असेल तर हे जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत उजर, आक्षेप, हरकत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर होवून सादर कराव्यात. जर मुदतीत आक्षेप, उजर, हरकत न नोंदविल्यास अर्जदारांच्या नावे वारसप्रमाणत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१७/१०/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २०/११/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपिक | सह. अधिक्षक

दिवाणी न्यायालय सिल्लोड

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्हि. एन. काटकर दूसरे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड, न्यायालय क्र.३ जि. औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. २९३/२०२४.

अर्जदार : १ रुबाबबी भ्र. रशिद शेख वयः-६५ वर्षे, धंदाः घरकाम रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. २ युसुफ पि. शे. रशिद वयः ४४ वर्षे, धंदाः मजुरी रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३ रफिक पि.शे. रशिद वयः ४२ वर्षे, धंदाः व्यापार रा. हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४ परविन भ्र. शे. नसिर वय-४० वर्षे, धंदा औरंगाबाद, घरकाम रा. हतनूर ता. कन्नड जि.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन VIII १८२७ चे कलम २ व ३ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी वरिल अर्जदार । रुबाबबी भ्र. रशिद शेख रा. हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद. २ युसुफ पि. शे. रशिद रा. सदर ३ रफिक पि.शे. रशिद रा. सदर ४ परविन भ्र. शे. नसिर रा. सदर यांनी मा. न्यायालयात त्याचे वकिल श्री.बि.जे. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र.। चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडिल नामे रशिद पि. शे. गुलाब हे होते ते दि. ३०/६/२०१८ रोजी मौजे हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. मयत रशिद घि. शे. गुलाब यांचे वडिल नामे गुलाब महंम्मद शेख हे होते दि. १/११/१९६५ रोजी मौजे तुर्काबाद ता. गंगापुर येथे मयत झालेले आहेत. मयत गुलाब महंम्मद शेख यांना अर्जदार क्र.। ते ४ हेच कायदेशिर वारस आहेत मयत श्री. मयत गुलाब महंम्मद शेख यांचे नावे असलेलया मिळकति या अर्जदार क्र. १ ते ४ चे नावे नामनिर्देशित करणे आहे. तसेच अर्जदार यांना ईतर शासकिय कामाकरिता देखिल मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदर मिळकती महसुल कार्यालयातुन अर्जदारांचे नावे नामनिर्देशित करणे कामी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदार क्र.१ ते ४ शिवाय इतर कोणीही कायदेशिर वारस नाही. अर्जदाराने सदरचा अर्ज वारसा प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात सादर केला आहे. याबाबत कोणाचा काही आक्षेप अथवा उजर आल्यास त्यंनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात लेखी स्वरुपाने स्वता अथवा आपल्या विधिज्ञां मार्फत उजर सादर करावा. मुदतित उजर किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारित करण्यात येतिल.

दि. १९/११/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजेनंतर भरविण्याच्या शासन निर्णयाला हरताळ

## अंमलबजावणी न झाल्यास मराठा महासंघ आंदोलन छेडणार -अरविंद देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आधुनिक युगात बदलेल्या जीवनशैलीमुळे मनोरंजनाची विविध साधने उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थी रात्री उशीराने झोपतात व सकाळी लवकर उठतात. त्यामुळे त्यांची झोप पुरेशी होत नाही. मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर याचा नकारात्मक परिणाम होत असल्याने इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजता अथवा त्यानंतर भरण्यात यावे, या सहा महिन्यापू-र्वीच्या शासन निर्णयाला शाळांनी हरताळ फसला आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम तर होत आहेच; शिवाय पालकांची तारांबळ उडत आहे. शिक्षण विभागाने तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करून, सकाळी ९ वाजेपूर्वी म्हणजे सात वाजेपासून वर्ग भरणाऱ्या सर्व माध्यमांच्या शाळा, शिक्षण संस्थांवर कारवाई करावी; अन्यथा मराठा महासंघाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिला आहे.

यासंदर्भात अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवक जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, कामगार आघाडीचे अंबड तालुका अध्यक्ष मोबीन बागवान, युवक काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष संतोष जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ जोगदंड यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांमधील पूर्व प्राथमिक ते इयत्ता चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी ९ वाजता किंवा ९ नंतर भरवण्याचा निर्णय शिक्षण विभागाने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेऊन, तसा जीआरदेखील काढलेला आहे. त्यात म्हटले आहे की, सकाळी सात वाजता शाळेमुळे विद्यार्थ्यांना सहा वाजताच उठावे लागते. मुलांचा डब्बा, त्यांची तयारी यासाठी पालकांनाही कसरत करावी लागते. झोप होत नसल्याने विद्यार्थ्यांची चिडचिड होते, मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. पावसाळा, हिवाळा, बदलेले वातावरण यांमध्ये लहान विद्यार्थांना शाळेत जावे लागते. या वातावरणमूळे लहान विद्यार्थ्यांना त्रास होतो व पालकांची देखील धावपळ होते. मुलांना तयार करणे , शाळेत वेळेत पोहचणे. थंडीच्या तसेच पावसाच्या दिवसांत विद्यार्थ्यांना बस, व्हॅन, रिक्षा या



साधनानी शाळेत जावे लागते व या दिवसांमध्ये धूके मोठया प्रमाणात पडते व अपघात होतात. या सर्व समस्या बघून सरकारी नियम आणि सरकारी कार्यालयाच्या वेळा व राज्यातील शाळांच्या वेळा समान येणार नाही, याची काळजी घ्यावी. या सर्वांचा विचार करून व तपासून शासनने राज्यातील चौथीपर्यंतचे वर्ग सकाळी नऊ वाजता किंवा त्यानंतर शाळांच्या सोयीनुसार भरविण्याचा निर्णय घेतलेला असताना कुणीच शासन निर्णयाची दखल घेतलेली नाही. शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक आणि पालकांशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाच्या परिपत्रात नमूद आहे. राज्य सरकारचा हा निर्णय मुलांसाठी आणि पालकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. नैसर्गिक झोप पूर्ण होऊन मुलांचे लक्ष एकाग्र होण्यास आणि अभ्यासाला प्रेरणा देण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे. या मुलांचे पालकही उत्तम दिनचर्या आणि निश्चित प्रव-ासाचा आनंद घेऊ शकतील. लहान मुलांचा सांभाळ करणाऱ्या पालकांची तारेवरची कसरत यामुळे काहीशी कमी होणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यावर निश्चितच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल. त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा निर्णय हातभार लावणारा असल्याने शिक्षण विभागाने तात्काळ अंमलबजावणी करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अरविंद देशमुख यांनी दिला आहे.

## संक्षिप्त



### संविधान दिनानिमित्त संविधान निर्माते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शिवसेनेने केले अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

संविधान दिनानिमित्त संविधान निर्माते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आज दिनांक २६ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजेच्या दरम्यान मस्तगड येथे शिवसेना शहर शाखेच्या वतीने अभिवादन करण्यात आले आहे यावेळी शिव सेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले मेघराज भैय्या चौधरी दिनेश भगत मनोज देवरे शिवा मामा शेळके विक्रम कुसुंदर राज रत्नपारखे विशाल रत्नपारखे शुभम टेकाळे सागर गुटुक पांडुरंग खैरे पांडुरंग खैरे किरण गरड किशोर शिंदे आदिची उपस्थित होते.

### धाकलगाव शिवारामध्ये बिबट्याने केले वासराला फस्त

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी



अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील शेतात बांधलेल्या वासराला रात्रीच्या वेळे बिबट्याने केला हल्ला या हल्लयात वासराचा मृत्यू झाला व इतर जनावरांनाही बिबट्यानेहल्ला केला धाकलगाव परिसरात व शेतकऱ्यांमध्ये बिबट्याची दहशत आहे याकडे वन विभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे

### संविधान दिनाचा अमृत महोत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरामध्ये आयोजित अभिवादन व सामूहिक संविधान उद्देशिकेचे वाचन या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यानंतर भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक वैजनाथ बोराडे , गटनेते अचित बोराडे, अरुण वाघमारे ,राजेश खंदारे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी राजेंद्र मोरे, उबेद बागवान, अशोक अवचार, बी.के.प्रधान, मारोती खनपटे,विजेश वाघमारे, जिवन भदर्गे, संजय धुळे, प्रबुद्ध आघाम, संदेश प्रधान,शूभम वाघमारे,पवन वाघमारे, आर.डी. खंदारे, विजय चव्हाण, प्रबुद्ध आघाम यांची उपस्थिती होती.

# संविधानामुळे व्यक्तीमध्ये सकारात्मक परिवर्तन होते -अविनाश राठोड

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

नायगाव येथील जि.प.प्रशाला.त्रिंबक नाईक तांडा मध्ये संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम ग्रामपंचायत सदस्य गौतम दाहिजे,श्रीहरी मगर,प्रकाश दाहिजे,समाधान वावळे वाहुळे आणि बन्सी डोके यांच्या हस्ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार घालून करण्यात आले.मा. सरपंच अविनाश राठोड यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विशाल कार्यपुस्तिकेचि भेट मुख्याध्यापक सुभाष जायभाय यांना देण्यात आली.त्यानंतर शिक्षक समाधान काळे ,ज्येष्ठ नागरिक,विद्यार्थी आणि विद्यार्थीनीने सन्मानपूर्वक संविधानाचे पठण केले.

या कार्यक्रमाप्रसंगी मा.सरपंच अविनाश राठोड यांनी बोलताना संविधान हे एक पवित्र ग्रंथ आहे. सामाजिक ,राजकीय,आर्थिक व्यापारी,शैक्षणिक इतर सकारात्मक परिवर्तन यातून होते असे



प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.पुढे बोलताना त्यांनी एक आदर्श व्यक्तिमत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श घेऊन आपल्या मध्ये काही सकारात्मक बदल घडवायला हवे असे आव्हान त्यांनी यावेळी केले. आपण काम करताना संविधानिक रित्या गावाचा विकास कसा होईल त्यासाठी आपण काम करणार आहोत असे त्यांनी यावेळी त्यांनी सांगितले. होऊ गेलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये नायगाव येथुन ७० टक्के मतदान केले गेले.लोकशाही बळकटीकरणासाठी आगामी निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त आपण मतदान करावे अशी विनंती त्यांनी यावेळी केली. शेवटी त्यांनी बोलताना भारताचे संविधान हे जागतिक पातळीवर सर्वोच्च आहे.आपण संविधानाचा मान,पान,सन्मान आणि देश बळकटी करण्यासाठी करावा असशी विनंती त्यांनी यावेळी केली .

या कार्यक्रमात प्रसंगी मुख्याध्यापक सुभाष जायभाय, ग्रामसेवक बी.एस गवळी, समाधान काळे,मनीषा मोरे, गौतम दाहिजे,श्रीमती काळे,प्रकाश दाहीजे,बन्सी डोके,श्रीहरी मगर,समाधान वावहळे ,एकनाथ फुपाटे, लखण राठोड ,विकी चव्हाण, विकास प्रधान,नितीन राठोड इ, गावकऱ्यासह विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुभाष जायभाय यांनी केले तर आभार प्रदर्शन समाधान काळे या शिक्षकांनी केले.

### संविधान दिनानिमित्त माहोऱ्यात भारतीय घटनेच्या उद्देशिका प्रतचे वाचन



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यांल माहोरा येथील ग्रामसंसद कार्यालय मध्ये भारतिय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतिय देशात लिहिली घटना प्रतीचे १९४९ भारता ला समर्पित केले. व भारतिय कायदा १९५० ला कायदयाची आमलबजावनी सुरू झाली. अश्या महामानवास माहोरा येथील ग्रामसंसद मध्ये प्रतिनेचे पुजन व भारतिय घटनेच्या उद्देसिकेच्या वाचन माहोरा येथील सरपंच गजानन पाटील लहाने, लझ्मण वाघ, विकास जाधव, गणेश गायकवाड, विजय इंगळे, गुलाब कळम, केरुबा साबळे, अन्य ग्रामस्थाच्या उपस्थित सविधानाचे वाचन केले. सर्व ग्रा.प. सदस्य उपस्थित होते.

# महाराष्ट्राचा कौल विकासालाच -मसालाकिंग डॉ.धनंजय दातार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला २०० हून अधिक जागा देत निर्विवाद बहुमत दिले आहे. हा निकाल महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी हितकारी आणि उत्साहवर्धक ठरेल, असे एक उद्योजक या नात्याने वाटते. कारण कोणत्याही राज्याची आर्थिक-औद्योगिक प्रगती ही शासकीय धोरणांच्या स्थिरते वर अवलंबून असते आणि धोरणे स्थिर राहण्यासाठी तेथील राजवट मजबूत असावी लागते. अशा शब्दांत अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, युएईचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ धनंजय दातार यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. पुढे ते म्हणाले, केंद्रात व महाराष्ट्रात पुढील पाच वर्षे एकाच आघाडीचे, एक विचाराने चालणारे आणि विकासाभिमुख सरकार काम करणार असल्याने आगामी काळात अस्थिर सरकार, तडजोडीचे सरकार किंवा राष्ट्रपती राजवट अशा आव्हानांचा मुकाबला करावा लागणार नाही आणि विकासासाठी केंद्रीय निधीची ही कमतरता भासणार नाही, हे खूप आश्वासक आहे.

महायुतीच्या गेल्या शासन काळात राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टी मुळे महाराष्ट्रात प्रगतीची व्यापक आणि वे-गवान पावले पडलेली दिसली आहेत. त्याच दमदार वाटचालीचा पुढचा टप्पा भविष्यकाळात ही कायम राहील. पायाभूत सुविधा विकासाचे अनेक प्रकल्प पूर्ततेच्या टप्प्यात आहेत. त्यातील काही महाराष्ट्रा इतकेच देशाच्या भरभराटीसाठी ही महत्त्वाचे आहेत. समृद्धी महामार्ग, मेट्रो, बुलेट ट्रेन, नवे रस्ते व रेलमार्ग बांधणी तथा विद्यमान मार्गांचा विस्तार, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित वाढवण बंदर ही त्यापैकी काही उदाहरणे. महाराष्ट्रात गुंतवणूक, वाहतूक, आयात-निर्यात, औद्योगिक विकास यांना पुढील पाच वर्षांत जोरदार चालना मिळेल, ज्याचा परिणाम राज्याची आर्थिक भरभराट होण्यावर होईल. नव्या सरकारला आणि नेतृत्वाला अनेक शुभेच्छा.

# छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या, आराम ईलेक्ट्रीकॅल्स, शिवशाही बस सेवा सुरु करा -बाबासाहेब कोलते

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, ईलेक्ट्रीकॅल्स, शिवशाही बस सेवा सुरु करून जिल्ह्यातील भाविकांना प्रभू श्रीरामाचे दर्शनासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी स्वातंत्र सैनिक पाल्य युवक समितीचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब कोलते यांनी विभाग नियंत्रक छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

विभाग नियंत्रक यांना दिलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हंटले आहे की, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळामार्फत छत्रपती संभाजीनगर ते अयोध्या आराम, इलेक्ट्रिकल्स, शिवशाही बस सेवा छत्रपती संभाजीनगर



जिल्ह्यातून सुरु करावी, कारण छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा धार्मिक व साधू संतांची भूमी म्हणून ओळखली जातो, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनेक धार्मिक संस्थाचे कामे मोठ्या प्रमाणावर होत असून जिल्ह्यात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून आयोध्याला जाण्यासाठी सध्याची परिवहन व्यवस्था जास्त प्रमाणात खासगी स्वरुपाची असून सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी नाही. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर आगारातून छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या आराम बस, इलेक्ट्रिकल बस व शिवशाही बस सेवा सुरु केल्यास छत्रपती संभाजीनगर आणि शेजारच्या जिल्ह्यातील भाविक पर्यटक यांच्यासाठी लाभदायी ठरेल त्याचबरोबर परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल.

निवेदनाचा व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाविकांचा हिताचा विचार तात्काळ होऊन छत्रपती संभाजीनगर ते आयोध्या बस सेवा सुरु करावी अशी मागणी बाबासाहेब कोलते यांनी केली आहे.

# पाचव्यांदा निवडून आलेले परतुरचे आमदार बबनराव लोणीकर यांची मंत्रीपदी वर्णी लागणार!

## देवेंद्र फडवणीससह प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्याशी भेट; राहुल लोणीकरांची पुन्हा एकदा कमाल !



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/केदार शर्मा**

परतुर विधानसभेच्या निवडणुकीच्या नुकत्याच लागलेल्या निकालात भाजपाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी हॅट्रिक नोंदवून ४७४० मतांनी विजय संपादन केला. लोणीकर यांचा हा सलग तिसरा तर एकूण पाचवा विजया आहे. लोणीकर पहिल्यांदा १९९९ मध्ये निवडून आले होते यानंतर २००४, २०१४

**राहुल लोणीकरांची पित्याला साथ**

आपल्या वडिलांच्या खांद्याला खांदा देत राहुल लोणीकर यांनी मंत्रिपदासाठी लॉबिग सुरू केलेली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सुधीर मुन्गुण्टिवार यांच्यासह माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मंत्रीपदासाठी चर्चा केली तत्पूर्वी सुधीर भाऊ मुनगंटीवार यांच्याशी चर्चा करीत मंत्री पदासाठी आग्रही मागणी केलेली आहे बबनराव लोणीकर यांना पहिल्याच यादीत घेतले जाईल अशी शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

२०१९ व आता २०२४ मध्ये निवडून आले आहे बबनराव लोणीकर भाजपमधील सर्वात अनुभवी नेते असून त्यांनी पक्षातील ही अनेक पद भूषविलेले आहेत यासह त्यांनी २०१४ यासाठी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली होती पाणीप-ुरवठा खातेसंबंध त्यांनी मराठवाड्यातील वाटर योजना अमलात आणून नावलौकिक केले होते यामुळे शासनाच्या वतीने अधिक जल आपूर्ति प्रबद्धपणे व्हावे यासाठी इजराइल दौऱ्यासाठी निवड केली होती त्यांच्या या योजनेची विद-ेशातही चर्चा झालेली होती लोणीकर हे पक्षातील मोठा मराठा चेहरा आहे तसेच जिल्ह्यातील भाजपाचे ज्येष्ठ नेतृत्व असल्याने त्यांचे मंत्रिपद निश्चित समजल्या जाते यावेळी भाजपाच्या वाट्याला अधिक मंत्री पदे येणार असल्याने लोणीकर यांचे नाव निश्चित समजले जाते. भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष असलेले राहुल लोणीकर यांनी २०१४, २०१९ व आता २०२४ या

**परतूर शहर मतदान**
लोणीकर(भाजप) ५३७९
बोराडे (उ.सेना)- ६६७५
जेथलिया (अपक्ष) - ५७९०
थोरात (वंचित)- २०६६

**मंठा शहर**
लोणीकर(भाजप) २२९४
बोराडे (उ.सेना)- ४६८०
जेथलिया (अपक्ष) - ३१७३
थोरात (वंचित)- ४४३

**आष्टी गांव**
लोणीकर(भाजप) २३८४
बोराडे (उ.सेना)- १२४१
जेथलिया (अपक्ष) - २५०२
थोरात (वंचित)- २४०८

**सातोना खु.बु. गांव**
लोणीकर(भाजप) ८९०, ३५७
बोराडे (उ.सेना)- १८३०, ६५६
जेथलिया (अपक्ष)-९२०, ६३
थोरात (वंचित)- ३४७, ४०७

निवडणुकीत अफलातून कामगिरी करत बबनराव लोणीकर यांना विजयश्री खेचून आणली त्यांच्या नीतीने सबंध मराठवाड्यात एक प्रकारचा राहुल पॅटर्न तयार झालेला आहे संपूर्ण मतदारसंघात लोणीकर यांच्याविरुद्ध आजी-माजी प्रस्थापितांनी दंड थोपटलेले असताना व त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात वातावरण तयार झा-लेले असताना एकट्या राहुल लोणीकर यांनी आपले पॅटर्न वापरत विरोधकांवर मात केली व विजयश्री खेचून आणले यानंतरही लोकांचे अभिवादन स्वीकारल्यानंतर तात्काळ मुंबईकडे रवाना झाले.

## अग्रलेख...

# मोदींनी दाखविला आरसा...

आपल्या लोकशाहीने भारतीय संविधानासह सुरू केलेल्या यात्रेचा अमृत महोत्सव सुरू झालेला आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान स्वीकारले गेले आणि २६ जानेवारी १९५० पासून अमलात आले. ते आजतागायत अमलात आहे. जगातील अनेक देशांच्या घटना या काळात आल्या-गेल्या. पण, भारतीय संविधान कायम आहे आणि त्यामुळेच भारताची लोकशाही कायम आहे. मध्येच कुणाला तरी संविधानाचा बचाव करण्याची हुक्की येते आणि तो त्याबद्दल प्रचार किंवा अपप्रचार सुरू करतो. पण, अशा सर्व प्रचारांना गेल्या अनेक निवडणुकांच्या माध्यमातून लोकांनी उत्तर दिलेले आहे. ज्यांनी आणिबाणीच्या स्वरूपात भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह अनेक घटनात्मक मूल्यांना पायदळी तुडविले, त्यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीदरम्यानही संविधान बचावचा नारा दिला होता. संविधानाची पुस्तके वाटली होती. संविधानाची पुस्तके वाचणाऱ्यांनी ते वाचलेच असेल असे नव्हे आणि वाचले असेल तरी ते त्यांना समजले असेल असेही नव्हे! भारतीय संविधान समजून घेण्यासाठी नुसती भाषिक समज लागत नाही. त्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांप्रति असलेली आपली निष्ठाही महत्त्वाची असते. आम्ही म्हणू तो मुख्यमंत्री, आम्ही म्हणू तो कायदा, अशा पद्धतीने काँग्रेसने दीर्घकाळ भारतात कारभार चालविला. देशावर आणिबाणी लादणाऱ्या इंदिरा गांधी काँग्रेसच्या नेत्या होत्या. पंतप्रधान होत्या. आता त्यांची स्नुषा आणि नातू मिळून संविधानाचा जागर करण्याचे ढोंग करतात. अशा सर्व ढोंग्यांचे वस्त्रहरण भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. मतदार, संविधान आणि जगाच्या भारताकडून अनेक अपेक्षा आहेत. त्यांच्या कसोट्यांवर सिद्ध होण्याची गरज असताना मूठभर लोक स्वार्थासाठी संसदेला वेठीस धरत आहेत, अशा शब्दांत मोदींनी विरोधकांना कानपिचक्या दिल्या. भारतीय संविधानाच्या दृष्टीने संसद आणि संसद सदस्य हे भारतीय लोकशाहीचे महत्त्वाचे घटक आहेत. संसदेत चर्चा होणे अपेक्षित असताना गोंधळ होतो आणि त्यामुळे मनमोकळी चर्चा होत नाही. नवीन खासदारांना बोलण्याची, चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळत नाही, असे अनेक मुद्दे मांडून पंतप्रधानांनी विरोधकांचे पितळ उघडे पाडले. खरे तर पंतप्रधानांनी भारतीय जनतेचे मत मांडले आहे. संसदेत असो वा राज्य विधिमंडळात, गोंधळ करण्याची मुभा नाही. चर्चेची मुभा आहे. बऱ्याच प्रमाणात आरोप-प्रत्यारोप करण्याचीदेखील आहे. याही पलीकडे जाऊन विरोधकांना हे माहिती असायला हवे की, राज्य घटनेनुसार भारत हे सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकतांत्रिक गणराज्य आहे आणि त्याने संसदीय पद्धत स्वीकारलेली आहे. संसदीय पद्धतीचा स्वीकार केल्याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे संसदीय तरतुदींच्या योगे अस्तित्वात येणारी संसद आणि राज्यांची विधिमंडळे. भारतीय गणराज्याचा कारभार भारतीय संविधानानुसार चालतो. त्या पवित्र संविधानातील तरतुदींचे विस्मरण विरोधकांना सतत होत असते. घटनेनुसार स्थापन झालेल्या निवडणूक आयोगामार्फत घेतल्या गेलेल्या निवडणुकांचा निकाल आपल्या बाजूने लागला तर ईव्हीएम निर्दोष आणि आपल्या विरोधात गेला तर ईव्हीएम सदोष, अशी त्यांची भूमिका असते. झारखंडचा निकाल बरोबर असतो तर महाराष्ट्राचा संशयास्पद असतो. याच विषयावरील एका याचिकेमार्फत बॅलेट पेपरचा वापर करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात करण्यात आली होती. ती मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्याची घटना ताजी आहे. खरे तर मोदी आणि भाजपाच्या विरोधकांना सूर गवसेनासा झालेला आहे. त्यामुळे ते सैरभैर झालेले आहेत.

अमृत महोत्सवाच्या निमित्ताने विरोधकांनी एक गोष्ट समजून घेतली पाहिजे. ती अशी की, भारतीय राज्यघटना ही केवळ एक दस्तावेज नव्हे; ही घटना म्हणजे जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीला मार्गदर्शन करणारी गुरुकिल्ली होय. राष्ट्राच्या बहुलतावादी जडणघडणीचे रक्षण करताना ते न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांना मूर्त रूप देईल, याची खातरजमा भारतीय संविधानाच्या मार्फत केली जाते. गेल्या दशकभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घटनात्मक आदर्शांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यातील अत्यंत लक्षणीय बाब म्हणजे, मोदींच्या सरकारने पारदर्शकता, जबाबदारी आणि सर्वसमावेशकता यावर भर देऊन लोकशाही व्यवस्थेचे पुनरुत्थान केले आहे. 'MyGov' सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे नागरिकांना थेट धोरण ठरवणाऱ्यांशी संपर्क साधता येतो. सूचना करता येतात. मोदींच्या काळात लागू झालेल्या योजना, उदा. डिजिटल इंडिया, डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर यासारखी उदाहरणे अद्याप जगात सर्वत्र सापडणारी नाहीत. अनेक योजना व सेवा आता एका क्लिकनिशी मिळविता येतात. नियोजन आयोगाचे नीती आयोगात रूपांतर झाल्यामुळे राज्यांना विकासात्मक नियोजनात अधिक भूमिका वठवणे शक्य झाले आहे. 'टीम इंडिया' ही कल्पना मोदी सरकारची. सामाजिक न्याय हा भारतीय राज्यघटनेचा सर्वांत महत्त्वाचा आदर्श आहे. मोदी सरकारने समाजातील उपेक्षित घटकांचे उत्थान करण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम राबविले. संविधानाच्याच अनुषंगाने बोलायचे तर १०३ व्या दुरुस्तीचे उदाहरण पाहिले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षणाची तरतूद करणारी ही घटना दुरुस्ती २०१९ मध्ये म्हणजे मोदींच्या काळात झाली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी सरकारने आर्थिक साहाय्य, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात देणे सुरू केले आहे. 'मिशन वन धन'सारखे विशेष उपक्रम वनसंपत्तीचा वापर करून आदिवासी उद्योजकतेला प्रोत्साहन देणारे आहेत. महिला सक्षमीकरण हे मोदी प्रशासनाच्या सामाजिक न्यायाच्या धोरणांचे वैशिष्ट्य आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या कार्यक्रमांनी लैंगिक समानतेबद्दल जागरूकता निर्माण केली आणि महिला साक्षरता आणि आरोग्य निर्देशकांमध्येही सुधारणा घडवून आणल्या. 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजने'मुळे कोट्यवधी ग्रामीण कुटुंबांना एलपीजी कनेक्शन मिळाले. 'आयुष्मान भारत' हा जगातील सर्वात मोठा आरोग्य विमा कार्यक्रम आहे. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य प्रदान करणारी पीएम-किसान योजना, सिंचनासाठी मदत करणाऱ्या योजना इत्यादी कित्येक उदाहरणे संविधान बचावचे ढोंग करणाऱ्यांच्या तोंडावर फेकून मारता येतील. 'प्रधानमंत्री जन धन योजना' ही आर्थिक समावेशकतेला चालना देण्यासाठी परिवर्तनकारी पाऊल ठरली. कोट्यवधी भारतीयांनी झिरो बॅलन्सवर बँकेचे खाते सुरू केले. 'स्टार्ट अप इंडिया' उपक्रमाने तरुण भारतीयांमध्ये उद्योजकीय मानसिकता निर्माण केली. 'स्किल इंडिया' आणि 'स्टॅण्ड-अप इंडिया' यांसारख्या कार्यक्रमांतून महिला आणि मागासवर्गीय उद्योजकांसह उपेक्षित गटांना कर्ज, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळू लागले आहे. त्यांचे जीवन बदलते आहे. 'स्वदेश दर्शन'सारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळी पर्यटन पायाभूत सुविधा विकसित करणे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देऊन वारसा जतन करण्यास प्रोत्साहन देणे सुरू आहे. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' हा मंत्र सुसंवाद वाढविण्याच्या सरकारच्या कटिबद्धतेला अधोरेखित करणारा. अल्पसंख्यक समुदायांना मुख्य प्रवाहात विकासात आणण्याच्या प्रयत्नांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आणि आऊटरीच उपक्रम यांचा जाणीवपूर्वक समावेश केलेला आहे. मुद्दा असा की, संविधान बचाव म्हणजे नेमके काय, याचे उत्तर विरोधकांकडे नाही. त्यांनी आणिबाणी लावली. त्यांनी जातीयता वाढविली. त्यांनी लांगूलचालन केले. ते सारे घटनाविरोधी होते तरी ते आता संविधानाच्या रक्षणाचे ढोंग करतात. मोदींनी त्यांचे वस्त्रहरण करून त्यांना आरसा दाखविला आहे. त्या आरशात स्वतःचा चेहरा बघून संसदीय योगदान देण्याची संधी विरोधकांना अजूनही आहे, एवढेच त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

## चिंतन

# जीवन संपवणारी आग की...!

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

उत्तरप्रदेशातील झाशी जिल्ह्यात महाराणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयातील विशेष नवजात अर्भक विभागामध्ये शुक्रवार, १५ नोव्हेंबरच्या रात्री १० च्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत ११ मुलांचा मृत्यू ही घटना दुःखदच नाही तर रुग्णालयांमधील सुरक्षेबाबतच्या त्रुटी आणि घोर निष्काळजीपणावरही प्रकाश टाकते. देशात 'राष्ट्रीय नवजात सप्ताह' (१५ ते २१ नोव्हेंबर) सुरू असताना ही दुर्घटना घडली आहे. सर्व मुले ८० टक्के जळालेली आढळून आली आणि त्यांची हाडेही उघडी पडली. यावरून आगीच्या तीव्रतेचा अंदाज लावता येतो. आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या अर्धा डझन गाड्यांना पाचारण करावे लागले आणि त्यानंतरच आग आटोक्यात आणण्यात आली. रुग्णालयाच्या वार्डाच्या खिडक्या तोडून ३९ मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरमध्ये स्पार्किंगमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. आजूबाजूला धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे विशेष नवजात अर्भक विभागामध्ये ठेवण्यात आलेल्या मुलांना बाहेर काढणे कठीण झाले होते. तेथे ठेवण्यात आलेल्या अग्निशमन यंत्राची मुदत चार वर्षांपूर्वीच संपल्याचे समोर आले आहे.

अग्निशमन यंत्राची मुदत संपली नसती तर आगीवर नियंत्रण मिळविणे सोपे झाले असते आणि आगीत ११ अर्भकांचा बळी गेला नसता. आता या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्यांना कठोर शिक्षा होणार का, हा मोठा प्रश्न आहे. चांगली बाब म्हणजे या अपघाताच्या तपासाची जबाबदारी आयबीकडे सोपविण्यात आली आहे. आता फक्त आयबीच्या तपासातच आग कशी लागली? ही घटना निष्काळजीपणाचा परिणाम आहे की काही कटाचा भाग आहे? हे स्पष्ट होईल. मात्र, रुग्णालयांना आगीपासून वाचवायचे कसे, हा प्रश्न उरतो. अर्थात, केंद्र आणि राज्य सरकारने पीडितांना भरपाई देणे ही चांगली बाब आहे. परंतु, मृत आणि जखमींच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देऊन सरकार आपले कर्तव्य पार पाडते, हे पुरेसे नाही. रुग्णालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडणार नाहीत, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. त्यांच्या सुरक्षेसाठी भक्कम व्यवस्था असायला हवी. कारण रुग्णालय आणि इतर ठिकाणी आगीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. क्वचितच एखाद्या वर्षी रुग्णालयातील आगीमुळे रुग्णांच्या मृत्यूची बातमी वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होत नाही. जर रुग्णालयेच सुरक्षित नसतील आणि सुविधांनी सुसज्ज नसतील, तर तेथे काम करणारे कर्मचारी, डॉक्टर आणि रुग्ण कसे सुरक्षित असतील, यावर नक्कीच चिंतन करण्याची गरज आहे.

हॉस्पिटलमध्ये लागलेल्या आगीत जीव गमावण्याची ही पहिलीच वेळ नाही. उत्तरप्रदेशची राजधानी लखनौ येथील किंग जॉर्ज मेडिकल कॉलेज



(केजीएमयू) च्या ट्रॉमा सेंटरमध्ये शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत सहा रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला तसेच गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील एका खाजगी रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत आठ रुग्णांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या रुग्णालयात दाखल झालेले रुग्ण कोरोनाग्रस्त होते आणि जगण्यासाठी धडपडत होते. मात्र, रुग्णालयाच्या गलथान कारभारामुळे लोकांना जीव गमवावा लागला. गेल्या वर्षी ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस आणि एसयूएम हॉस्पिटलच्या आयसीयू वार्डमध्ये शॉर्ट सर्किटमुळे आग लागली होती; ज्यामध्ये दोन डझनहून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याचप्रमाणे कोलकाता येथील प्रख्यात खाजगी हॉस्पिटल ॲडव्हान्स्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (एएमआरआय) मध्ये दुर्दैवी आग लागली; ज्यात ९० हून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. मागच्या वर्षीच मध्यप्रदेश राज्यातील सतना जिल्ह्यातील एका खाजगी रुग्णालयात लागलेल्या भीषण आगीत ३२ नवजात बालके जळून राख होण्यापासून वाचली होती. आपल्या लक्षात येते की, सुप्रसिद्ध रुग्णालयेच नाही तर संकुले, विवाह सभागृह, हॉटेल्स, कोचिंग इन्स्टिट्यूट, मंदिरे, जत्रेची ठिकाणे, इमारती, शाळा, रेल्वे स्टेशन्स आणि इतर सार्वजनिक ठिकाणेही सुरक्षित नाहीत.

या घटनांमध्ये एक गोष्ट समान दिसून येते; ते म्हणजे आग रोखण्यासाठी कुठेही योग्य व्यवस्था नाही. गेल्या वर्षी गुजरातच्या सुरत येथील तक्षशिला कॉम्प्लेक्समध्ये भीषण आग लागली होती; ज्यात २३ जणांचा मृत्यू झाला होता. तेथेही आग विझविण्यासाठी योग्य व्यवस्था नव्हती. गेल्या वर्षी राजकोटमधील टीआरपी गेम झोनमध्ये लागलेल्या आगीत अनेक मुलांना आपला जीव गमवावा लागला होता. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुले तिथे खेळायला गेली होती. मात्र, आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. डिसेंबर १९९५ मध्ये हरयाणात शाळेच्या कार्यक्रमादरम्यान एका पंडालला आग लागल्याने सुमारे ४४२ मुलांचा मृत्यू झाला तसेच ६ जुलै २००४ रोजी तामिळनाडूतील कुंभकोणम जिल्ह्यात लागलेल्या आगीत ९१ शाळकरी मुलांचा मृत्यू झाला होता. गेल्याच वर्षी देशाची राजधानी दिल्लीतील तीन मजली व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत २७ जणांचा मृत्यू झाला होता. जानेवारी २०२१ मध्ये महाराष्ट्रातल्या भंडारा जिल्हा रुग्णालयातील विशेष नवजात केअर युनिटमध्ये लागलेल्या आगीत १० नवजात बालकांचा मृत्यू झाला होता.

२०१९ मध्ये राणी झाशी रोडवरील धान्य बाजारामध्ये लागलेल्या भीषण आगीत ४३ जणांचा मृत्यू झाला होता. दिल्लीच्या औद्योगिक क्षेत्रातील सेक्टर ५ मधील एका इमारतीत बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत सुमारे १७ जणांचा मृत्यू झाला. गेल्या वर्षी दिल्लीत झालेल्या किन्नरांच्या संमेलनादरम्यान एका पंडालला आग लागली; त्यात १६ किन्नरांना आपला जीव गमवावा लागला होता. जोपर्यंत रुग्णालयांचा प्रश्न आहे, सर्व राज्य सरकारांनी, सरकारी रुग्णालयांना अधिक चांगल्या सुरक्षेसह सुसज्ज सुरक्षिततेशिवाय सर्व बेजबाबदार खाजगी रुग्णालयांनाही भक्कम सुरक्षा व्यवस्था सुसज्ज करणे योग्य ठरेल. गरज भासल्यास त्यासाठी कठोर कायदे करा. नियमांचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांच्या चालकांना शिक्षा करा. कारण रुग्णालयातील आगीच्या घटना कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. सरकारी असो की खाजगी रुग्णालये सुरक्षा व्यवस्थेबाबत डोळेझाक करत असल्याचे अनेक सर्वेक्षणातून समोर आले आहे. परिणामी रुग्णांचे जीवन देवाच्या कृपेवर आहे. अशा स्थितीत देशातील सर्व सरकारी आणि खाजगी रुग्णालयांनी आगीपासून बचावासाठी आवश्यक त्या वेळी वापरण्यासाठी सुरक्षा उपकरणांसह व्यवस्था करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची तातडीने नियुक्ती करणे आवश्यक आहे. आगीपासून बचाव करण्यासाठी रुग्णालयांमध्ये सुरक्षा उपकरणे असतात; मात्र आग लागल्यास ती उपकरणे बचावासाठी वापरली जात नसल्याचे अनेकदा दिसून येते. याचे कारण रुग्णालयांमध्ये अग्निशामक प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. ही उपकरणे वेळीच वापरली तर लोकांचे प्राण वाचू शकतात. केवळ सुरक्षा व्यवस्थेबाबत रुग्णालये उदासीन नाहीत, हे दुर्दैव आहे. आता येथे विविध प्रकारचे घोटाळेही उघडकीस येत आहेत. खाजगी रुग्णालयांतून नवजात अर्भकांची चोरी करण्यापासून मानवी अवयवांची तस्करी करण्यापर्यंत अनेक वेळा वृत्तपत्रांमध्ये बातम्या येतात. आता रुग्णालये सेवेची केंद्रे बनण्याऐवजी अवैध पैसे कमविण्याची केंद्रे बनू लागली आहेत. ही परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आणि मानवतेला लज्जास्पद आहे. यावर वेळीच अंकुश लावणे गरजेचे आहे.

९९८७७४६७७६

## वेध

**विजय निचकवडे**

# मज फूलही रुतावे...

*'काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी;*
*मज फूलही रुतावे हा दैवयोग आहे!'*

पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या या नाट्य गीताची अनुभूती आज महाराष्ट्राच्या राजकारणात येऊ लागली आहे. राज्यात 'कमळ' दिमाखात फुलले आणि अनेकांची भांबावल्यागत अवस्था झाली. अनेकांची वाचाळी सुरू झाली. मग काय, 'मज फूलही रुतावे' या नाट्य गीताच्या ओळी सहज आठवून गेल्या. हे कमळाचे फूल इतके रुतू लागले की, आलेले बहुमत राक्षसी म्हणण्यापर्यंत केविलवाणी अवस्था होऊन बसली. आत्मविश्वास कसा असावा तर महायुतीच्या नेत्यांसारखा! निवडणुकांआधी आणि मतदान झाल्यानंतर निकाल लागण्यापूर्वी जणू काही विरोधकांचे मंत्रिमंडळ तयार आहे, असाच आविर्भाव महायुतीतील सर्वच नेत्यांमध्ये दिसून येत होता. विशेष म्हणून बोलण्याला प्रचंड ऊत आलेले 'रा'ऊतही हेच बोलत सुटले होते. नक्कीच लोकसभा निवडणुकीत मिळालेले यश त्यांना हे करण्यास भाग पाडत असावे. वाढलेला आत्मविश्वासही याच जोरावर असावा, कदाचित! सत्तेतील नेत्यांना अगदी खालच्या पातळीवर जाऊन बोलण्याइतपत धारिष्ट्य झाले होते. आणि हो, लोकसभेत त्यांचे खासदार अधिक निवडून आले, तेव्हा ईव्हीएम पण एकदम 'राईट' होते.

महाविकासचे सर्व जण बाशिंग बांधून तयार होते अन् अगदी वेळेवर मतदारांनी महायुतीच्या डोक्यावर अक्षदांचा पाऊस पाडत प्रचंड विश्वास टाकला. निकाल आले आणि कालपर्यंत मुख्यमंत्री आमचाच, सत्ता आल्यावर मिंध्यांपासून फडणवीसांपर्यंत सर्वांना तुरुंगात टाकू म्हणणारे बावचळले. ज्या ताकदीने कमळ राज्यात फुलले, ते यश विरोधकांच्या डोळ्यांपुढे अंधारी आणणारे होते. तेव्हापासून भांबावलेले राऊतांपासून पवारांपर्यंत सर्वच असंबद्ध बोलू लागले. एकीकडे कमळ फुलले, पण तेच कमळाचे फूल विरोधकांना रुतल्याचे त्यांच्या अवस्थेवरून स्पष्ट दिसत होते.



राऊत म्हणतात, मिळालेले बहुमत लोकशाही मार्गाने नाही. हे राक्षसी आहे. म्हणजे तुम्ही लोकांनी दिलेल्या निर्णयाचा अपमान करता असेच ना. एकीकडे लोकशाही सांगायची आणि दुसरीकडे जनमताचा अनादर करायचा, म्हणजे कमळाचे फुलणे जिव्हारी लागले असेच ना! पटोले यांनी तर निकाल आधीच ठरला होता, केवळ मतदान घेऊन दिखावा केला, असे बोलून टाकले. आता प्रदेशाध्यक्ष असे बोलले म्हणजे त्यांच्या मनावर किती आघात झाला, हे स्पष्ट होते. उद्धवाने तर महाराष्ट्राची दिशाच बदलल्याचे सांगितले. आता त्यांच्या पारड्यात मतं पडली असती तर महाराष्ट्र योग्य दिशेने आणि धोबीपछाड मिळाली तर दिशा बदलली म्हणणे म्हणजे महाराष्ट्र यांच्याच मालकीचा असल्याचे सांगणे नव्हे का? गुजरातला शपथ घ्या, बहुमत आलं तर काय तीर मारला या वक्तव्यातून विरोधकांची बाजू सावरण्याची केविलवाणी धडपडच दिसत आहे. आज लोकशाही संपली, असे म्हणणारे विरोधकांच्या मते ते जिंकले म्हणजेच लोकशाही जिवंत राहते, असे म्हणायचे आहे का?

निकाल लागून आज पाच दिवस होऊनही पराभवाचे समर्थन करण्यासाठी कारणे शोधली जात आहेत. हे करून केवळ त्यांच्याकडून स्वतःचे मानसिक समाधान करण्याचा प्रयत्न होत आहे, हे तेवढेच खरे! मात्र, एवढ्या दिवसात कायम गरळ ओकणाऱ्या एकाही नेत्याने मिळालेल्या विजयासाठी सत्ताधाऱ्यांचे अभिनंदन करण्याचे मोठे मन दाखविले नाही. आम्ही लोकशाही मानणारे आहोत. संविधान घेऊन आम्ही जाहीर सभांमध्ये भाषणे देत असू तर त्याच लोकशाही मार्गाने झालेल्या निवडणुकांच्या निकालाचा स्वीकार का करीत नाही? लोकांनी महायुतीच्या बाजूने दिलेला कल तुम्हाला राक्षसी वाटतो. निकालाला नावं, बोट ठेवून तुम्ही मतदारांच्या जनमताचा अनादर करताय, याचे तरी थोडे भान ठेवले गेले पाहिजे?

माणूस पराभवाने व्यथित होतो. पण राजकारण्यांना त्यातून सावरून समोरच्याचे यशही तेवढ्याच मोठया मनाने स्वीकारता यायला हवे. याची प्रचीती नागपूरचे काँग्रेसचे उमेदवार बंटी शेळके यांनी दिली. पराभूत होऊनही विजयी प्रवीण दटके यांचे तोंड गोड करीत शाल घालून कौतूक केले. एक लहान कार्यकर्ता हे करू शकत असेल तर त्यांच्या शिरस्थ नेत्यांना हे कळू नये, याचे नवल आहे. सत्तेच्या स्वप्नात रंगलेल्या विरोधकांपुढे अचानक फुलून आलेले कमळ चांगलेच रुतल्याचे वेगवेगळ्या वक्तव्यांमधून उघड होते. आता फूलही जर रुतत असेल तर त्याचे सामर्थ्य किती हे जाणूनच वागावे ना...

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# रिती होत चालली मने आणि माणसे!

**प्रा. दिलीप जोशी**

आजकाल आपले जीवन धर्माधिष्ठित, नीतिमूल्याधिष्ठित राहिले नाही त्यामुळे आता कोणाच्याच जवळ नैतिक बळ राहिलेले दिसत नाही. सर्वांचेच जीवन अस्थिर, अविवेकी आणि स्वअर्थी झाले आहे. रोज सकाळी नवा प्रश्न घेऊन तांबडं फुटते. दिवसभर त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी धडपड सुरू असते. दिवसभरात तो प्रश्न सुटतो न सुटतो तोच रात्री नवा प्रश्न आ वासून तयार असतो. प्रश्नांची सोडवणूक करताना आयुष्य केव्हा निघून जाते, हे आपले आपल्यालाच कळत नाही. आयुष्याच्या अडचणी सोडविण्याच्या नादात स्वतःकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळत नाही आपल्याला. 'बी.ए. हूये, नोकर बने, पेन्शन ली और मर गये!' हेच आपले जीवन झाले. काव्य, शास्त्र, विनोद, विरंगुळा या बाबींना स्थानच नाही. भजन-पूजन, संगीत-साधना यांचा तर दूर दूर संबंध नाही आपला. एखादे गणेश किंवा दुर्गा मंडळ, सामाजिक संस्था, संघटना यात सहभाग घ्यायचा नाही; फार नाही, पण एखाददुसरा मित्रही नसतो इतके आपण एकाकी झालो आहोत. समाजातील प्रत्येक बाबींत 'मला काय त्याचे?' किंवा 'माझा काय फायदा?' हीच भूमिका आपली. सतत 'मी आणि माझे' हा विचार पोखरून टाकतो आपल्याला. बहुतेकांना मरणाची भीती वाटते. कसं होईल? आणि काय होईल? या कायम निवासी भीतीमुळे सर्वांनाच रक्तदाब किंवा मधुमेह आहेच. जरासे संकट किंवा अडचण आली की, शरीर घामघूम, चित्त अस्थिर, मन विचलित, पोटात गोळा आणि हातपायात थरथरी. त्यामुळे चिडचिड होऊन घरातील वातावरण खराब होते. नेहमीच नाही, पण कधी कधी नाईलाजाने पोलिस स्टेशन, न्यायालयाला सामोरे जावे लागते. स्वतःचे नुकसान झाले तरी चालेल; आपला गुन्हा नसेल तरी अन्याय निमूटपणे सहन करणे या बाबीदेखील अंगवळणी पडल्या आहेत.



हे केवळ व्यक्तिगत विचार करण्याचे लक्षण आहे.

कोण निवडून आले पाहिजे? या साध्या आणि सोप्या प्रश्नाचे उत्तर द्यायला घाबरतात माणसे. रस्त्यात अपघातात तडफडणाऱ्या माणसाला पुढील ताप नको म्हणून मरू देणारेच अधिक आहेत. त्याला कारणही असते म्हणा! त्यांच्या स्वतःच्याच छोट्या छोट्या प्रश्नांनी ते इतके हैराण होतात की, इतर प्रश्न त्यांना पर्वताएवढे वाटतात. कुणाच्या मयताला, बारसे-तेरशाला, लग्न समारंभालाही न जाणारी संवेदनाशून्य माणसे भरपूर आहेत. मुकी होत आहेत माणसे. जराही मनाविरुद्ध झाले की आक्रस्ताळेपणा आणि मनाप्रमाणे झाले की हुरळून जाणे दोन्हीही घातक आहे. मनाचे हे संतुलन सांभाळता न येणाऱ्यांचे हे प्रमाण वाढते आहे. सतत विचारात राहणे हाही रोगच म्हणावा लागेल. खरं सांगू; सततचे विचार एकट्यात गर्दी करतात आणि गर्दीत एकटे पाडतात. अशी माणसे दिसतात आपल्याला नेहमी की जे आपल्याच तालात असतात. म्हणजे ना संसार नीटनेटका ना परमार्थविवेक फक्त ऐहिक सुखाच्या मृगजळामागे धावता धावता देह रिता होतोय फक्त देव-देश-धर्म यासाठी माणसे बोथट होत चालली.

'हम दो हमारे दो' म्हणजे आम्ही दोघे आणि आमची दोघे या व्यतिरिक्त इतरांना स्थानच नाही जीवनात. मायबाप, स्नेहीजन आपोआप गेलेत घराबाहेर. हा एकाकी राहण्याचा विचार जीवनाचा भाग बनला. आयुष्यात एकदाही रक्तदान न केलेली माणसेच आहेत सर्वत्र. जीवन म्हटले की चढउतार येणारच. संकटांना सामोरे जायचे असेल तर मन, मस्तिष्क आणि मनगट मजबूत हवे. त्यासाठी स्वतः व्यायाम, ध्यान, प्राणायाम करणे अत्यावश्यक आहे. स्वतःचा विचार झाल्यावर काही सामाजिक कार्यात सहभाग, मित्रमंडळी असणे आवश्यक आहे. गप्पाटप्पांमुळे मन मोकळे होते, मेंदू ताजा होतो आणि शरीरातील ऊर्जा वाढते. काही मिनिटे आपल्या इष्टदेवतेसमोर बसा, एखादा मंत्र, स्तोत्र नित्यनेमाने म्हणा. तुळशीला पाणी, गाईला नैवेद्य, कुत्र्याला भाकरी एखादं वेळेस करून तर पाहा. मंदिरात किंवा बाजारहाटसाठी सपत्नीक जाऊन तर पाहा; मग ऐश्वर्याचा विवेक, आहे त्यात समाधानी वृत्ती, अंथरूण पाहून पाय पसरणे, इतरांची सुखे पाहून अस्वस्थ न होणे शक्य होईल. असे केल्याने 'व्यष्टी'चा 'समष्टी' होतो. 'अहं'चा 'वयं' होतो. मनाचा विकास होतो, हृदय विस्तारित होते. बुद्धी, शक्ती आणि पराक्रम वाढीस लागतो. कुठलेही संकट येऊ द्या; हिमतीने सामोरे जाण्याचे कौशल्य येते. शरीर सशक्त तर मन सशक्त. मन सशक्त तर जीवन सशक्त. जीवनाचे हे युद्ध आपल्याला लढावेच लागेल.

'तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः।'

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### महाराष्ट्रातील जनतेला त्रिवार वंदन

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महाविकास आघाडीला धोबीपछाड देऊन महायुतीला भरघोस जागांनी विजयी केले. खोट्या आश्वासनांना बळी न पडता बंधू-भगिनींनी वास्तवाचा विजय केला यातच शिवरायांना मानवंदना दिली. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जनतेच्या मनात सत्याचे प्रबोधन केले त्यालाही मतदारांकडून प्रतिसाद मिळाला. कारण शेवटी हिंदुराष्ट्र हा महत्त्वाचा मुद्दा आहे हे नक्कीच. ज्यांनी महायुतीच्या मंडळींना प्रचारात सातत्याने शिव्याशापच देण्याचे काम केले त्यांना मतदारांनी योग्य जागा दाखवून आपली प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

यातच खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणाची याचाही निकाल लागला हेही नसे थोडके. माझा बाप, आमदार, चिन्ह चोरले असा गवगवा करणारे माझे मतदारही चोरले म्हणाले तर नवल नाही. शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा हा सुविचार अजूनही अनेकांच्या लक्षात का येत नाही? अशा वागण्याने अनर्थ घडतात याचा महाभारतातील ज्वलंत घटनेवरूनही बोध का होत नाही? नियती आपल्या मनाप्रमाणे चालते. कर्माची फळे भोगावीच लागतात. द्रौपदीने केलेला दुर्योधनाचा अपमान, कुंतीने दिलेल्या आदेशाचे पालन, दुर्योधनाच्या वर्मावर शब्दांनी घातलेला घाव यातून तर महाभारत प्रखर झाले आणि त्याचे दुष्परिणाम संपूर्ण परिवाराला भोगावे लागले म्हणूनच बेलगाम बोलणे, लिहिणे टाळले नाही तर प्रपंचात आणि जनमानसात महाभारत घडते हेच निवडणुकांच्या निकालाने दाखवून दिले आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### देव, देश आणि धर्मासाठी....

कालपासून, आपण निवडणुकांचे निकाल बघतो आहोत. आनंदाने उत्साहित आहोत. गेली दीड वर्ष, भटके विमुक्त विकास/ कल्याणकारी परिषद मार्फत घेतल्या गेलेल्या प्रयत्नांना अखेर यश आलं. वस्त्यावस्त्यांवर जाऊन सर्वेक्षण असो, शासनाच्या विविध योजनांची शिबिरे असोत या माध्यमातून भटके विमुक्त समाज बांधवांसोबत प्रत्यक्ष निरंतर संवाद होत राहिला. शासनाच्या विविध योजना भटके समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य परिषदेतर्फे झाले. हे सारे प्रत्यक्ष लाभार्थी आहेत. गेल्या दोन महिन्यात समाज मेळावे, वस्ती बैठकांचे आयोजन, पत्रक/पुस्तिका वितरण प्रत्येक संपर्कित वस्त्यांवर झाले. कशाचाही गवगवा नाही की गाजावाजा नाही. प्रत्यक्ष उमेदवारांना सुद्धा माहिती नसेल की त्यांच्यासाठी कोण कुठून काम करतोय्. अगदी शिस्तबद्ध, सुनियोजित आणि प्रचंड सूक्ष्म नियोजन करून केलेलं हे कार्य १०० टक्के मतदान होण्यास कारणीभूत आहे, असं म्हटलं तर ते वावगं होणार नाही. अदृश्य शक्ती कार्यरत आहे असं म्हणणाऱ्या आमच्या सन्माननीय ताईंनी, हीच ती अदृश्य शक्ती हे अवश्य समजून घ्यावं. देव, देश आणि धर्माच्या रक्षणासाठी जगण्याचा वारसा, ज्यांना प्राप्त झाला आहे तो, आमचा भटके-विमुक्त समाज बांधव जागृत झाला आणि आपल्या बहुमूल्य मतांचे भरभरून दान युतीच्या पारड्यात टाकलं. आम्ही केवळ घेणारे नाही, देणारेही आहोत, हेच मुळात आमच्या या समाजबांधवांनी दाखवून दिले हे वास्तव आहे. महायुतीच्या या अतिप्रचंड विजयात, आमच्या भटके विमुक्त समाज बांधवांचा खारीचा वाटा आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रात अभूतपूर्व यश विद्यमान सरकारला मिळालं, त्यात विविध योजनांचा झालेला लाभ, सुशासन आणि धर्म रक्षणासाठी कटिबद्ध असणार सरकार ही मूळ भावना होती असं वाटतं. आज एक है तो सेफ है हा नारा धार्मिक वाटत असला तरी विविध पक्षांच्या मतदारांनी आपली मतं अधिकृत उमेदवारांनाच देऊन, वरील नारा किती समर्पक होता, हेच दाखवून दिलं आहे.

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

### लाडक्या बहिणींनी उचलून धरले

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पीछेहाटीनंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणिवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. याउलट महाविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर महायुती खडबडून जागी झाली आणि त्यांनी अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक होती. ही योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## चव्हाण विजयी झाल्याने कुबेर भंडारी गुजरात येथे करणार महादुग्धाभिषेक- चिकाळेकर



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर :** भोकर विधानसभेच्या भाजप महायुतीच्या उमदेवार श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या विजयासाठी गुजरातमधील प्रसिद्ध कुबेर भंडारी देवस्थानला महादुग्धाभिषेक करणार असे साकडे सुभाष देशमुख चिकाळेकर घातले होते. आता श्रीजयताई आमदार झाल्यामुळे पुढील महिन्याच्या अमावश्येला आपण कुबेर भंडारी देवस्थानला जाऊन महादुग्धाभिषेक करणार असल्याची माहिती सुभाष देशमुख चिकाळेकर यांनी दिली. भोकरच्या विकासाचे स्वप्न पाहणाऱ्या व तरूण तडफदार नेतृत्व असलेल्या ॲड. श्रीजयाताई चव्हाण यांची भोकर मतदारसंघाप्रती असलेली आत्मियता व काम करण्याची पद्धत पाहून अख्खा मतदारसंघ भारावून गेला आहे. नवनिर्वाचित आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या रूपाने भोकर मतदारसंघाला तडफदार, अभ्यासू, विकासाची जाण असलेले नेतृत्व लाभले आहे. सुभाष देशमुख हे चव्हाण घराण्याचे निकटचे आणि विश्वासू मानले जातात. कोरोना महामारीने माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनाही घेरले होते, त्यावेळीही देशमुख यांनी कुबेरनाथ देवस्थान येथे जावून त्यांच्यासाठी महामृत्यूंजय अभिषेक करून त्यांना या महामारीतून मुक्ती मिळावी यासाठी प्रार्थना केली होती.

ॲड. श्रीजयाताई चव्हाण यांना भोकर मतदारसंघात राजकारणात एन्ट्री द्यावी, अशी विनंती मागील पाच वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याकडे केली होती. तसेच या विधानसभा निवडणुकीतही त्यांना उमेदवारी द्यावी, असाही आग्रह देशमुख यांनी सर्वप्रथम केला होता. विधानसभा निवडणुकीत श्रीजयाताई चव्हाण यांचा दणदणीत विजय झाल्यामुळे आपला नवस पूर्ण करण्याचा संकल्प देशमुख यांनी केला आहे.

# शहीद जवान सुधाकर राठोड यांच्या पार्थिवावर शासकीय इंतमामात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. २७ नोव्हेंबर**
मुखेड तालुक्यातील बा -हाळी जवळील हिरानगर येथील व सध्या काश्मीर मधिल सियाचीन ग्लेशियरभागात कर्तव्य बजावत असतांना शहिद झालेले हवालदार सुधाकर शंकरराव राठोड यांच्या वर आज हिरानगर तांडा येथे शासकीय ईतमामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

हिरानगर ता.मूखेड येथील सूधाकर शंकरराव राठोड (वय ४० वर्षे) हे लष्करात हवालदार पदावर कार्यरत होते. जगातील सर्वात उंच रणभूमी असलेल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असणाऱ्या जम्मू काश्मीर येथील सियाचीन ग्लेशियर येथील चौकि वर कार्यरत होते. बर्फाचे



वादळ, ऑक्सिजन ची कमी ,शत्रू व वातावरणाशी दोन हात करतांना मेंदूला ऑक्सिजन पूरवठा अत्यंत कमी झाले असल्याने आजारी पडले त्यांना त्वरीत पूढील उपचारासाठी चंदिगढ येथे हलविण्यात आले होते. पण त्यांचे २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा.उपचारादरम्यान म्रृत्यु झाला. त्यांच्या पश्चात पत्नी एक मूलगा(८वर्षे),ऐक मूलगी (६वर्षे),भाऊ मधूकर व आई आहेत त्यांचे पार्थिव काल सकाळी हैदराबाद येथे हवाई मार्ग तर हैदराबाद येथून रस्ते मार्ग हिरानगर येथे मूखेड, बा-हाळी मार्ग जात असताना रस्त्याच्या दुतर्फा शालेय विद्यार्थी, माजी सैनिक, सामान्य जनता मोठ्या संख्येने पूष्प व्रष्टि व जयजयकार करीत होते.शहिद सूधाकर राठोड यांच्या पार्थिवावर शासकीय ईतमामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.या वेळी सैन्य दल व पोलीस दलाकडून हवेत फायर झाडत मानवंदना दिली यावेळी १२७ एलटी.अड.रजि कर्नल प्रशांत ठाकूर, बँटरी कमांडर मेजर शिवम, स्टेशन हेडकॉटर संभाजी नगर ९७आरटी ब्रिगेड मेजर दिपरंजन यादव प्रशासनाच्या वतीने उपजिल्हाधिकारी अनूप पाटील, तहसीलदार राजेश जाधव,गटविकास अधिकारी सि.एल.रामोड, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, स.पो.नि.भालचंद्र तिडके, पो. उप.नि.अमर केंद्रे आ.तुषार राठोड यांच्या मातोश्री माजी नगराध्यक्ष चक्रावतीबाई राठोड, जि.सै. कल्याण संघटक विठ्ठल कदम, माजी सैनिक ज्ञानेश्वर डुमणे, लक्षण देवदे, बालाजी चूकलवाड,रामराव थडके, अर्जुन जाधव, भगवान नागरगोजे, देवराव झगडे,प्रकाश कस्तूरे, संजय राठोड, खंडेराव मंगनाळे आदिनी श्रध्दांजली अर्पण केली. राजे छत्रपती अॅकॅडमीचे संचालक तथा सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डूमणे यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने अस्मरणीय सन्मानपूर्वक नियोजन केले. प्रचंड जनसमुदायाला कंट्रोल करण्यासाठी राजे छत्रपती अॅकॅडमीतील ३०० ते ४०० विद्यार्थ्यांनी प्रशासनाला मदत केली. या प्रसंगी सैन्य दलाचे अधिकारी, तालुका तसेच जिल्ह्यातील शेकडो आजी-माजी सैनिक, मंडळ अधिकारी जांभळे,तलाठी तोतरे,ग्रामसेवक मणियार यांच्या सह जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते..

## समाजकल्याण कार्यालयामार्फत संविधान अमृत महोत्सव दिनानिमित्त संविधान रॅली; शेकडो नागरिकांचे संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**
नांदेड,दि २६ नोव्हेंबर :महाराष्ट्र शासनाचे सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय नांदेड यांच्यावतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान अमृत महोत्सव दिनानिमित्त घर-घर संविधान रॅली आयोजित करण्यात आली. शेकडो नागरिकांनी संविधान प्रस्ताविकेचे केलेले सामूहिक वाचन लक्षवेधी ठरले.

यानिमित्ताने गिरीष कदम , अतिरिक्त आयुक्त, मनपा नांदेड व संजय जाधव उपायुक्त, मनपा, श्रीमती सुप्रीया टवलारे, उपायुक्त मनपा,शिवानंद मिनगीरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड, सतेंद्र आऊलवार जिल्हा समाज कल्याण अधिकारी, डी.वाय पतंगे ,सहय्यक लेखाधिकारी तसेच अशोक गोडबोले, माधव जमदाडे



व भिमराव हटकर,सामाजिक कार्यकर्ते नांदेड यांनी महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तद्नंतर गिरीष कदम , अतिरिक्त आयुक्त, शिवानंद मिनगीरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांनी हिरवी झेंडी दाखवून संविधान रॅलीची सुरुवात केली.

सदर संविधान रॅलीचा मार्ग महात्मा ज्योतीबा फुले पुतळा ते शिवाजी नगर, कलामंदिर. मुथा चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ संविधान प्रस्ताविकेचे सामुहिक वाचन करण्यात येवून राष्ट्र गीताने संविधान रॅलीची सांगता करण्यात आली. यावेळी मा.श्री शिवानंद मिनगीरे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड यांनी भारतीय राज्यघटना ही जगातील सर्वश्रेष्ठ राज्य घटना असून जिल्हयातील सर्व नागरिकांनी त्याचा अभ्यास करावा व घटनेने दिलेल्या अधिकार व कर्तव्य त्यांचे पालन करावे असे मनोगत व्यक्त् केले.

सदर कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण नांदेड कार्यालयातील अधिकारी कर्मचारी ,जात पडताळणी कार्यालय अधिकारी कर्मचारी , जिल्हा समाज कल्याण जिल्हा परिषद नांदेडचे अधिकारी कर्मचारी तसेच इतर मगासव बहुजन कल्याण विभागाचे अधिकारी ,कर्मचारी, नांदेड जिल्हयतील विविध महमंडळचे व्यवस्थापक व कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी, सामजिक कार्यकर्ते तसेच बार्टीचे प्रकल्प अधिकारी व समतादूत यांची उपस्थिती होती.

सदर संविधान रॅलीमध्ये पोलिस अधिक्षक कार्यालीयातील पोलिस बँड पथक ,कर्मचारी बँड पथक संच यांनी देशभक्ती गिते सादर केले तसेच सदर संविधान रॅली मध्ये, नांदेड जिल्हयातील एन.एस.बी महाविद्यालय नांदेड , सायन्स कॉलेज नांदेड ,नेहरु युवा केंद्र , विद्यार्थी सहभागी झाले होते व वसंतरावनाईक महाविद्यालय, जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय, सायन्स कॉलेज मधील राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला सदर शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक ,कर्मचारी तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळेतील कर्मचारी हे संविधान अमृत महोत्सव घर-घर संविधान रॅलीत सहभागी झाले होते. तसेच नांदेड जिल्हयातील नागरीकांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती. सदर रॅलीची सांगता सविंधानाचे प्रस्ताविकाचे सामुहिक वाचन करुन करण्यात आली.

## भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा- गुणवंत मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**
जगातील २४३ देशांच्या पाठीवर भारतीय लोकशाही ही सर्वश्रेष्ठ लोकशाही असून भारतातील तळागाळातील माणसांसाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्य विकासात्मकदृष्ट्या व देशाची अखंडता अबाधित ठेवून समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय ही मूल्ये राज्यघटनेने प्रदान केलेली असून भारतीय संविधान हा भारत देशाचा आत्मा आहे, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.

ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. २६ नोव्हेंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता ७५ वा भारतीय संविधान दिन (अमृत महोत्सवी वर्ष) म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या संविधान दिन कार्यक्रम सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



सर्वप्रथम आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते संविधान उद्देशिका (प्रियाम्बल) तैलचित्र प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना ते आपल्या भाषणात म्हणाले की, भारतरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ आंतरराष्ट्रीय देशांच्या कायद्याचा अभ्यास करुन दोन वर्षे ११ महिने १८ दिवस अहोरात्र मेहनत घेऊन आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर राज्यघटनेत ३९५ कलमे, १२ परिशिष्ट सामावून महान असा भारतीय संविधान ग्रंथ या भारत देशाला सुपूर्द केला म्हणून आज प्रत्येक भारतीय नागरिकांनी संविधान रक्षणाप्रती सजग राहून संविधानाचे वाचन करणे ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करुन आगारातील सर्व कामगार- कर्मचाऱ्यांना उद्देशिकेची शपथ दिली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ, वाहतुक नियंत्रक सुनील मोरे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक संतोष ढोले, नितीन मांजरमकर, सुनीता हुंबे, श्वेता तेलेवार, शिल्पा ढवळे, वैष्णवी गंदेवार, मनिषा कदम, संगीता वाघमारे, प्रियंका खरात, वाहक रविचंद्र पांडागळे, श्रीकांत अंकुशे, कृष्णा पवार, संजय मंगनाळे, संदीप देशमुख, शिवचरण मळगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## रब्बी हंगामातील पोषक वातावरणामुळे हरभरा पिके बहरु लागली

### तालुक्यातील पोषक वातावरणामुळे नरसी सह परिसरातील हरभरा,तूर,गहू जोमात!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव ,दि. २७ नोव्हेंबर**
रब्बी हंगामातील पोषक वातावरणामुळे तालुक्यातील नरसी ,होटाळा , कांडाळा,धानोरा ,मुगांव ,बेंद्रीखंडगाव या परिसरातील हरभरा,टाळकी,तुर यासारख्या पिकांना पोषक वातावरण असल्याने परिसरातील पिक बहरली असल्याने शेतकऱ्यांच्या गोटात सध्या आनंदाचे वातावरण पसरले आहे

नायगांव तालुक्यातील नरसी ,होटाळा ,कांडाळा ,धानोरा, ,मुगांव,बेंद्रीखंडगाव या परिसरातील एकुण जमिनीच्या क्षेत्र फळा पैकी सर्वात जास्त क्षेत्र जिरायती जमिनीचे आहे. त्या मुळे या परिसरातील शेतकरी अतिशय काबाडकष्ट करीत. प्रतीवर्षांमध्ये येथील शेतकरी नगदी पिकांच्या लागवडीकडे ज्यास्त प्रमाणात भर देत असतो. येथील शेतकरी



आर्थिक बजेटचे नियोजन करीत वर्षभराची पुंजी खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनांवर अवलंबून असतो. त्यामूळे या परिसरातील शेतकरी आर्थिक बजेटचे नियोजन करीत.सोयाबीन,उडीद ,मूग ,तुर ,या सारख्या नगदी पिकांची लागवड करण्यासाठी सातत्याने कल असतो. परंतू यंदाच्या खरिप हंगामा वेळी जून महिन्यातील पहिल्या आठवड्यात लवकर काही पाऊस झाला नाही.तरी येथील पिके ही अधून मधून कोसळणाऱ्या पावसाच्या सरीमुळे पिकचांगली बहरत गेली होती. परंतू जुलै महिन्यातील शेवटच्या आठवड्यात या परिसरातील काही भागातील मुग,उडीद ऐन शेंगांच्या भरात भरत असतांना सततच्या झालेल्या पावसामुळे मुग उडीद या सारख्या पिकाच्या उत्पादनात विक्रमी तुट झाली आहे तर दुसरीकडे सोयाबीन या पिकावर 'येलोमोझ्यॉक' सारखा बुरशी नाशक रोगांमुळे पिकांच्या उत्पादनामध्ये विक्रमी घट झाली तर दुसरीकडे राज्य शासनाने विक्रमी घट झालेल्या उत्पादनाला योग्य हमीभाव मिळाला नसल्याने.या परिसरात तील शेतकर्याला घरात साठवून ठेवलेले सोयाबीन दिवाळी च्या मुहूर्तावर कवडीमोल भावाने परिसरातील आडत व्यापार्याना देण्याची वेळ येथील जिरायत जमीनदारावर आली. परतू येथील शेतकरी खरिप हंगामातील नगदी पिकांच्या उत्पादनात झालेली विक्रमी तुट भरुन काढण्या साठी हरभरा ,टाळकी ज्वारी , या सारख्या पिकांची लागवड केली असुन सध्या राज्यात गेल्या काही दिवसांपासून हरभरा ,टाळकी ज्वारी,तुर गहू आदि पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले असल्यामुळे सध्या या परिसरातील हरभरा,टाळकी ज्वारी,तुर,गहू आदि पिके ही शेती शिवारात बहरु लागल्याने खरिप हंगामातील पिकांच्या उत्पादनात विक्रमी झाले ली रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनातून नक्कीच भरुन निघेल अशाळ भुत आशेने तालुक्यातील शेतकरी वर्गाच्या गोटात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

## स्वारातीम विद्यापीठ येथे संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने संविधान दिनाच्या निमित्ताने दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सकाळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ विष्णुपुरी नांदेड येथे दिनांक २६ नोव्हेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने संविधान दिनाच्या निमित्ताने संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तत्पुरवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, डॉ. आंबेडकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. पी. विठ्ठल, उपकुलसचिव डॉ. सरिता यन्नावार, डॉ . अशोक कदम,शिवराम लुटे, सिस्टीम एक्सपर्ट सुनील जाधव, रशीद शेख यांच्यासह अधिकारी व विद्यार्थी यांची उपस्थित होते.

## मुदखेड येथील युनिव्हर्सल पब्लिक स्कूल शाळेला दोन पुरस्कार प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २७ नोव्हेंबर**
दि. २६ नोव्हेंबर एडऋ्र् च्या चौथ्या आवृत्तीत (शिक्षण पुरवठा आणि फ्रँचायझी एक्सपो २०२४ युनिव्हर्सल पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज,मुदखेड

या शाळेला नांदेड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळेनी पुरस्कार पटकावला आहे.

स्टार एज्युकेशन अवॉर्ड २०२४ दिनांक २६ नोव्हेंबर रोजी एम. एम. आर. डि. ए. बी. के. सी. मुंबई येथे शाळेचे संचालक राजाराम एकनाथ हाळदे यांनी नांदेड जिल्ह्यातुन सर्वोत्कृष्ट शाळा पुरस्कार स्विकार-२०२४, केला व सोबतच सौ. पार्वती हाळदे, यांना बेस्ट प्राचार्या पुरस्कार प्राप्त झाला तोही पुरस्कार शाळेचे संचालक राजाराम एकनाथ हाळदे यांनी स्विकारले आहे एका तालुक्यातील एकाच शाळेला



स्टार एज्युकेशन अवार्ड-२०२४, दोन पुरस्कार प्राप्त झाले आहेत युनिव्हर्सल पब्लिक स्कूल व ज्युनियर कॉलेज मुदखेड

या नांदेड जिल्ह्यातील सर्वो त्कृष्ट शैक्षणिक संस्थांमार्फत शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित केले आहे. हे स्वप्न प्रत्यक्षात युनिव्हर्सल पब्लिक स्कूल व ज्यूनियर कॉलेजने आणल्याबद्दल शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि समर्थक कृतज्ञतेचे पात्र आहेत. एकत्रितपणे, युनिव्हर्सल पब्लिक स्कूल शाळेच्या संचालकानी शिक्षण आणि सर्वांगीण विकासामध्ये नवीन मानदंड स्थापित केला आहे.

## संविधान दिनानिमित्त नांदुसा जिल्हा परिषद शाळेत विशेष कार्यक्रम

### मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. २७ नोव्हेंबर**
२७- भारतीय संविधान दिनाचा कार्यक्रम नांदेड तालुक्यातील नांदुसा येथील जिल्हा परिषद शाळेत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. मीनल करनवाल यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून त्यांच्या भाषणांना प्रोत्साहन दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करत त्यांचे भविष्य, आवडीनिवडी आणि उद्दिष्टांबाबत प्रश्न विचारले. त्यांनी भारतीय संविधानाचे महत्व समजावून सांगताना, संविधानाच्या निर्मितीमागील प्रक्रिया, घटनेतील सदस्यांची माहिती आणि त्यातील वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला. यावेळी इयत्ता तिसरीतील रुद्रमल्हार



जनकवाडे याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत केलेले सादरीकरण प्रभावी ठरले. त्याच्या भाषणाने उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाला सरपंच पूजाताई जनकवाडे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष गजानन जनकवाडे, भारत जनकवाडे, सदानंद जनकवाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक शुभम तेलेवार, केंद्रप्रमुख विजयकुमार धोंडगे, मुख्याध्यापक रावसाहेब पऊळ यासह सहशिक्षिका मंगल पवार, शैलेश पारसेवार, मयाताई अल्लापुरे, जयश्री पाटील, सुनिता गुड्डा, मिनाक्षी फुलारी, उदगीरे मॅडम, अंगणवाडीताई, पालक व गावकरी यांची यावेळी मोठया संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हायवा ऊसाच्या शेतातून नेण्यास विरोध केल्याने वाळू माफियांचा शेतकऱ्यांवर कोयत्याने हल्ला







**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२७ नोव्हेंबर**

वाळू वाहतूक करणारी हायवा ऊसाच्या शेतात घातल्याने संतप्त शेतकऱ्यांनी हायवा अडविण्याचा प्रयत्न केला. यावेळी चवताळलेल्या वाळू माफियांनी आमची गाडी अडवता, तुमची एवढी हिंमत असे म्हणत पाच शेतकऱ्यांवर कोयत्याने हल्ला केल्याची घटना काल चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील सुरळेगाव (ता. गेवराई) येथे घडली.

वाळू माफियांनी केलेल्या कोयता हल्ल्यात पाच जण जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. या सर्व जखमींवर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू असून पोलीसांनी येऊन जखमींचा जवाब नोंदविला. दरम्यान गेवराई, चकलांबा आणि तलवाडा पोलीसांच्या आशिर्वादामुळे गोदापट्ट्यातील वाळू माफियांची डेरींग वाढली असुन त्यांनी थेट शेतकऱ्यांवरच हल्ला केला. अशा वाळू माफियांवर गंभीर स्वरूपाचे गुन गुन्हे दाखल करून संबंधीत ठाणे प्रमुखांवर देखील कारवाई करावी अशी मागणी होवू लागली आहे.

गेवराई तालुक्यातील सुरळेगाव येथील एका ऊसाच्या फडात ऊस तोडणी सुरू असतांना वाळू वाहतूक करणारी भरधाव हायवा ऊसाच्या शेतातून जात असल्याचे पाहुन संतप्त शेतकऱ्यांनी वाळूची हायवा अडवली. यावेळी सात ते आठ वाळू माफियांनी युवराज अंकुश सिरसाट, जनार्धन नामदेव सिरसाट, देविदास भूषण सिरसाट, नारायण अंकुश सिरसाट, बळीराम नामदेव सिरसाट (सर्व रा. सुरळेगाव) यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. यामध्ये सर्वजण जखमी झाले असुन युवराज सिरसाट (वय ३८) यांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असुन या प्रकरणात चकलांबा पोलीसांनी जिल्हा रुग्णालयात येवून जखमींचा जवाब नोंदविला.

# तेजज्ञान फाऊंडेशनच्या 'ध्यान' महोत्सवाची अंबाजोगाई येथे उत्साहात सांगता

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ नोव्हेंबर**

तेजज्ञान फाऊंडेशनच्या 'रजत जयंती ध्यान महोत्सव'चे आयोजन शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे करण्यात आले होते. या महोत्सवाची उत्साहात सांगता झाली.

'हॅपी थॉट्स' नांवाने ओळखली जाणारी 'तेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशन' ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे. या विशेष प्रसंगी, फाऊंडेशन तर्फे रविवारी शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे 'रजत जयंती ध्यान महोत्सव' (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध डॉ.शंकर धपाटे (अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय), अविनाश भारती (प्रसिद्ध व्याख्याते, युवा कवी तथा किर्तनकार) आणि प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.वनिता उन्हाळे मॅडम या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी कार्यक्रमाच्या सुरूवातीस बोलताना धनंजय इंगळे यांनी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांचा आणि त्यांच्या आध्यात्मिक कार्याचा परिचय करून देत केली. त्यांनी उपस्थितांना तेजज्ञान फाउंडेशनच्या जागतिक शांततेसाठीच्या कटिबद्धतेचा उल्लेख करत, बाहेरच्या जगतात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रथम अंतर्मनात शांतता निर्माण करणे आवश्यक आहे, असे समजावले. जीवनात 'स्वल्पविराम' घेण्याचे महत्व पटवून देत, हातातील मोबाइल काही वेळ बाजूला ठेवून ध्यानात बसल्यास, ध्यानाद्वारे आयुष्यात हा स्वल्पविराम निर्माण होईल आणि आपल्या सर्वोच्च आनंदाचा, 'स्व-अनुभव' होईल, असे इंगळे म्हणाले. तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.वनिता उन्हाळे मॅडम यांनी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे असे सांगून तेजज्ञान फाउंडेशन तर्फे आयोजित या ध्यान महोत्सवाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरविण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देण्यात आली असल्याचे उन्हाळे मॅडम यांनी सांगितले. या प्रसंगी डॉ.शंकर धपाटे आणि अविनाश भारती यांनी ही तेजज्ञान फाऊंडेशनच्या वतीने 'रजत जयंती ध्यान महोत्सव'चे उत्तम आयोजन केल्याबद्दल कौतुक केले. तसेच त्यांनी आपल्या विचारांतून उपस्थितांना संबोधित केले आणि साधनेसाठी प्रेरणा दिली. या कार्यक्रमात तेजगुरू सरश्री यांचा ध्यानावर मार्गदर्शन करणारा व्हिडिओ संदेश दाखविण्यात आला. सरश्रींनी यात ध्यान का आणि कसे करावे, तसेच ध्यानाचे वरवरचे तसेच अंतिम लाभ म्हणजे 'मी कोण आहे?' या प्रश्नाचे उत्तर शोधणे, यावर प्रकाश टाकला.



मी कोण आहे ? हा शोध घेणे मानवी जीवनाचे अंतिम उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सर्व उपस्थितांना २१ मिनिटांचे ध्यान अनुभवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले, ज्यातून उपस्थितांना 'स्व-अनुभव' मिळाला. या कार्यक्रमाला १०० पेक्षा अधिक साधक आणि नागरिक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय इंगळे यांनी रंगतदार पद्धतीने केले आणि फाउंडेशनच्या २५ वर्षांच्या प्रवासाची ओळख उपस्थित श्रोत्यांना करून दिली. कार्यक्रमाच्या समारोपात, जवळपास सर्व उपस्थितांनी २१ दिवसांचे ध्यान चॅलेंज घेण्याचा संकल्प व्यक्त केला. तेजज्ञान फाउंडेशन तर्फे अशा प्रकारचे कार्यक्रम भारतातील सुमारे १२५ शहरांमध्ये आयोजित करण्यात आले आहेत, ज्यामुळे संपूर्ण देशभर ध्यानाच्या माध्यमातून शांतता आणि आनंदाचे सशक्त वातावरण निर्माण होत आहे हे उल्लेखनीय आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तेजज्ञान फाऊंडेशन, शाखा अंबाजोगाईच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# नाभिक समाजाच्या शैक्षणिक वैभवात मानाचा तुरा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ नोव्हेंबर**



नाभिक समाजातील डॉ.अण्णासाहेब भगवानराव काळे यांचे चिरंजीव, इंजि.श्री.गोविंद अण्णासाहेब काळे (Software Engineer ) यांची फ्रँकफर्ट,जर्मनी (Germany) येथील नामांकित खढ कंपनी या ठिकाणी निवड झाल्यानिमित्त नाभिक समाज संघटना केज तालुका व शहर यांच्यावतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी नाभिक संघटनेचे केज तालुका अध्यक्ष श्री.नवनाथराव टोपे, माजी अध्यक्ष श्री.अनंतराव राऊत, शहर अध्यक्ष मनोज काळे ,युवक अध्यक्ष श्री अविनाश काळे, तालुका संघटक श्री. अशोक पवार, किरण कुलकर्णी (देवा) यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गोविंद यांचा शैक्षणिक प्रवास खूप बिकट परिस्थितीमध्ये झाला,१०वी नंतर त्यांनी पुढील इंजिनिअरिंग चे शिक्षण पुण्यातून पूर्ण केले आणि अभियांत्रिकी (Bachelor of Engineering) करून Wipro,-ccenture आणि Tata Technology अश्या नामांकित कंपनी मध्ये काम करून त्यांना जर्मनी याठिकाणी संधी मिळाली आणि त्यांना युरोप येथील इडणए उ-ठऊदेखील मिळाले आहे.सध्या ते सहपत्नी सौ.सोनम शरदराव मोटेगावकर यांच्यासोबत जर्मनी याठिकाणी वास्तवास आहेत,त्यांचा सामान्य कुटुंबातील हा प्रवास खूप मोलाचा व आदर्श घेण्यासारखा आहे.

गोविंद यांचे मनोगत

गोविंद यांच्या प्रवासात त्याच्या परिवाराचे व सल्लागारांचे मोलाचे योगदान आहे,खडतर प्रवासात जिद्द, चिकाटीच्या आणि मेहनतीच्या जोरावर त्यांना यशाचे शिखर गाठता आले, असे यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त केले.

# बीडमध्ये रंगणार जिल्हास्तरीय युवा महोत्सव

## सहभागासाठी ०२ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ नोव्हेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय व बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ०४ ते ०५ डिसेंबर या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील जास्तीत जास्त युवक व युवतींनी यामध्ये सहभागासाठी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज ०२ डिसेंबरपर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत बीड येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल इमारत येथे सादर करून महोत्सवात सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तालुका क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण यांनी केले आहे. मुदतीनंतर येणारे व स्पर्धेच्या दिवशी वेळेवर येणारे प्रवेश अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

जिल्हास्तर युवा महोत्सवात संकल्पनांवर आधारित स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम यात समूह लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास कार्यक्रम यात कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, कविता गायन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमात समूह लोकनृत्य स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम सात, द्वितीय पाच तर तृतीय बक्षीस तीन हजार रुपये देण्यात येईल. लोकगीत स्पर्धेसाठी विजेत्यास प्रथम बक्षीस पाच, द्वितीय तीन तर तृतीय दोन हजार ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार आहेत.

कौशल्य विकास कार्यक्रमात कथालेखन १००० शब्द मर्यादा लेखनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत स्पर्धा होईल. तसेच चित्रकला, हिंदी व इंग्रजी भाषेतील वक्तृत्व स्पर्धा व कविता (होणार आहे. विजेत्यास प्रथम बक्षीस ३ हजार, द्वितीय २ हजार तर तृतीय १ हजार ५०० रुपये बक्षीस देण्यात येईल. त्याचप्रमाणे संकल्पनांवर आधारित स्पर्धा विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नवसंकल्पना योगदान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यास प्रथम बक्षीस पाच हजार, द्वितीय बक्षीस तीन हजार, तर तृतीय बक्षीस दोन हजार रुपये देण्यात येणार आहेत.

युवा महोत्सवात सहभागासाठी स्पर्धकांचे वय १५ ते २९ वर्षे असे राहील. जन्म तारखेबाबत सबळ पुरावा जोडणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी स्पर्धक हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, स्पर्धकांनी नाव, पत्ता, जन्मतारीख, संपर्क क्र. ईमेल आयडी, व याबाबत सबळ पुरावा सादर करणे आवश्यक आहे. त्याकरिता स्पर्धकांनी विहित नमुन्यात प्रवेश अर्ज व ओळखपत्र ०२ डिसेंबर पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, सहयोग नगर, जालना रोड, बीड येथे करावेत.

युथ आयकॉनसाठी दोन डिसेंबर रोजी दुपारी ३ पर्यंत मुदत

युवक कल्याण क्षेत्रात तसेच युवांना प्रभावित करणारे कार्य केलेले १५ ते २९ वयोगटातील युवा यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे ०२ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत माहिती सादर करावी. (युवांनी नाव, पत्ता, इ-मेल आयडी, संपर्क क्रमांक व युवांनी केलेल्या कार्यांची संक्षिप्त माहिती अंदाजित २००० शब्दात द्यावी. ) युथ आयकॉन मधील विजेत्यांना नियमाप्रमाणे देय बक्षीसे असतील.

अधिक माहितीसाठी येथे साधा संपर्क

युवा महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या जिल्ह्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, कृषी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था महाविद्यालये व इतर विद्यालयांनी सहभागासाठी नियम व विहित नमुन्यातील अर्ज आणि अटी व शर्तीच्या माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयीन वेळेत किंवा प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा क्रीडा अधिकारी अनिकेत काळे - ९६०४९ ५९६७८, कालिदास होसुरकर - ९४२१५ ९५५१५, क्रीडा मार्गदर्शक सतिश राठोड - ९९२३० १९३५३, अविनाश पाटील - ९६२३७ ८११२१, रेवननाथ शेलार - ९०७५४ ७६७९१, जितेंद्र आराक ९२२६४ ८१७२८, योगेश करांडे - ९९२२९ ९९६७२ यांच्याशी संपर्क साधून जिल्हास्तर युवा महोत्सवाबाबत माहिती घेऊ शकतात.

# प्राथमीक आरोग्य केंद्र चिंचोली माळी साठी नवीन रुग्णवाहिका उपलब्ध



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ नोव्हेंबर**

मा.आ.नमितताई अक्षयजी मुंदडा यांच्या प्रयत्नातून प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली माळी साठी नवीन रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेत दाखल झाली. या साठी जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काकाजी यांच्या कडे जेष्ठ नेते सुनीलआबा गलांडे व सर्व ग्रामस्थ तसेच टाकळी मधून युवा नेते सुरज घुले, सोसा चेअरमन रघुनाथ बारगजे, विष्णू राख, तुकाराम घुले यांनी मागणी केली होती. या रुग्णवाहिकेचा चिंचोली माळी प्राथमिक आरोग्य केंद्रात येणार्या एकोणतीस गावातील रुग्णांना फायदा होणार आहे. म्हणून सर्व गावातील ग्रामस्थांनी आमदार नमीताताई अक्षयजी मुंदडा व जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काकाजी यांचे आभार मानले. या प्रसंगी जेष्ठ नेते सुनीलआबा गलांडे पाटील, चेअरमन अरुणतात्या काळे, धीरज वनवे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, माजी उपसरपंच पवन पवार, मनोज गालफाडे,दगडु दळवे, दिलीप गायकवाड, चंद्रकांत भुजबळ, रविंद्र गलांडे, राजाभाऊ नखाते, भगवान देशमुख, विकास देशमुख, तुकाराम गालफाडे, शिवाजी राऊत, लक्ष्मण गलांडे, गोपीनाथ राऊत, नंदकुमार घुंबरे,वसंत काळे, सुधाकर काळे, वैभव नखाते, घुले, नामदेव गालफाडे, पंढरीनाथ काळे, रामराजे नखाते, आरोग्य अधिकारी डॉ. शिला कांबळे व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

# केज येथे संविधान गौरव व शहीद पोलिसांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ नोव्हेंबर**



येथील पोलीस बॉईज संघटना, रोटरी क्लब ऑफ केज आणि सर्वज्ञ अकॅडमी यांच्या वतीने केज शहरात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोलीस स्टेशन अशी भव्य कँडल मार्च काढून संविधान गौरव व मुंबई हल्ल्यात अतिरेक्यांशी लढताना शहीद झालेल्या पोलिस जवानांना अभिवादन करण्यात आले. प्रथम छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले व पत्रकार गौतम बचूटे यांनी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचे महत्व सांगितले. त्यानंतर छत्रपती शिवाजी चौकातून हातात कँडल व तिरंगा ध्वज घेऊन पोलिस स्टेशन पर्यंत रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, बापूराव सिंगण, महेश जाजू, पीएसआय राजेश पाटील, सपोनि शिंदे, सतीश डांगे, श्री इंगळे, विनोद गुंडपाटील, अनिल ठोंबरे सर्वज्ञ अकॅडमी चे संचालक श्री बांगर आणि अकडेमीचे व एमआयटी क्लासेस चे विद्यार्थी उपस्थित होते. समारोप स्थळी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, हनुमंत भोसले, रोटरीचे सचिव अनंत तरकसबंद महेश जाजू, पत्रकार गौतम बचुटे, सर्वज्ञ अकॅडेमीचे बांगर यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संविधानदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ नोव्हेंबर**



डॉ.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय बीड येथे २६ नोव्हे संविधानदिन निमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला.मान्यवरांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा व संविधान यांचे पुजन केले.

प्रमुख अतिथी प्रा एस एन कुलकर्णी यानी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीयानी संविधानास मान्यता दिली व स्वातंत्र्य समता बंधुता सामाजिक न्याय ही मूल्ये अमंलात आणली प्रत्येक भारतीय नागरिकांस हक्क अधिकार कर्तव्ये प्रदान केली. २० २४-२५ हे ७५ वे वर्ष आहे. संविधान भारतीयांच्या जिवनात महत्वपूर्ण आहे.तसेच उपस्थित प्रमुख मान्यवर व वाचक सभासद यानी मिळुन उद्देशिकेचे वाचन केले व संविधानदिन साजरा करण्यात आला.तसेच विशेष यादिनानिमित्त वाचनालयाच्या वतीने दीपावली अंक प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले विविध विषयाचे दीपावली अंक प्रदर्शनात मांडण्यात आली.

यावेळी प्रा.एसन कुलकर्णी प्रा शास्त्री, यशवंत देशमुख मान्यवर वाचनालयाचे सचिव नंदकिशोर झरीकर, रविंद्र देशमुख प्रा शशिकांत पसारकर प्रा अनंत उम्रजकर उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथपाल रमाकांत शेरकर सुरेश जाडे यानी कार्यक्रमाचे सुरेख आयोजन केले.

# उद्देशिका हा संविधानाचा आत्मा-महेंद्रकुमार कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ नोव्हेंबर**

भारतीय संविधानामागील पार्श्वभूमी, भारतीय संविधानाची रचना, वैशिष्ट्ये, नागरिकांचे मुलभूत अधिकार आदी बाबींवर मार्गदर्शन करताना भारतीय संविधानाची विविध पैलूंवर प्रकाश टाकत भारतीय संविधानाची उद्देशिका हा भारतीय संविधानाचा आत्मा असल्याचे प्रतिपादन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिनानिमित्त 'जाणून घ्या आपले संविधान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रास्ताविकपर मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व सांगितले.

मंचावर निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उप जिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, उप विभागीय अधिकारी श्रीमती कविता साधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाने, नायब तहसीलदार सुधाकर टाक, माधव काळे, श्रीमती नर्मदा उगलमुगले यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

DNS Bank Ltd. Ambajogai

## नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,
१. श्री मुंजाजी रंगनाथ मुंडे (कर्जदार)
पत्ताः- मु. पो. वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१५१७
२. श्री. गोविंद मुंजाजी मुंडे (सह कर्जदार)
पत्ताः- मु. पो. वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१५१७
३. श्री. संतोष मुंजाजी मुंडे
पत्ताः- मारुती मंदीरजवळ, मु. पो. वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
४. श्री राजकुमार रामभाऊ चाटे
पत्ताः- मु. पो. वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७
५. श्री चांगदेव रंगनाथ मुंडे
मु. पो.- वरवटी, ता.- अंबाजोगाई, जि. बीड- ४३१ ५१७

(कायद्याच्या 2(1) (f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२

महोदय,
विषयः नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढून टाकण्याची मागणी आमची शाखाः परळी रोड.
सुचनाः-U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.
१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक ०३.१०.२०२४ पासून एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेतः-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| खाते क्र. ७००२-२०५ रु. २५,००,०००/- | मालमत्ता धारक मुंजाजी रंगनाथ मुंडे यांच्या मालकीची व्यवसायिक मालमत्ता मौजे गिरवली, ता.- अंबाजोगाई, जि. बीड येथील गट नं. २० क्षेत्र २ हे २० आर जमीन असून ज्याच्या चतुःसिमा खालील प्रमाणेः- पूर्वः शरद किसन बावणे पश्चिमः- रस्ता दक्षिणः- महानंदा मुंजाजी मुंडे उत्तरः- चांगदेव रंगनाथ मुंडे (वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत) | मुद्दल+व्याज एकुण रु. २१,३२,१६३/- अधिक दिनांक ३१.१०.२०२४ रोजी पुढील व्याज @११.८५% दिनांक ०१.११.२०२४ पासून |

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक ०५.०८.२०२२
ब. गहाणखत नोंदणी दिनांक ०२.०८.२०२२ (गहाणखत नोंदणी क्र.४०९६/२०२२)
५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.
६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. मुद्दल व्याज एकुण रु. २१,३२,१६३/- दिनांक ३१.१०.२०२४ अधिक दिनांक ०१.११.२०२४ पासुन पुढील व्याज @ ११.८५% आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक २६.०१.२०२५ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बैंक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणाऱ्या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहेः
अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.
७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

ठिकाण-अंबाजोगाई

श्री. अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर) दीनदयाळ नागरी सह. बँक म. अंबाजोगाई मुख्यालय- अंबाजोगाई मो. ७६६६५७७९००

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शहिद जवानांच्या स्मृती जागवत सुरु केलेला उपक्रम स्तुत्य : शहाजी उमाप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**



मुंबईवर २६/११ रोजी झालेला दहशतवादी हल्ला आज सबंध देशावर आघात करणारा होता. हा हल्ला परतवून लावण्यासाठी महाराष्ट्र पोलीस व केंद्रातील एनएसजी कमांडो यांनी केलेले शर्थीचे प्रयत्न महत्वाचे होते. या हल्ल्यात शहीद झालेल्या जवान व नागरिकांच्या स्मृती जागवत सुरु केलेला हा उपक्रम स्तुत्य असून, या कार्यक्रमाची व्याप्ती अशीच वाढो, अशा भावना नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी व्यक्त केल्या.

मुंबईवर झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने पत्रकार विजय जोशी यांनी सुरु केलेल्या सैनिक हो तुमच्यासाठी या देशभक्तीपर गितांच्या श्रध्दांजली कार्यक्रमात उमाप अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. नांदेड पोलीस दल आणि संवाद संस्थेच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक निती सरकार, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, ज्येष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे आदींची उपस्थिती होती.

उमाप यांनी आपल्या भाषणात २६/११ चा हल्ला हा आपल्या देशावर झालेला मोठा आघात होता. दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हा हल्ला केला. महाराष्ट्र पोलीस दल, एनएसजी कमांडो यांनी तो हल्ला जीव धोक्यात घालून परतवून लावला. मात्र यात अनेक पोलीस अधिकारी, कर्मचारी व नागरिक शहीद झाले. त्या हल्ल्याची आठवण म्हणून सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन सातत्याने करणे हि बाब कौतूकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी आपल्या भाषणात या हल्ल्याची इत्यंभूत माहिती देवून सुरुवातीला महाराष्ट्र पोलिसांच्या अधिकाऱ्यांनी व नंतर एनएसजी कमांडो यांनी अत्यंत शर्थीने मेहनत घेवून हल्ला परतवून लावला. नव्यापिढीला या हल्ल्याची माहिती व्हावी यासाठी सैनिक हो तुमच्यासाठी हा कार्यक्रम सातत्याने आयोजित करुन नवी प्रेरणा देण्याचे काम त्यांनी केले, असे राऊत म्हणाले.

सुरुवातीला दिपप्रज्वलन झाल्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व कार्यक्रमाचे पार्श्वभूमी पत्रकार विजय जोशी यांनी समजावून सांगितली. यावेळी ज्येष्ठ पत्रकार अनुराग पवळे यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. यानंतर २६/११ च्या हल्ल्यातील शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

त्यानंतर देशभक्तीपर गितांच्या कार्यक्रमात कल्याणी देशपांडे, पुणे, श्रीरंग चिंतेवार, पौर्णिमा कांबळे, स्वराज राठोड, राहुल मोरे, शुभंम कांबळे यांनी नव्या व जुन्या देशभक्तीपर गितांच्या रचना सादर केल्या. मराठवाड्यातील गाजलेल्या वाद्यवृंद्यांनी संगीतसाथ केली.

कार्यक्रमाचे निवेदक छत्रपती संभाजीनगरचे सद्दाम शेख यांनी जोशपूर्ण केले. गुरुव्दारा बोर्डाचे माजी अधीक्षक स.रणजितसिंघ चिरागीया यांनी दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर तसेच कारगील प्रकरणात सादर केलेली कविता व शायरी सर्वांना भावून गेली. नांदेड येथील सुप्रसिध्द शास्त्रीय नृत्यांगना ईशा राजू जैन आणि साक्षी राधेश्याम मनियार यांनी सादर केलेले वंदे मातरम या गाण्यावरचे नृत्य सर्वोत्कृष्ट होते. उद्घाटकीय सोहळ्याचे सूत्रसंचलन गझलकार बापू दासरी यांनी केले. थंडीच्या वेळेतही नांदेडच्या रसिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रख्यात कर सल्लागार ॲड.दिपक शर्मा, पत्रकार अनुराग पवळे, प्रकाश कांबळे, चारुदत्त चौधरी, प्रल्हाद लोहकरे, दिपक बाऱ्हाळीकर, गंगाधर हाटकर, आनंद सावरकर, योगेश मुर्वैवार आदींनी परिश्रम घेतले.

# किनवटचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रीमंडळात स्थान मिळावे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट ,दि. २७ नोव्हेंबर**

किनवट विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार भीमराव केराम यांनी ऐतिहासिक विजय प्राप्त केल्यानंतर त्यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा या मागणीने जोर धरला आहे अशातच भाजपाचे युवा कार्यकर्ते तथा मातंग समाज संघटनेचे शंकर भंडारे यांनी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांसह श्रीक्षेत्र माहूर येथे जाऊन रेणुका देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी आमदार भीमराव केराम यांना मंत्रीपद मिळावे यासाठी देवीला साकडे घातले आहेत.



**शंकर भंडारे यांचे आई रेणुका देवीला साकडे**

८३ किनवट विधानसभा मतदारसंघात भीमराव केराम व माजी आमदार प्रदीप नाईक यांच्यात चूरशीची लढत झाली अटीतटीच्या लढतीत भीमराव केराम यांचा ऐतिहासिक विजय झाला. या विजयानंतर भीमराव केराम यांना राज्याच्या मंत्रिमंडळात आदिवासी विकास मंत्री म्हणून संधी मिळावी या मागणीने सर्वस्तरातून जोर धरला आहे. दरम्यान भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते तथा मातंग समाजाचे युवानेते शंकर भंडारे यांनी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी श्रीक्षेत्र माहूर येथे जाऊन आई रेणुका देवीचे दर्शन घेतले असून यावेळी त्यांनी पूजा अर्चना करून आमदार भीमराव केराम यांना राज्याच्या मंत्रिमंडळात स्थान मिळावे यासाठी देवीला साकडे घातले आहेत.

प्रत्येकनिवडणुकीमध्ये किनवटच नव्हे तर महाराष्ट्र राज्यातील मातंग समाज भारतीय जनता पक्षाच्या बाजूने खंबीरपणे उभा राहिला आहे. किनवट माहूर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी भीमराव केराम यांना महायुतीच्या संभाव्य मंत्रिमंडळात स्थान मिळावे अशी किनवट माहूर तालुक्यातील समस्त मातंग समाजाची मागणी असल्याचे शंकर भंडारे यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या समवेत मातंग समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### कोळी येथे श्रीमद् भागवत कथा व कलशारोहन सोहळ्याला प्रारंभ

**निबघा**-कोळी येथे दि. २८ नोव्हेंबर पासून राधाकृष्ण मंदिर येथे श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा राधाकृष्ण मंदिर कळशारोहन कार्यक्रम निमित्त अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन भक्तिमय वातावरणात करण्यात आले आहे. कार्यक्रम प्रारंभ २८ नोव्हेंबर पासून सुरुवात हो असून ०५ डिसेंबर रोजी या सप्ताह ची सांगता होणार आहे. यावेळी ह. भ. प. पंजाब महाराज चालगणीकर यांच्या अमृत वाणीतून भागवत कथा ऐकायला मिळणार असून ज्ञानेश्वर व्यासपीठ पदी कोळी गावचे आमचे शिस्तप्रिय शिक्षक ह. भ. प. साहेबराव शिंदे सर महाराज यांच्या गोड वाणीतून आपणास ज्ञानेश्वरी चा पाठ ऐकायला मिळणार आहे. तसेच कळशारोहन सोहळा दिनांक ५ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता होम हवन व नंतर कलश्याची मिरवणुक व नंतर शिव चैतन्य शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते सकाळी १० वाजता कलशारोहन सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प. पू. योगीराज बुवा महंत (श्री. कृष्ण मंदिर हदगांव) व ह. भ. प. साहेबराव महाराज भोयर पुसदकर यांचे दर्शन लाभणार आहे.

# मराठी हौशी राज्य नाट्य स्पर्धेचे थाटात उदघाटन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**

कलावंताच्या दमदार अभिनयाने रसिक भामहाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित ६३ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धेला सोमवारी (ता.२५) नांदेड केंद्रावर 'शापित सेवा' या नाटकापासून थाटात सुरूवात झाली. पुढील बारा दिवस नांदेडकरांना सांस्कृतिक मेजवणी मिळणार आहे.

कुसुम सभागृहात सोमवार सायंकाळी सात वाजता नाट्य परिषदेच्या अध्यक्षा अपर्णा नेरलकर, डॉ उमेश भालेराव, डॉ विजयकुमार माहुरे, सांस्कृतिक विभागाचे प्रतिनिधी सचिन पाईकराव यांच्या उपस्थति स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी परीक्षक म्हणून नंदू सावंत, देवदत्त पाठक, श्रीमती माणिक वडयाळकर यांची उपस्थिती होती. त्यानंतर लेखक विनोद डावरे लिखीत 'शापित सेवा' हे परभणी येथील झपुर्झा सोशल फाऊंडेशनची निर्मिती असलेल्या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी रसिक चांगलेच भारावून गेले होते.

**नांदेडकरांना सांस्कृतिक मेजवाणी**

ता.२८ रोजी नांदेड संकल्प प्रतिष्ठानचे 'मोटिव्हेशन स्पीकर', ता.२९ रोजी परभणी राजीव गांधी युवा फोरमचे 'गंमत असते नात्यांची', ता. ३० रोजी देगलूर मुक्ताई प्रतिष्ठानचे 'ती रात्र हा दिवस', ता. १ डिसेंबर दुपारी १२ वाजता नांदेड जागृती सामाजिक प्रतिष्ठानचे 'मी लाडाची मैना याप्रयोगांचे सादरीकरण होणार आहे

# गोदावरी अर्बन मध्ये संविधान दिन साजरा : शहिदांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**

गोदावरी अर्बनच्या सहकारसूर्य मुख्यालयात सर्व कर्मचारी बांधवांनी संविधान दिन साजरा केला. यासोबतच २६ नोव्हेंबर २०२४ च्या मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यातील शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर,सचिव ड.रवींद्र रगटे सर,संचालक प्रा.सुरेश कटकमवार सर,सहाय्यक महाव्यवस्थापक विजय शिरमेवार सर,ड. अनुप कुर्तडीकर सर,मार्केटिंग मॅनेजर महेश केंद्रे,मॅनेजर पंकज इंदूरकर,डेप्युटी मॅनेजर प्रशांत कदम, पवन यादव,चंद्रशेखर शिंदे,अविनाश बोचरे यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर २०२४ रोजी आपल्या देशाला संविधान दिले म्हणून संविधान दिन साजरा करण्यात येतो. संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी,धर्मनिरपेक्ष, लोकशाही,प्रजासत्ताक म्हणून घोषित करते. हे भारतीय नागरिकांना न्याय,समानता आणि स्वातंत्र्याची हमी देते आणि बंधुत्व वाढवण्याचा प्रयत्न करते. राज्यघटनेने दिलेले मुलभूत अधिकार हे आपली ढाल म्हणून काम करून आपले हक्क बहाल करत असले तरी त्यात दिलेली मुलभूत कर्तव्ये आपल्याला आपल्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतात हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे की २६ नोव्हेंबर २०२४ हा दिवस देशात राष्ट्रीय कायदा दिवस म्हणूनही साजरा केला जातो. ही जाणीव गोदावरी अर्बनच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांना रहावी म्हणून संविधान दिवसाच्या अनुषंगाने या विषयावर सकारात्मक चर्चा मुख्यालयात घडवून आणली आणि एक नागरिक म्हणून संविधानाने बहाल केलेल्या अधिकारांची जाणीव व त्याच्या अमलबजावणीबद्दल जागरूकता आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला गेला.

# सिडको क्षेत्रीय कार्यालयात संविधान उद्देशिकेचे वाचन



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २७ नोव्हेंबर**

सिडको मनपा क्षेत्रीय कार्यालय येथे संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे वाचन करून संविधान दिन सजरा करण्यात आला यावेळी वरिष्ठ लिपिक मीना अडबलवार यांनी उद्देशिकेचे वाचन केले. तत्पूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

या प्रसंगी कर्यालयातील करनिरिक्षक संजय नागापुरकर, लीपीक अर्चना जोंधळे, मारोती सारंग,मालु यनफळे, प्रकाश दर्शने, रंविद्र पवळे, सुधिर कांबळे, दिपक जोंधळे, राहुल पाईकराव, विनोंद पलेवाड, विठ्ठल आंबटवार, जयराम सुर्यवंशी, मदन कोल्हे, रतन गीरी, मदन चौव्हाण, श्याम आरकुले, बालाजी लोहगावकर, नथुराम चवरे, यांच्या सह कार्यालयातील कर्मचारी यांची उपस्थिती होती

# विरोधकांचे साखळदंड तोडीत आ . राजेश पवार पडले राजकीय चक्रव्यूह मधून बाहेर



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २७ नोव्हेंबर**

महाराष्ट्राच्या राजकारणात फोडाफोडी चा राजकीय इतिहास आहे डोळया समोर महाभारतातील शकुनी मामा आणि शंभर कौरववाची व अभिमन्यूची आठवण झाली असून आमदार राजेश पवार हे या सर्व राजकीय चक्रव्यूहातून शत्रूच्या कचाट्यातुन राजकीय चक्र सोडून विकासावर बोट ठेवून सामान्य मतदार जनतेला मानीत दुसऱ्यादां आमदार म्हणून विजयाचा बहुमान मिळाला आहे.

नायगाव मतदार संघात आमदार राजेश पवार यांच्या मागे कर कर मोठी लागली होती. ही करकर अपेक्षा आणि खोक्याची होती हे आमदार राजेश पवार यांनी अर्ज मागे घेण्या पुर्वीच स्पष्ट केले होते तेच झाले तसेच झाले आहे. नायगाव मतदार संघातील अडनावात कर असणारे होटाळकर, चिखलीकर, गोरठेकर, करखेलीकर, चव्हाण नायगावकर, कवळे सिंधीकर अशा अनेक राजकीय नेत्यानी आमदार राजेश पवार यांना महाभारतील अभीमन्यू प्रमाणे राजकीय चक्रव्यह मध्ये अडकून राजकीय डाव साधला होता. पण डॉन कभी रॉग नही होता ! या म्हणी प्रमाणे आमदार राजेश पवार यांनी मतदार यांना राजा मानून विरोद्धकावर विकास योजनेचा प्रहार करीत डुप्लीकेट नेते , कार्यकर्ते यांना फाटा फोडीत इमानदार मतदारवर विश्वास ठेवून विजयाचा डंका वाजवला आहे.

नायगाव मतदार संघात राजेश पवार यांना विधानसभा निवडणूकीतून बाद होण्याचे षडयंत्र अनेकांनी केले पण ते तोंड घसी पडले आहेत हे आजच्या २०२४ च्या निवडणूकीच्या नंतर हे आ .पवाराचा पावर कळला आहे. आता येणाऱ्या प्रत्येक नायगाव मतदार संघातील जिल्हा परिषद पंचायत समिती , ग्रामपंचायतीच्या निवडूकीत विरोद्दी पक्षाला पाय धरण्याची वेळ आमदार राजेश पवार यांनी आणली आहे मात्र आमदार राजेश पवार यांनी निवडणूकीत माझा विकास असेल तर मतदान करा, मी मतदान करणाऱ्य जनतेच्या विश्वासवर निवडणूक लढवित असल्याने वास्तव्य स्थिती जनतेला निदर्शनास पुन्हआल्याने राजेश पवार यांना दुसऱ्यांदा भरघोस प्रचंड मतदानी निवडून देवून आनंद व्यक्त केला आहे. जनमताचा राजा नायगाव मतदार संघाला मिळाला आहे. अशी मतदार संघात चर्चा होत असून नायगाव मतदार संघाला अनिल कपूर यांच्या नायक चित्रपटातील भुमिके प्रमाणे आ राजेश पवार हे नायक म्हणून जनतेला लोकप्रिय नेता दुसऱ्यादा मिळाला आहे पण राजेश पवार यांच्या विरोद्धी लंका जनतेनी खाक करून पवार यांच्या रूपाने राम राज्य मतदार संघात आनले आहे . येणारा पाच वर्षाचा काळ अधिक विकासात दुप्पटीने होणार अशी श्यास्वती जनता अपेक्षाने विद्देमान आमदार राजेश पवार यांच्या कडून करीत आहे .

### टि. सी. हरवली आहे

माझी सुमेधा सुरेश पाटील नावाची बारावीची टी. सी. मुक्रमाबाद ते नांदेड प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणाला टी सी सापडल्यास वरील नंबर वर संपर्क साधावा.

**पत्ता**- सुरेश पाटील, मु. मुजळगा, पो. हावरगा, ता. देगलूर, जि. नांदेड. संपर्क- ९४२३२८६७६६, ७३७५७३०४१६

# लोहा विधानसभा मतमोजणीत कुठलीच तफावत नाही: अरुणा संगेवार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा ,दि. २७ नोव्हेंबर**

८८ विधानसभा मतदार संघात एतच् वर प्रत्यक्ष झालेले मतदान व झालेली मतमोजणी यात कोणतीही तफावत नाही असे निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी स्पष्ट केले आहे.



लोहा विधानसभा मतदार संघाची मतमोजणी नंतर निकाल जाहीर झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी प्रसिद्धी पत्रक काढले आहे.

विधानसभा निवडणूकीत ३३८ मतदान केंद्रावर एकुण ३ लक्ष १ हजार ६५० मतदार होते. त्यामध्ये झालेली मतमोजणी २० नोव्हेंबर रोजी पार पडली. एकुण मतदारसंघात २ लक्ष २६ हजार ९९१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवला पण मतदान केंद्र निहाय आकडेवारीत मानवी चुक होऊन मतदान केंद्र क्रमांक ३१९ मध्ये प्रत्यक्ष मतदान यंत्रावर झालेले मतदान ६७५ आहे पण त्या मतदान केंद्रावर ५२१ असा मतदानाचा आकडा प्रसिध्द झाले होता.

मतदान यंत्रासोबत संबंधित मतदान केंद्राध्यक्ष यांचा नमुना १७-ल (नोंदविलेल्या मतांचा हिशेब) मध्ये एकुण ६७५ मतदान झाल्याचे नोंद आहे. मतमोजणी दरम्यान नमुना १७-ल भाग-एक मध्ये नोंदविलेले मतदान व नियंत्रण युनिट मधील मतदान ६७५ असुन ते जुळलेले आहे.

८८-लोहा विधानसभा मतदारसंघात एतच् यंत्रावर झालेले एकुण मतदान (नोटासह) २ लक्ष २६ हजार ९९१ आहे.

लोहा विधानसभा मतदारसंघात प्रत्यक्ष मतदान केंद्रावर झालेले एकुण मतदान व झालेली मतमोजणी यामध्ये मतदानाची कोणतीही तफावत नाही. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अरुणा संगेवार यांनी दिली आहे.

# डॉ.बाबासाहेबांच्या धर्मांत्तर सोहळ्याचे साक्षीदार ग्यानोबाराव वाठोरे अनंतात विलीन

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव ,दि. २७ नोव्हेंबर**

हदगाव तालूक्यातील हरडफ येथील जेष्ठ,नागरीक सामाजीक कार्यकर्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून दिवंगत माजी खा. हरिहरराव सोनुले यांनी स्थापन केलेल्या आदर्श विद्यार्जन मंडळ द्वारा संचलित पंचशील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष ग्यानोबाराव विठ्ठलराव वाठोरे आबा यांचे १०२ व्या वर्षी वर्धापकाळाने दुःखद निधन झाले.शांत,संयमी आणि प्रेमळ स्वभावाचे वाठोरे काका सर्वत्र आबा म्हणून परिचीत होते.



१९५६ च्या नागपूर येथील डॉ.बाबासाहेबांच्या धर्मांत्तर सोहळ्याला उपस्थित राहाण्याचे भाग्य त्यांना लाभले ते या सोहळ्याचे साक्षीदार होते.

बु.माजी खासदार हरिहरराव सोनूले यांच्या निवडणूकीच्या काळात घरची भाकर खावून सायकल वर गावोगाव फिरत त्यांनी हरिहररावांचा प्रचार केला होता.हरडफ या त्याच्या गावात सर्व समाज एकोप्याने राहावा या साठी ते नेहमी प्रयत्नशील असत आणि गावात सर्व समाजतील लोक त्यांच्या शब्दा बाहेर जात नसत. नुकताच त्यांचा शतकपुर्ती सोहळा उत्साहात संपन्न झाला होता आदर्श विद्यार्जन मंडळाचे सचिव सुनीलभाऊ सोनुले यांनी त्यांची पुस्तक तुला केली होती.

आदर्श विद्यार्जन मंडळाच्या पंचशील प्राथ,माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयातील कुठलाही कर्मचारी निवृत्त होत असताना वाठोरे काकाचे डोळे भरून यायचे संस्थेच्या अध्यक्षाचे डोळे भरुण येणे असे महाराष्ट्रातील एकमेव या शाळेत पाहायला मिळात होते. आज त्यांच्या गावी त्यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र काँग्रेस कार्यकारणी सदस्य सुनिल सोनूले, शिक्षक आमदार विक्रम काळे, यांचे शोकसंदेश वाचून दाखण्यात आले. या खदिरखान, डॉ.रेखा चव्हाण, दादासाहेब शेळके, पांडूरंग कदम, देवानंद पाईकराव, रमेश नरवाडे, शास्त्रज्ञ भास्कर दवणे, डॉ. नरवाडे, आदर्श विद्यार्जन मंडळाच्या उपाध्यक्षा श्रीमती कुमूद हदगावकर मॅडम,शिवाजीराव तावडे, वि.मा. टाले,जगदिश कदम,सामाजीक कार्यकर्ते, पत्रकार सह हदगाव हरडफ परिसरातील हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

# शहीद जवान सुधाकर राठोड यांच्या पार्थीवावर शासकीय ईतमामात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी ,दि. २७ नोव्हेंबर**

मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी जवळील हिरानगर येथील व सध्या काश्मीर मधिल सियाचीन ग्लेशियरभागात कर्तव्य बजावत असतांना शहिद झालेले हवालदार सुधाकर शंकरराव राठोड यांच्या वर आज हिरानगर तांडा येथे शासकीय ईतमामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



हिरानगर ता.मूखेड येथील सूधाकर शंकरराव राठोड (वय ४० वर्षे) हे लष्करात हवालदार पदावर कार्यरत होते. जगातील सर्वात उंच रणभूमी असलेल्या अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असणाऱ्या जम्मू काश्मीर येथील सियाचीन ग्लेशियर येथील चौकि वर कार्यरत होते. बर्फाचे वादळ, ऑक्सिजन ची कमी, शत्रू व वातावरणाशी दोन हात करतांना मेंदूला ऑक्सिजन पूरवठा अत्यंत कमी झाले असल्याने आजारी पडले त्यांना त्वरीत पूढील उपचारासाठी चंदिगढ येथे हलविण्यात आले होते. पण त्यांचे २५/११/२४ रोजी सकाळी ७ वा.उपचारादरम्यान मृत्यु झाला.

त्यांच्या पश्चात पत्नी ऐक मूलगा(८ वर्षे), ऐक मूलगी (६ वर्षे), भाऊ मधूकर व आई आहेत त्यांचे पार्थिव काल सकाळी हैदराबाद येथे हवाई मार्ग तर हैदराबाद येथून रस्ते मार्ग हिरानगर येथे मूखेड, बा-हाळी मार्ग जात असताना रस्त्याच्या दुतर्फा शालेय विद्यार्थी, माजी सैनिक, सामान्य जनता मोठ्या संख्येने पूष्प वृष्टि व जयजयकार करीत होते.शहिद सूधाकर राठोड यांच्या पार्थिवावर शासकीय ईतमामात शोकाकुल वातावरणातअंत्यसंस्कार करण्यात आले.या वेळी सैन्य दल व पोलीस दलाकडून हवेत फैरी झाडत मानवंदना दिली यावेळी १२७ डीं.व.ठशसीं.कर्नल प्रशांत ठाकूर, बँटरी कमांडर मेजर शिवम, स्टेशन हेडकॉर्टर संभाजी नगर ९७ आरटि ब्रिगेड मेजर दिपरंजन यादव प्रशासनाच्या वतीने उपजिल्हाधिकारी अनूप पाटील, तहसीलदार राजेश जाधव, गटविकास अधिकारी सि.ऐल.रामोड, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, स.पो.नि.भालचंद्र तिडके, पो. उप.नि.अमर केंद्रे आ.तूषार राठोड यांच्या मातोश्री चक्रवती बाई राठोड, जि.सै.कल्याण संघटक कॅप्टन.विठ्ठल कदम मा.सैनिक लक्षण देवदे, बालाजी चूकलवाड, रामराव थडके, भगवान नागरगोजे, देवराव झगडे, प्रकाश, कस्तूरे, संजय राठोड, खंडेराव मंगनाळे आदि.श्रध्दांजली अर्पण केली. प्रशासनाला राजे छत्रपती अँकेडमीचे संचालक ज्ञानेश्वर पा. डूमणे यांनी आपल्या विद्यार्थी सह मोलाचे सहकार्य केले.

या प्रसंगी सैन्य दलाचे अधिकारी, जवान, मा.सैनिक,मंडळ अधिकारी जांभळे, तलाठी तोतरे, ग्रामसेवक मणियार यांच्या सह हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंच्या भूमिकेवर चंद्रशेखर बावनकुळे खूश!



मुंबई : आमचे विरोधक एकनाथ शिंदे हे नाराज आहेत असे म्हणत होते. पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीचे नेते म्हणून अत्यंत स्पष्टपणे विरोधकांना आणि महाराष्ट्रातील जनतेला पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जे निर्णय घेतील तो निर्णय मान्य असेल अशी त्यांनी भूमिका घेतली आहे. त्यासाठी त्यांचे आभार, असे पत्रकार परिषदेमध्ये चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. तसेच सरकार स्थापन करण्यासाठी भाजपाचे केंद्रीय नेतृत्व एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करेल, असेही बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी काम केले आहे. महायुतीचा चेहरा म्हणून त्यांनी राज्यात अनेक योजना राबवल्या. तसेच फडणवीसांच्या खांद्याला खांदा लावून सरकार चालवले. आज त्यांनी जी भूमिका घेतली आहे. मी त्याचे स्वागत करतो. त्यांची भूमिका राज्याला पुढे नेण्याची भूमिका आहे. तसेच त्यांचा निर्णय महायुतीला भक्कम करणारा आहे, असे देखील चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

आमची लढाई मुख्यमंत्री पदासाठी नाही तर आमची लढाई राज्यातील १४ कोटी जनतेसाठी होती. त्यामुळे जनतेने आम्हाला प्रचंड बहुमत दिले. पण महाविकास आघाडी मुख्यमंत्री पदासाठी लढाई करत होती. त्याच्यात ८ मुख्यमंत्री होते. काँग्रेस आणि शरद पवार यांच्याकडे प्रत्येकी ३ आणि उद्धव ठाकरे यांच्याकडे दोन मुख्यमंत्री होते, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला. तर उद्धव ठाकरे यांनी भाजपाला धोका दिला होता, अशी टीका देखील त्यांनी माध्यमांशी बोलताना केली.

# त्र्यंबकेश्वरचा २०२७ मधील कुंभमेळ्याचा आराखडा तयार!

## पाच लाख साधू तर पाच कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज

नाशिक : विधानसभा निवडणूक संपताच कुंभमेळा नियोजनाला गती मिळाली आहे. कुंभमेळ्यात पाच लाख साधु-महंत तसेच पाच कोटी भाविक येण्याची शक्यता गृहीत धरून महापालिकेने एकूण सहा हजार ९०० कोटींचा अंतिम आराखडा जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर केला. यात साधुग्राममध्ये तीन जलकुंभ व शहरात नऊ उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. नाशिक व त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे, त्यासाठी आतापासून तयारी सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी दर मंगळवारी महापालिकेचा आढावा घेणार आहेत. त्यानुसार पहिली बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. महापालिका आयुक्त अशोक करंजकर, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, शहर अभियंता संजय अग्रवाल आदी उपस्थित होते.

२०२७ च्या कुंभमेळ्यासाठी देशविदेशातील पाच कोटी भाविक येण्याची शक्यता वर्तविली जाते. साधू, महंत, आखाडे, भाविकांची संख्या विचारात घेता आराखड्यात रिंग रोड, नवीन रस्ते, प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती, वाहनतळ, तात्पुरती निवारागृहे, साधुग्राम आदी कामांचा समावेश आहे. रिंग रोडला २० मिसिंग लिंक जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेने रिंग रोडच्या मिसिंग लिंकच्या भूसंपादनासह सुमारे १७ हजार कोटींचा प्रारूप आराखडा तयार केला होता.

### आराखड्याला लावली कात्री

कुंभमेळ्याचा आराखडा तयार करताना महापालिकेने साधुग्रामच्या भूसंपादनासह इतर बाबींचा समावेश करून एकूण १७ हजार कोटींचा प्रारूप आराखडा सादर केला; परंतु भूसंपादन ही महापालिकेची जबाबदारी असल्याने विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी त्याला ११ हजार कोटींची कात्री लावल्याने हा आराखडा आता सहा हजार ९०० कोटींपर्यंत कमी झाला आहे.

### २०२७ चे असे असेल नियोजन

साधुग्रामसाठी ५०० एकर जागा आरक्षित करत तीन हजार प्लॉटचे नियोजन करण्यात आले आहे. सुमारे तीन आखाडे, एक हजार १०० खालसे यातील पाच लाख साधूंची व्यवस्था या ठिकाणी करण्याचे नियोजन आहे. प्रत्येक पर्वणीला ८० लाख भाविक येण्याची शक्यता गृहीत धरून पाच कोटी भाविकांचा अंदाज गृहीत धरण्यात आला आहे. येणाऱ्या भाविकांसाठी १५ हजार फिरती शौचालये, नऊ नवीन उड्डाणपूल, पाच हजार दिशादर्शक कमानी, शहरात प्रवेश करताना स्वागत कमानी, ३५० किलोमीटर अंतर्गत रस्तेविकास, ६० किलोमीटर बॅरिकेडिंग तसेच सेक्टर ऑफिसर, रेशन दुकाने, दूध वितरण व्यवस्था, एटीएम, बस वाहतूक आदी नियोजन करण्यात येत आहे.

# मालेगाव शहरातील स्टॅम्प वेंडरकडून जनतेची व शासनाची शेकडो कोटींची फसवणूक

## नवीन सरकार काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष



मालेगाव : मालेगाव शहरातील संगमेश्वर शिवारातील सर्व्हे नंबर ११४ अ मधील शेतीचा प्लॉट सांगून भूमाफीया आरीफ अब्दुल लतीफ व इतर भूमाफियांनी सरकारी अधिकाऱ्यांशी संगनमत करून सदर शेतीच्या उताऱ्यावर इतर हक्कात सदरच्या जमीनीचा बिनशेती वापर करावयाचा असल्यास बाजार भावाप्रमाणे ५० टक्के नजराणा भरावा लागेल असा स्पष्ट उल्लेख अद्याप इतर हक्कात कायम असताना सदर जमीन बिनशेती वापरासाठी असल्याचे सांगून हजारो गरीब जनतेला खरेदी देऊन करोडो रूपयांचा शासनाचा महसूल व स्टॅम्प ड्यूटी बुडवून गरीब जनतेची फसवणूक केली आहे असे माहितीच्या आधारे समोर आले आहे.

सदर जमीन शेती उपयोगासाठी असताना जमीन अकृषिक कारणासाठी असून तीचे टायटल क्लिअर असल्याचे खरेदीदारांना विश्वास देऊन सदर जमानीची सौदा पावती करून देण्यात आली. सदर जमीन बीनशेती करून देऊन सदर जागेवर रोड, गटार व इलेक्ट्रीक पोल लावून देण्याचे आश्वासन गरीब खरेदीदारांना दिले गेले. मात्र आज रोजी तिथे काहीही सुविधा देण्यात आलेली नाही. जमीनीची खरेदी देताना सदर भूमाफीयाने चलाखी करत शेतीची खरेदी सरकारी किंमतीपेक्षा कमी किंमतीत सदर शेती खरेदी करून दिली. सदर जमीन नवीन व अविभाज्यीय शर्तीची जमीन असल्यामुळे सदर जमीनीचा नजराणा देखील भरणे अत्यावश्यक होते. मात्र सरकारच्या डोळ्यात धुळ टाकण्यासाठी या जमीनीची खरेदी करण्यासाठी या भूमाफिया गँगने टेक्नीकल शब्दाचा वापर करताना या शेतीची खरेदी 'बैल गोठ्यासाठी' सांगून पुर्ण चार हेक्टर पंचावन्न आर जमीनीची खरेदी 'बैल गोठ्यासाठी' हे कारण दाखवून करून घेतली. मात्र आज सद्यस्थितीत सदर जागेवर एकही 'बैल गोठा' दिसून येत नाही.

सदर जमीन फक्त कृषिक वापरासाठी असलेल्या या जागेवर आज रोजी तुकडे बंदी कायद्याचा अवमान करून शेकडो घरांचे बांधकाम, कारखाने निर्माण झाले आहेत. सदर अवैधरीत्या खरेदी विक्री झालेल्या ११४ अ संगमेश्वर या जमीनीची अपर जिल्हाधिकारी यांचे कोर्टात झालेल्या आरटीएस पुनर्निरीक्षण अपील सुनावणी झाली असता अपर जिल्हाधिकारी यांनी सदर शेतीच्या अवैध रीत्या झालेल्या खरेदीचे नोंद क्रमांक २७१८० ही फेरफार नोंद रद्द करण्यात यावी व मुळ मालकाचे नाव लावावे असे स्पष्ट आदेश देण्यात आले असून सुद्धा अद्याप सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. भूमाफीया आरीफ अब्दुल लतीफ व इतर भूमाफीया गरीब जनतेची कोट्यावधी रूपयांची फसवणूक करून व शासनाचा शेकडो कोटींचा नजराणा महसूल व स्टॅम्प बुडवून शहरात मोकाट फिरत आहेत. सदरहू भू माफीयाने मालेगाव शहरातील अशा अनेक जमीनींची खरेदी विक्री केली असून सर्व्हे नंबर ९८ मालेगाव शिवार महानगरपालिका हद्दीतील प्राथमिक शाळेसाठी आरक्षीत असलेल्या जमीनीची बेकायदेशीर खरेदी घेऊन तुकडेबंदी नियम धाब्यावर ठेवून जमीनीचे तुकडे पाडून प्लॉट खरेदी विक्री करून गरीब जनतेची व शासनाचा शेकडो कोट्यावधी रूपयांचा अपहार केला आहे.

याच प्रकारे सदर भूमाफीयाने सर्व्हे नंबर ११४ ब या जमीनीचा देखील अकृषिक आदेश नसताना तुकडे बंदी कायद्याचा अवमान करून तुकडे पाडून गरीब जनतेला अकृषिक निवासी जागा असल्याचे भासवून खरेदी विक्री करून गरीब जनतेची फसवणूक केली आहे व यात देखील शासनाचा कोट्यावधी रूपयांचा महसूल बुडवला आहे.

अशा प्रकारे व्यवसायाने स्टॅम्प वेंडर असलेल्या सदर व्यक्तीने मालेगांवातील अनेक भूमाफीयांशी हात मिळवणी करून मालेगाव शहराची धारावी करत असून सदर भूमाफीयाने अशा अनेक बेकायदेशीररीत्या जमीनींची खरेदी विक्री करून बेकायदेशीर मोठमोठ्या इमारतींचे बांधकाम करून बेकायदेशीररीत्या फ्लॅटची खरेदी विक्री केली आहे. गरीब जनतेची फसवणूक करून शासनाचा शेकडो कोट्यावधी रूपयांचा नजराणा तसेच स्टॅम्प ड्यूटी महसूल बुडवला आहे व हजारो कोटींची अवैधरीत्या मालमत्ता कमावली आहे.

तरी स्थानिक जनतेकडून या विरूद्ध आक्रोश झाल्यामुळे सदर भूमाफियांविरूद्ध कठोर कार्यवाहीची मागणी स्थानिक फसवणूक झालेल्या लोकांकडून होत आहे. सदर प्रकरणात नवीन शासन काय कारवाई करेल याकडे जनसामान्यांचे लक्ष लागले आहे.

आरोग्य सेवा
कार्यालय जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली.

संकल्प निरोगी महाराष्ट्राचा
सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जिल्हा परिषद, हिंगोली
आमचा ध्यास । ग्रामीण विकास

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

आयुष्यमान भारत आरोग्य वर्धिनी केंद्र अंतर्गत दिल्या जाण्याऱ्या सेवा खालील प्रमाणे-

१) माता बालक सेवा
२) नवजात अर्भक सेवा
३) किशोरवयीन आरोग्य सेवा
४) कुटुंब नियोजन व संतती प्रतिबंधन
५) संसर्गजन्य आजारांवर उपचार
६) ओ.पी.डी. व किरकोळ आजारावर उपचार
७) डायबेटीज, बी.पी., कॅन्सर अशा असंसर्गजन्य आजारांवर प्रतिबंधक उपचार व मार्गदर्शन
८) नेत्ररोग व नाक, कान, घसा
९) मुखरोग
१०) वयोवृध्दावर उपचार
११) जळित व अपघातजन्य किरकोळ उपचार
१२) मानसिक रोगांवर मार्गदर्शन व उपचार
१३) आयुष व योगा

– सौजन्य –

जिल्हा एकात्मीक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद हिंगोली

डॉ. कैलास शेळके
जिल्हा आरोग्य अधिकारी हिंगोली.

नेहा भोसले
मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, दि. २८ नोव्हेंबर २०२४ 

## श्री स.भु.प्रशालेत 'अमृतमहोत्सवी संविधान दिन' साजरा



बिडकीन दि. २७ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशालेत 'अमृतमहोत्सवी संविधान दिन' उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी प्रशालेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले, प्रमुख पाहुणेउपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, शोभा कुलकर्णी, प्रमुख वक्त्या प्रा. मीना वनगुजरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मान्यवरांच्या स्वागतसत्कारानंतर भारतीय संविधानाचे सामूहिक पठण करण्यात आले. भाग्यश्री शिंदे, प्रचिता कळसकर, ओम कुल्हाळ, अमृता तिळेकर, भक्ती गोर्डे, ऋतुजा बडे, सान्वी लघाने, अर्शिया शेख,गौरी पवार या विद्यार्थ्यांनी समयोचित भाषण केले. प्रमुख वक्त्या प्रा. मीना वनगुजरे यांनी संविधान निर्मितीची प्रक्रिया, संविधानातील भारतीय जनतेचे अधिकार, हक्क आणि कर्तव्यांबाबत सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वर्ग आठवी ई चे वर्गशिक्षक लक्ष्मीकांत जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेचे सर्वच विद्यार्थी व शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.प्रसिद्धीविभाग–ज्ञानेश्वर चाटुपळे, पद्माकर वाघरूळकर.


## संविधान दिन साजरा



वाळूज महानगर(प्रतिनिधी) : संविधान दिनानिमित्त पँथर्स रिपब्लिकन पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांता गाडे , महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सिद्धांत गाडे,यांच्या नेतृत्वाखाली भव्य वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सजवलेल्या रथामध्ये संविधान व बाबासाहेबां चा पुतळा ठेवण्यात आला होता ते सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. नाक्षण विद्यालय उस्मानपुरा ते भडकल गेट भव्य मोटरसायकल व वाहन रॅलीने जाऊन भडकल गेट येथे बाबासाहेबांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळेस प्रदेश सरचिटणीस सर्जेराव मनोरे, बाबुराव नरोडे, जिल्हाध्यक्ष विजय दिवेकर, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ महापुरे, शहराध्यक्ष रंजीत साळवे, पश्चिम शहराध्यक्ष संदीप काळे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मोरे,, जिल्हा सचिव राकेश साबळे, प्रवीण गाडेकर, सुभाष नाईक ,सिद्धार्थ पवार, लता थोरात आदींची उपस्थिती होती.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे संविधान दिन साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २७ नोव्हेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे दि २६ मंगळवार रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. २ वर्षे ११ महिने १८ दिवसांत भारताचे संविधान लिहिणाऱ्या महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी प्राचार्य अभिजित सर व सर्व शिक्षकांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन व पुष्पहार अर्पण केले. तसेच भारतीय संविधानाची प्रत ठेवण्यात आली होती. सर्व विद्यार्थी व शिक्षक यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका वाचन केली. शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणाद्वारे भारतीय संविधानाचे महत्त्व पटवून दिले. तसेच यावेळी उपस्थित शिक्षकांनी देखील भारतीय संविधानात असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान मुलांना समजावून सांगितले. यावेळी संस्थाचालक ओमप्रकाश जैस्वाल सर,शाळेतील प्राचार्य अभिजीत इंगळे सर, दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण , दिक्षा साबळे , ओसिन शिंदे, जयश्री नजन, आरती इंगळे, राणी हटकर, शिवानी ठाकूर या सर्व शिक्षकांची उपस्थिती होती.

## सोयगाव पोलीस स्टेशन येथे संविधान दिन साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ नोव्हेंबर

शहरातील पोलीस स्टेशन येथे मंगळवार रोजी संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधान दिन साजरा करण्यात आला. तसेच यावेळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,सह पोलीस कर्मचारी दिलीप पवार,राजू बरडे,सुधाकर दौड,रवींद्र तायडे,राजू सोनवणे,होमगार्ड योगेश बोखारे आदी उपस्थित होते.

## आशाबाई बावस्कर यांचे निधन



सोयगाव,दि.२६ नोव्हेंबर : सोयगाव शहरातील काळेनगर येथील आशाबाई सुकलाल बावस्कर (वय.४५) यांचे दि.२५ सोमवार रोजी रात्री वेळ ११:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे, असा परिवार आहे.

## दिपक लक्ष्मण श्रीवास्तव यांचे निधन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .२७ नोव्हेंबर : दिपक लक्ष्मण श्रीवास्तव वय ५४ वर्ष रा. बागवान गल्ली बिडकीन ता .पैठण यांचे दि .२६ रोजी रात्री ८: ५५ वाजता दु:खद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर आज दि. २७ बुधवार रोजी दुपारी बारा वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात आली त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, चार भाऊ,जावई नातवंडे ,असा मोठा परिवार आहे.

### एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, कुलपती अंकुशराव कदम यांची प्रमुख उपस्थिती, विद्यापीठाच्या १२८४ विद्यार्थ्यांना दिली जाणार पदवी

# एमजीएम विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ ३० नोव्हेंबरला होणार संपन्न

### सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना डी.लीट पदवी जाहीर, ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल हे प्रमुख अतिथी म्हणून करणार दीक्षांत भाषण




छत्रपती संभाजीनगर, दि. २७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा तिसरा दीक्षांत समारंभ शनिवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न होणार आहे. या दीक्षांत समारंभास ज्येष्ठ विधिज्ञ, खासदार कपिल सिब्बल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असणार असून यावेळी ते दीक्षांत भाषण करतील. या दीक्षांत समारंभात एकूण १२८४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येणार आहे. एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, नियामक मंडळाचे सदस्य, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य यांच्या उपस्थितीत हा दीक्षांत समारंभ पार पडणार आहे. यावर्षी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना डी.लीट पदवी देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी दिली.

श्री. सपकाळ यावेळी म्हणाले, एमजीएम हे मराठवाड्यातील पहिले स्वयं अर्थसाहाय्यित खाजगी विद्यापीठ असून २०१९ पासून कार्यान्वित झाले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने एमजीएम विद्यापीठाला २ (एफ) दर्जा दिलेला आहे. येथे अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, व्यवस्थापन आणि वाणिज्य , सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या, प्रयोगकला विद्याशाखा, आंतरविद्याशाखीय शिक्षण, फॅकल्टी ऑफ डिझाईन या विद्याशाखांअंतर्गत अभियांत्रिकी, व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन, फाईन आर्ट्स, नृत्य, कला, पत्रकारिता, फिल्म, फोटोग्राफी, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, समाजकार्य, ग्रंथालय व माहितीशास्त्र, भारतीय आणि परकीय भाषा, फायर इंजिनिअरिंग, शारीरिक शिक्षण, विधी, फॉरेन्सिक सायन्स, फार्मसी आणि योग इत्यादी पदवी, पदव्यूत्तर पदवी, पदविका व प्रमाणपत्र तसेच पीएच.डी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात सकाळी १०:३० वाजता दीक्षांत समारंभास सुरूवात होणार आहे. दीक्षांत समारंभामध्ये एमजीएम विद्यापीठातून २०२३ –२०२४ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण पूर्ण करून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाईल. या दीक्षांत समारंभात विद्यापीठातील ७ विद्याशाखांच्या पदवी –७६२, पदव्युत्तर पदवी – ३९९ , पदविका – ८३ , पदव्युत्तर पदविका – २७, विद्यावाचस्पती पदवी – ०३ आणि प्रमाणपत्र – ०४ विद्यार्थ्यांचा समावेश असेल. यापैकी ३०६ अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, ३९२ मूलभूत आणि उपयोजित विज्ञान, ३१९ व्यवस्थापन आणि वाणिज्य , १५६ सामाजिक विज्ञान आणि मानव्य विद्या, १० प्रयोगकला विद्याशाखा, ३१ आंतरविद्याशाखीय शिक्षण, ७० फॅकल्टी ऑफ डिझाईन विद्याशाखेचे विद्यार्थी असतील. अशा विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या एकूण १२८४ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येणार आहे. तसेच या दीक्षांत समारंभात प्रथमच ३ विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती पदवी (पीएचडी) प्रदान करण्यात येणार असल्याचे श्री. सपकाळ यांनी सांगितले.

१० विद्यार्थी कुलपती सुवर्ण पदकाचे मानकरी



विद्यापीठातील पदवीचे ५ आणि पदव्युत्तर पदवीच्या ५ अशा एकूण १० विद्यार्थ्यांना कुलपती सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच यावेळी स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखेत सर्वाधिक गुण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला प्राचार्य प्रताप बोराडे सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांच्याविषयी माहिती :

कपिल सिब्बल हे भारतीय कायदा क्षेत्रातील एक ज्येष्ठ विधिज्ञ आणि राजकारणी म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांचा जन्म ८ ऑगस्ट, १९४८ रोजी जालंधर येथे झाला. सध्या ते राज्यसभा खासदार आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे ते अध्यक्ष म्हणून काम पाहतात. त्यांनी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री आणि केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री म्हणून आपल्या कारकिर्दीमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्याविषयी माहिती :

मेधा पाटकर यांचा जन्म १ डिसेंबर १९५४ रोजी मुंबईत झाला. त्यांनी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमधून सामाजिक कार्यात एमए मिळवले. त्यांना अनेक आंदोलने आणि उपोषणे करीत असताना तुरुंगातही जावे लागले आहे. १९८५ मध्ये श्रीमती पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मोर्चे आणि रॅली काढण्यास सुरुवात केली आणि निषेध शांततापूर्ण वातावरणात आंदोलन केले. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना ह्युमन राईट्स डिफेंडर्स अवॉर्ड, ग्रीन रिब्बन अवॉर्ड, छात्र भारती पुरस्कार, प्रभा पुरस्कार, बॅरिस्टर नाथ पै पुरस्कार आदि पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.

# मंत्रिमंडळात आ. प्रशांत बंब यांना स्थान मिळण्याची गंगापूर खुलताबाद मतदार संघातून मागणी

### तब्बल २९ वर्षानंतर मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची संधी

तभा.वृत्तसेवा

गंगापूर दि.२७ नोव्हेंबर : पंधरा वर्षाच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर चौथ्यांदा निवडून आलेले भाजपाचे आमदार प्रशांत बंब यांना नवीन मंत्रिमंडळात स्थान मिळावे अशी मागणी गंगापूर खुलताबाद मतदारसंघातील नागरिकांकडून होत आहे. उच्चशिक्षीत, अभ्यासू व्यक्तिमत्व तसेच प्रशासकीय कामे करून घेण्यासाठी हातोटी असलेले आणि मराठवाड्यातील पाणी प्रश्नावर आक्रमकपणे भूमिका मांडून मराठवाड्याला समन्यायी पद्धतीने पाणी मिळवून दिले त्यामुळे बंब यांना संपूर्ण मराठवाड्यातून पसंती मिळत आहे. गंगापूर खुलताबाद तालुक्यासाठी शासनाच्या संपूर्ण योजना प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात बंब यांनी कायमच प्रयत्न केले आहेत.



महाराष्ट्रात १९९५ ला शिवसेना–भाजपचे सरकार स्थापनेसाठी अपक्षांची मदत घ्यावी लागली होती,त्यावेळी गंगापूर मधून मा. मंत्री अशोक पाटील डोणगावकर यांनी पाठिंबा देत मंत्रिपद मिळवले होते त्यावेळी त्यांना सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री म्हणून स्थान मिळाले होते परंतु तुमचा झेंडा आमचा दांडा या वक्तव्यामुळे मंत्रिपद गमवावे लागले होते.त्यानंतर तब्बल २९ वर्षानंतर गंगापूर साठी मंत्रिपद मिळालेले नाही. त्यानंतर दोन पंचवार्षिक मा. आमदार अण्णासाहेब माने यांनी शिवसेनेकडून निवडून आले होते परंतु त्यांनाही मंत्रीपद मिळाले नाही.२००९ ला प्रथम अपक्ष म्हणून निवडून आलेले आमदार प्रशांत बंब २०१४ ला भाजपकडून निवडून आले. त्यानंतर २०१९ लाही भाजपकडूनच निवडून आले यावेळी भाजप शिवसेनेची युती तुटल्याने बंब यांना मंत्रीपदापासून दूर राहावे लागले ,२०२४ ला झालेल्या निवडणुकीत चौथ्यांदा आमदार प्रशांत बंब भाजपकडून निवडून आलेले आहेत तब्बल २९ वर्षापासून मंत्रिमंडळात गंगापूर खुलताबादला मंत्रिमंडळात स्थान मिळालेले नाही आता बंब यांना मंत्री म्हणून स्थान मिळावे अशी मागणी गंगापूर खुलताबाद मतदारसंघातील नागरिकांकडून होत आहे .

## देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे म्हणून भाजपा महिला मोर्चाचे विठ्ठलाला साकडे



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी उत्कृष्ट अशी कामगिरी करत निकाल आपल्या बाजूने खेचून आणला त्यामुळे वाळूज येथील भाजपा जिल्हा महिला मोर्चाच्या वतीने देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करा असे विठ्ठलाला साकडे घालून महाआरती करण्यात आली. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस तथा महिला मोर्चा प्रभारी ज्योती गायकवाड ,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष जयमाला वाघ, युवा महिला मोर्चा अध्यक्ष वैशाली खेडकर, सरचिटणीस मोहिनी बडे, जिल्हा कोषाध्यक्ष रेखा नांदूरकर, तालुकाध्यक्ष नंदा राजपूत, सुनिता अहिरे, ड. पल्लवी तोडकर, रुपाली घाडगे, मनीषा खेडुलकर, सुनीता जोशी, प्रियांका घुगे, सुनीता पांडे, मनीषा वैजापूरकर आदी महिलांची उपस्थिती होती.

# सोयगाव आगारास दिवाळीच्या दहा दिवसात ४६.२४ लाखांची कमाई

### मराठवाड्यात सोयगाव बस आगार प्रथम



मराठवाड्यातील ४७ आगारांमधून सोयगाव आगाराने बाजी मारली आहे केवळ ३८ बसेस वर नियमित व अतिरिक्त जादा फेऱ्या करून कमी किलोमीटर मध्ये सोयगाव आगाराने हा विक्रम केला आहे यापूर्वीही सोयगाव आगारचा २००८ मध्ये राज्यात प्रथम २०२३ मध्ये राज्यात दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या सोयगाव आगाराने २०२४ मध्ये मराठवाड्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे..

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२७ नोव्हेंबर : सोयगाव एसटी आगारास दिवाळीच्या दहा दिवसात ४६ लाख रुपयाचे अधिकचे उत्पन्न मिळाले.त्यामुळे सोयगाव आगाराने मराठवाडा विभागातून प्रथम येण्याचा मान पटकाविला.मराठवाड्यातील ४७ आगारात सोयगाव आगार प्रथम आले आहे गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्न वाढल्याने आगार प्रमुख मनीष जवळीकर यांनी समाधान व्यक्त केले. सोयगाव आगाराच्या वतीने १ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर पर्यंत ३८ बसेस च्या माध्यमातून ज्यादा व नियमित फेऱ्या चालविण्यात आल्या.या दहा दिवसात १ लाख १० हजार ३३२ किलोमीटर झाले.यात १ लाख ४०हजार ९७१ प्रवाशांनी केलेल्या प्रवासातून आगारास ४६ लाख २४ हजार १९४ रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळाले. कमी अंतरात अधिक उत्पन्न या निकषांवर मराठवाडा विभागातील ४७ आगारांमधून सोयगाव आगाराने प्रथम क्रमांक मिळविला. दिवाळी असल्याकारणाने शाळांना सुट्टया होत्या म्हणून दररोज शाळेसाठी पाच बसेस च्या पाच फेऱ्या कराव्या लागत असत.परंतु सुट्ट्यांचा आगाराने फायदा घेत या बसेस नाशिक,पुणे,जळगाव,बुलढाणा,छत्रपती संभाजीनगर अशा मार्गावर पाठवून मोठ्या प्रमाणात जादा फेऱ्या करून घेतल्या. त्यामुळे आगारास चांगले उत्पन्न मिळाले.

सोयगाव आगार : मराठवाडा विभागातील ४७ आगारांपैकी १ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर पर्यंत प्रवासी भार नियमन व उत्पन्नात सोयगाव आगाराने प्रथम,सिल्लोड आगाराने द्वितीय तर वैजापूर आगाराने तृतीय क्रमांक मिळविलेला आहे. सोयगाव आगारचा कर्मचाऱ्यांची अहोरात्र मेहनत महत्वपूर्ण ठरली असून ऐन दिवाळीच्या काळात प्रवाशांची गैरसोय होऊ नये व आगाराच्या बसेस उभ्या राहू नये म्हणून चालक, वाहक,यांत्रिक कर्मचाऱ्यांच्या रजा गोठवून ठेवण्यात आल्या होत्या.या सर्व कर्मचाऱ्यांनी आमच्या विनंतीला मान देऊन अहोरात्र मेहनत घेतली व आगारास जास्तीचे उत्पन्न मिळाले.या मुळे सोयगाव आगारास प्रथम क्रमांक आहे.याकामी आगार प्रमुख मनीष जवळीकर,वाहतूक निरीक्षक सतीश अंभोरे,ए.बी. काकडे,सहाय्यक वाहतूक निरीक्षक केलास बागुल आदींनी पुढाकार घेतला होता.

# २६/११ हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : वाळूज महानगर परिसरात ठिकठिकाणी २६ /११ हल्ल्यात शाहिद झालेल्या शूरविरांना ठिकठिकाणी अभिवादन व श्रद्धांजली वाहण्यात आली.

**एमआयडीसी वाळूज पोलिस ठाणे** – येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलिस निरीक्षक कृषणाचंद्र शिंदे हे होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शहिदांना श्रद्धांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे सहा.पोलीस निरिक्षक संजय गित्ते, मनोज शिंदे, अरविंद शिंदे, , पोलीस उपनिरीक्षक विनोद आबुज, भाग्यश्री शिंदे, रावसाहेब काकड, , सफौ.बाबुराव पेदावाड, आशोक जाधव, पोह/ राजेंद्र उदे, अरूण उगले, सय्यद चाँद, धिरज काबलिये, बाळासाहेब आंधळे, नवाब खान, जयश्री फुके, जयश्री म्हस्के, पोअं. राजाभाऊ कोल्हे, सुरेश कचे, विक्रम वाघ, योगेश शळके, जालिंदर रंधे आदी उपस्थित होते.

**गरुड झेप कॅडमी** – करोडी येथील गरुडझेप कॅडमीमध्ये आयोजीत कार्यक्रमात संचालक प्रा. सुरेश सोनवणे व प्रा. निलेश सोनवणे यांच्या उपस्थित शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संपूर्ण कर्मचारी , विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मधुमेह आणि गर्भावस्था – राष्ट्रीय परिषदेत होणार मंथन

छत्रपती संभाजीनगर : गर्भधारणेपूर्वी मधुमेह असल्यास किंवा गर्भधारणे नंतर मधुमेह झाल्यास त्याचे आधुनिक उपचाराच्या मदतीने नियोजन करता येते, सुरक्षित प्रसूती होऊन आई आणि बाळ दोघेही निरोगी आयुष्य जगू शकतात. हे ज्ञान जनसामान्यांपर्यंत पोचावे यासाठी औरंगाबाद मधुमेह तज्ञ संघटनेच्या वतीने प्रेग्नसी स्टडी ग्रुप फॉर डायबेटीस २०२४ (पीसीजी)या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संघटनेतर्फे पत्रकार परिषदेत देण्यात आली.

दि. ३० नोव्हेबर आणि १ डिसेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेत देशभरातून चारशेच्यावर प्रतिनिधी सहभागी होणार आहेत तर देश आणि विदेशातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. शनिवार ३० रोजी दुपारी चार वाजता परिषदेचे उदघाटन रामा इंटरनॅशनल येथे होणार आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. मधुमेह असलेल्या महिलेला गर्भधारणेत अडचणी येतात. गर्भधारणा झाल्यानंतर ही काही आठवड्यानंतर मधुमेह होऊ शकतो. दोन्ही स्थितीत आई आणि बाळ दोघानांही धोका असतो. अशी गर्भधारणा आव्हानात्मक असली तरी आधुनिक वैद्यकीय ज्ञान आणि तंत्र यांच्या मध्यमातून सुरक्षित मातृत्व मिळवता येते.

मधुमेह आणि गर्भधारणा यासंदर्भात या परिषदेत मंथन होणार आहे. गर्भधारणेपूर्वी रक्तातील वाढीव साखरेचे नियोजन आहे, लठ्ठपणा आणि गर्भधारणा, गर्भधारणेदरम्यान रक्तातील उच्च साखरेची तपासणी, वैद्यकीय मार्गदर्शक तत्वे आणि उपचारपद्धती, इन्सुलिन आणि औषधोपचार, तंत्रज्ञान आणि आर्टिफिशिअल इंटलीजन्स, आहाराचे योग्य नियोजन, गर्भातील बाळाच्या वाढीचे निरीक्षण इत्यादी विषयांवर परिषदेत तज्ञांचे मार्गदर्शन आणि कार्यशाळा होणार आहे.

पुणे येथील ज्येष्ठ तज्ञ डॉ. चित्तरंजन याज्ञिक, केरळ येथील डॉ. ज्योतीदेव केसवदेव, तामिळनाडू हून डॉ भावतारिणी ,अहमदाबाद येथील डॉ. बन्सी साबू, ऋतुल गोकलानी , दिल्ली येथील डॉ. शालिनी जग्गी, डॉ राजीव चावला, मुंबई येथील डॉ. पूर्णिमा सातोसकर, उदय ठाणवाला, डॉ. रोहन डिसुझा , डॉ मयुरा काळे इत्यादी तज्ञांचे मार्गदर्शन दोन दिवसांच्या या परिषदेत होणार आहे.

छ. संभाजीनगर मधील ज्येष्ठ मधुमेह तज्ञ डॉ. संजीव इंदुरकर यांच्या नेतृत्वाखाली आणि पल्लवी याज्ञिक यांच्या सहकार्याने शहरातील विविध रुग्णालयातील पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांसाठी खास कार्यशाळा दि. ३० नोव्हेबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. यात ग्लुकोमीटर आणि इन्सुलिन सिरींजचा वापर, रुग्णाचा आहार अशा विविध विषयावर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पिएसजी २०२४ या परिषदेत मधुमेह आणि गर्भधारणा विषयावर सर्वांगाने उहापोह होणार आहे याचा फायदा डॉक्टरांच्या मदतीने तळागाळातील रुग्णांना करून देणे असल्याचे डॉ मयुरा काळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परिषद यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. संजीव इंदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली, सचिव डॉ. मयुरा काळे, उपाध्यक्ष डॉ. अजय रोटे, डॉ. दिपक भोसले, डॉ. अहसान शेख, डॉ. ऋतूल गोकलानी, डॉ. धर्मेंद्र पांचाल, डॉ. दिपक चुडासमा प्रयत्न करत आहेत.

## लएनडब्ल्यू इंडियाच्या कर्मचाऱ्यांद्वारा 'मंथ ऑफ गिव्हिंग'चा उपक्रम साजरा

पुणे – एक जागतिक गेमिंग तंत्रज्ञान कंपनी आणि लाईट अँड वंडर, इंक.ची उपकंपनी असलेल्या एलएनडब्ल्यू इंडिया सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (एलएनडब्ल्यू)च्या चेन्नई, पुणे आणि बंगळुरूमधील त्याच्या 'मन्थ ऑफ गिव्हिंग' उपक्रमाची सांगता झाली. कचरा कमी करणे आणि पर्यावरण संवर्धन प्रकल्पांवर स्वेच्छेने कार्य करत असलेल्या २८० हून अधिक कर्मचारी असलेल्या या उपक्रमांचा उद्देश कर्मचारी आणि स्थानिक समुदायांमध्ये स्वयंसेवा आणि पर्यावरणीय शाश्वतपणाची संस्कृतीची जोपासणी करणे आहे. वे फॉर लाइफ या पर्यावरण आणि समुदाय कल्याणासाठी समर्पित असलेल्या एनजीओच्या सहकार्याने, एलएनडब्ल्यूच्या कर्मचाऱ्यांनी दान केलेल्या वापरलेल्या टी-शर्टमधून २००पेक्षा जास्त कापडी पिशव्या अपसायकल केल्या. परत वापरता येण्याजोग्या पिशव्या स्थानिक भाजीपाला विक्रेत्यांना वितरीत केल्या जातील, जेणेकरुन त्यांचे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर टाळला जाऊ शकेल आणि पर्यावरण-अनुकूल पद्धतींना चालना मिळू शकेल. कर्मचाऱ्यांनी घरात या उपयुक्त अशा सवयी बाळगण्यासाठी काही विशिष्ट पिशव्या राखून ठेवल्या आहेत.

## गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी लसीकरण अनिवार्य करण्याची शिफारस

मुंबई : ए.आय.सी.सी आर.सी.ओ.जी ने नुकतेच लक्षित वयोगटातील महिलांमध्ये अनिवार्य एच.पी.व्ही लसीकरणाबाबत सर्वोत्तम आचरण मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. ऑल इंडिया कोओर्डीनेटिंग कमिटी ऑफ आर.सी.ओ.जी लसीकरणास पाठिंबा देते आणि सर्व पात्र व्यक्तींना ती मिळावी म्हणून जाहीर समर्थन देत आहे, कारण हे भारतातील एच.पी.व्ही आजारांचे प्रतिबंध आणि नियंत्रण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नुकत्याच एका पत्रकार परिषदेत फेमिना मिस इंडिया वर्ल्ड २०२४ निकिता पोरवाल ने सर्वोत्तम आचरण मार्गदर्शक तत्त्वांचे अनावरण केले आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधावर भाष्य केले. एम.एस.डी इंडिया या अहवालाचा प्रिंट आणि वितरण भागीदार आहे. जागतिक स्तरावर महिलांना कर्करोग होण्याचे चौथे मुख्य कारण म्हणजे गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात असे म्हटले गेले आहे की भारतातील सुमारे ९८.४% गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या घटनांसाठी ह्यूमन पॅपिल्लोमाव्हायरस (एच.पी.व्ही) चे एकूण नऊ प्रकार जबाबदार आहेत. भारतीय महिलांना होणाऱ्या कर्करोगात हा दुसरा कर्करोग आहे जो १५ ते ४४ वयोगटातील महिलांना होतो.

## तेनाली रामा- एक विलक्षण व्यक्तिमत्व- जे आजही सुसंबद्ध आहे

आजच्या गतीशील युगात आपल्या दैनंदिन समस्या सोडवण्यासाठी आपण इंटरनेट आणि टेक्नॉलॉजीचा आधार घेत असतो, पण आपल्या अक्कल हुशारीने आणि चतुराईने समस्यांवर तोडगा शोधणारे तेनाली रामा हे विलक्षणनररत्न १६व्या शतकात भारतात होऊन गेले, जे आजही वंदनीय आहे. विजयनगर साम्राज्याच्या दरबारातील तेनाली रामाच्या कथा आणि त्याचे जीवन आजही आपल्यासाठी प्रेरणादायक आहे.तेनाली रामा,आपले बुद्धीचातुर्य, करुणा आणि समस्या सोडवण्याची विलक्षण हातोटी याबद्दल ओळखला जातो. तेनाली रामा या त्यांच्या लोकप्रिय मालिकेच्या नव्या एपिसोड्सच्या माध्यमातूनसोनी सब ही वाहिनी पुन्हा एकदातेनाली रामाच्या सदाबहार गोष्टी आपल्या प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहे. ही मालिका बघताना त्याचे चातुर्य आजही कसे सुसंबद्ध आहे याचा अनुभव प्रेक्षकांना येईल.

## तरबेज गिरगिटच्या भूमिकेत दिसणार सुमित कौल

सोनी सबची लोकप्रिय मालिका 'तेनाली रामा' टेलिव्हिजनच्या पडद्यावर परत येत आहे, एका थरारक कलाटणीसह! या मालिकेत गिरगिट नामक एक नवीन व्यक्तिरेखा दाखल होत आहे. ही भूमिका साकारली आहे प्रतिभावान अभिनेता सुमित कौल याने. गिरगिट हा सर्वसामान्य खलनायकासारखा नाही. ती एक गुंतागुंतीची व्यक्तिरेखा आहे. त्याची फसवेगिरी आणि कुटिल स्वभाव यामुळे दरबारी तेनाली रामासमोर मोठमोठी आव्हाने येत असतात.

## ओरल केअरमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे

मुंबई- महर्षी आयुर्वेद, अस्सल आयुर्वेदाचा जागतिक दर्जा असलेला ब्रँड, आयुरडेंट क्लासिक टूथपेस्टसह ३० हून अधिक देशांमध्ये दंतचिकित्सेच्या क्षेत्रात परिवर्तन घडवण्याचे ध्येय बाळगून कार्यरत आहे. कल्की कोचलिनसोबत सुरू असलेली राईटयुवररॉंग्स मोहीम आयुर्वेदातील सर्वोत्तम गोष्टींचा आधुनिक वैज्ञानिक पद्धतीने सारांश देते. ही उत्कृष्ट आयुरडेंट क्लासिक टूथपेस्ट २० आयुर्वेदिक औषधी वनस्पती आणि आवश्यक तेलांच्या सामर्थ्यशाली मिश्रणाने तयार केली गेली आहे. लाळेचे नैसर्गिक संतुलन सुधारण्यासाठी डिझाइन केलेली, ही टूथपेस्ट आधुनिक काळातील तोंडाच्या काळजीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. फोमिंग नसलेली, फ्लोराईड आणि डङड मुक्त आयुरडेंट टूथपेस्ट दात किडणे, हिरड्यांचे आजार आणि संवेदनशीलता यांसारख्या समस्यांपासून बचाव करते आणि दात व हिरड्यांना नैसर्गिकरीत्या मजबूत बनवते..

## 'किसको था पता'च्या अधिकृत ट्रेलरचे अनावरण


मुंबई : तीन हृदये, तीन प्रवास, एक अंतिम स्थळ – प्रवेश करा प्रेम, उत्कटता आणि ध्यासाच्या जगामध्ये, झी सिनेमा अनावृत्त करत आहे आपल्या बहुप्रतीक्षित फिल्म 'किसको था पता'चा ट्रेलर. विख्यात फिल्म मेकर रत्ना सिन्हा दिग्दर्शित हा चित्रपट आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या निवडीबद्दलची कथा आहे. अक्षय ओबेरॉय, अशनूर कौर आणि आदिल खान यांच्या भूमिका असलेल्या या चित्रपटामधून नातेसंबंधांमधील जटिलता टिपण्यात येते. भावनांचे वादळ आणि आयुष्य बदलणाऱ्या निवडी यांमध्ये हे तीन जीव एकत्र येतात. 'किसको था पता' या 'झी सिनेमा फिल्म'चा एक्सक्लुझिव्ह प्रीमियर या ख्रिसमसमध्ये २५ डिसेंबर रोजी पाहायला विसरू नका फक्त झी सिनेमावर!

## रक्तदानाने जीवनदान: २६/११ शहीदांच्या स्मृतार्थ अल्ट्रा मीडियाचा उपक्रम



२६/११ च्या शूर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या उद्देशाने, अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लि. चे सुषीलकुमार अग्रवाल आणि रेवा अग्रवाल यांनी मुंबईतील परमार्थ सेवा समितीच्या वतीने आयोजित १९९ व्या मेगा रक्तदान शिबिराला प्रायोजित केले. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सीएसटी रेल्वे स्थानकावर आयोजित या शिबिराने केवळ शहीदांच्या बलिदानाचा सन्मान केला नाही तर अनेकांना जीवन वाचवण्यासाठी या महान कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. हे आयोजन मानवता आणि एकतेच्या त्या भावना दर्शवते, जी कोणत्याही संकटात आपल्याला एकत्र ठेवते.

## जिल्हा प्रशासनाच्यावतीने संविधान दिन साजरा



अहिल्यानगर : जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भारतीय संविधानाची माहिती दिली, तसेच संविधानाच्या उद्देशीकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील,उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल, पाटील, उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवळ,जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## संविधान अमृत महोत्सवी वर्षात 'घर घर संविधान' अभियान;

# अधिकारांसोबत कर्तव्यांबाबतही जागरुक रहावे : दिलीप स्वामी







छत्रपती संभाजीनगर – भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या वर्षात ' घर घर संविधान' हे अभियान राबविण्यात येणार आहे. आज यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान उद्देशिकेचे सामुहीक वाचन करण्यात आले. प्रत्येक भारतीयाने संविधानाबाबत आदर बाळगावा व संविधानाने आपल्याला दिलेल्या अधिकारांसोबत कर्तव्यांबाबत जागरुक राहून कर्तव्य पालनही करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात हा कार्यक्रम झाला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, डॉ. व्यंकट राठोड, एकनाथ बंगाळे आदी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखाप्रमुख व अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, भारतीय राज्यघटना ही अथक परिश्रम आणि सखोल अभ्यासाअंती तयार करण्यात आलेला एक दस्तऐवज आहे. या संविधानाद्वारे आपल्या देशाचा कारभार चालतो. या संविधानाने दिलेल्या समानता, बंधुता, सगळ्यांना संधीची समानता, स्वातंत्र्य अशा विविध मुलभूत अधिकारांमुळे आपले जीवन अधिक समृद्ध होत आहे. त्यामुळे आपण सगळ्यानी संविधानाप्रती कृतज्ञ असले पाहिजे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करतांना आपण आपल्या कर्तव्यांप्रतीही जागरुक असले पाहिजे,असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

प्रारंभी संगिता राठोड यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश कथन केला. सामुहिकरित्या संविधान उद्देशिकेचे वाचन झाले. त्यानंतर डॉ. सुचिता शिंदे यांनी संविधान निर्मितीची प्रक्रिया सांगितली. एकनाथ बंगाळे यांनी आभार मानून समारोप केला.

असे आहे घर घर संविधान अभियान

घर घर संविधान हे अभियान राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतीगृहे, शासकीय निवासी शाळा, शासनमान्यताप्राप्त अनुदानित, विनानुदानित, स्वयंअर्थसहाय्यित शाळा, आश्रमशाळा, वसतीगृहे, ग्रामिण व नागरी स्वराज्य संस्था अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्य घटनेबाबत, घटनात्मक अधिकार, कर्तव्ये याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे.

अभियानाचा उद्देश : १. संविधानाचे महत्त्व, मूल्य, अंमलबजावणी याबाबत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच भावी नागरिकांमध्ये जागरुकता वाढविणे.

२. संविधानातील मुलभूत हक्क, कर्तव्ये आणि विविध तरतुदींचे शिक्षण देणे, त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजविणे.

३. भारतीय संविधानातील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विविधतेतून एकता आणि समता या संकल्पनांचा विकास होईल.

४. संविधान अध्ययनानुळे आणि चर्चेद्वारे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांची जाणीव करुन देऊन त्यांच्या जबाबदारांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे.

५. व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा प्रचार व प्रसार करुन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करणे.

या उद्दिष्टांनुसार सन २०२४-२५ हे वर्ष संविधान अमृत महोत्सवी वर्ष असून घर घर संविधान अभियान राबविण्यात येणार आहे.

अभियानाचे स्वरुप : त्यासाठी शाळा महाविद्यालये वसतिगृह यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान उद्देशिकेचे वाचन विद्यार्थ्यांकडून करुन घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रति विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे, भारतीय संविधानाबाबत सर्वसाधारण माहिती जसे निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान आयोजित करुन माहिती देणे, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क आणि कर्तव्ये यावर मार्गदर्शन करणे. कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्वज्ञान आणि मूल्य समजावून सांगणे, संविधान मुल्ये याविषयावर पथनाट्य तयार करणे, शाळा महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे, संविधानावर आधारीत निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इ. उपक्रमांचे आयोजन करणे, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करणे , स्थानिक स्वराज्य संस्थांनी वार्षिक ,मासिक सभा, ग्रामसभांमध्ये प्रास्ताविकेचे वाचन करावे , जिल्हानिहाय संविधान संमेलन आयोजित करण्याचे निर्देश शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

जिल्हास्तरीय समिती करेल नियोजन

संविधान कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती तयार करण्यात आली असून जिल्हाधिकारी हे समितीचे अध्यक्ष असून निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव आहेत. या समितीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व मुख्याधिकारी नगरपालिका, नगरपंचायत, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, महिला व बालविकास अधिकारी जिल्हा परिषद, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण हे सदस्य असतील. जिल्हास्तरीय समिती ही वार्षिक योजना तयार करुन विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करेल.

## म्युच्युअल फंड व्यवसायाच्या वाढीच्या पुढील लाटेत महाराष्ट्रातील उभरत्या बाजारपेठांचे लक्षणीय योगदान अपेक्षित

### नोकरीच्या विस्तारलेल्या संधी आणि वैयक्तिक उत्पन्नाची वाढती पातळीमुळे गुंतवणूकदारांना म्युच्युअल फंडांचा वाढता ओढा

छत्रपती संभाजीनगर, २६ नोव्हेंबर २०२४: छत्रपती संभाजीनगर, हे महाराष्ट्रातील एक उदयोन्मुख औद्योगिक केंद्र आहे आणि जिल्ह्यात अलीकडेच मोठ्या उद्योग घराण्यांकडून गुंतवणुकीचे प्रस्ताव पुढे आले आहेत. मराठवाड्यातील उद्योगांसाठी पायाभूत सुविधा वाढवण्याबरोबरच, सरकारने छत्रपती संभाजी नगर जिल्हा आणि विभागात नवीन औद्योगिक प्रकल्प आकर्षित करण्यासाठी ५२,००० कोटींची महत्त्वपूर्ण तरतूद केली आहे.

महत्त्वाचे म्हणजे, राष्ट्रीय जीडीपीमध्ये महाराष्ट्र राज्याचा वाटा सर्वाधिक आहे, जो आर्थिक वर्ष २०२३ मध्ये १३.३० ट्क्के असा होता. विद्यमान २०२४-२५ आर्थिक वर्षामध्ये राज्याचे अनुमानित सकल राज्य देशांतर्गत उत्पादन (जीएसडीपी) ४२.६७ लाख कोटी रुपये आहे, जे पुन्हा देशात सर्वाधिक आहे. त्यात विस्तारित औद्योगिकीकरण, नोकरीच्या अधिकाधिक संधी आणि वाढत्या वैयक्तिक उत्पन्नामुळे लोकांना लाभदायक आणि विकासोन्मुख गुंतवणूक पर्याय शोधण्यास प्रवृत्त केले जाते आणि हे सर्व घटक म्युच्युअल फंड व्यवसायाच्या वाढीसाठी आश्वासक आहेत.

भारतीय म्युच्युअल फंड उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता (एयूएम) ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी रु. ६७.२५ लाख कोटी आहे. उल्लेखनीय म्हणजे, राज्यांमध्ये महाराष्ट्राचा एयूएममध्ये देशांत सर्वाधिक वाटा आहे, ज्याने एकूण म्युच्युअल फंड मालमत्तेत रु. २७.८९ लाख कोटींचे योगदान दिले आहे. सध्या, छत्रपती संभाजी नगरमधील म्युच्युअल फंड उद्योगाचे एयूएम अंदाजे रु. ३४,२०० कोटी आहे आणि एलआयसी म्युच्युअल फंडाचा त्यात हिस्सा रु. १३२ कोटी आहे. प्रदेशातील वाढीची क्षमता पाहता, एलआयसी म्युच्युअल फंडाने अलीकडेच छत्रपती संभाजी नगर येथे एक शाखा उघडली आहे.

एलआयसी म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रवी कुमार झा म्हणाले, महाराष्ट्रातील उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये म्युच्युअल फंड गुंतवणुकीत लक्षणीय वाढ दिसून येत आहे. कारण लोकांना म्युच्युअल फंडासारख्या बाजाराशी निगडीत उत्पादनांमध्ये गुंतवणूक करण्याचे महत्त्व आणि गरज ही जाणवू लागली आहे. म्हणूनच, म्युच्युअल फंड गुंतवणुकीतील वाढीची पुढील लाट ही छत्रपती संभाजी नगर सारख्या समृद्ध निमशहरी बाजारपेठांमधून येण्याची अपेक्षा आहे.

व्यावसायिक निधी व्यवस्थापकांच्या तज्ञ सल्ल्याने आणि मार्गदर्शनाने शेअर बाजाराच्या वाढीचा लाभ घेण्याची संधी ही या क्षेत्रांतील म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांसाठी खरोखरच रोमांचक आणि मुख्य म्हणजे फायद्याची देखील ठरली आहे.

## फारोळा ग्रामपंचायत कार्यालयात संविधान वाचन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ नोव्हेंबर : पैठण तालुक्यातील आज दि २६ मंगळवार रोजी फारोळा ग्रामपंचायत कार्यालया येथे सरपंच सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला संविधान वाचन करण्यात आले यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी आशाताई तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे, शिवाजी गोरे रेखा इंदापुरे,कोमल निकम,दिलीप गोरे,तेजस जाधव,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ अदि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उमेदवारांच्या गावात शिवसेनेचा दबदबा ! संजना जाधवांना मिळाली आघाडी



तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२५ नोव्हेंबर : तालुक्यात शिवसेनेचा दबदबा विधानसभा निवडणुकीत पहायला मिळाला यात प्रमुख उमेदवारांच्या व पदाधिकाऱ्यांच्या गावात मतदानाच्या बाबतीत शिवसेनेच्या विजयी उमेदवार संजना जाधव यांचा दबदबा पाहवयास मिळाला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार उदयसिंग राजपूत यांच्या नागद या गावात त्यांना फक्त १५७ मताची आघाडी मिळाली आहे. उदयसिंग राजपूत यांना १ हजार १७६ मते मिळाली तर संजना जाधव यांना १ हजार १९ मते मिळाली आहे.

तर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संतोष कोल्हे हे महायुतीच्या प्रचारा पासून दूर होते तरी सुद्धा त्यांच्या करंजखेड या गावात संजना जाधव यांना प्रथम क्रमांकाची मते मिळाली.

करंजखेड येथे त्यांना १ हजार ८४८ मते मिळाली. तर उदयसिंग राजपूत यांना १ हजार ३९४ मते मिळाली. संजना जाधव व हर्षवर्धन जाधव यांच्या पिशोर गावात ११ हजार २८० मतांपैकी संजना जाधव यांना हर्षवर्धन जाधव यांच्यापेक्षा मात्र १४६ मते जास्तीची मिळाली. संजना जाधव यांना ४ हजार २६७ तर हर्षवर्धन जाधव यांना ४ हजार १२१ तर उदयसिंग राजपूत यांना २ हजार ९२ मते मिळाली आहेत . कन्नड शहरातील आपल्या होम ग्राऊंडवर अपक्ष मनोज पवार व वंचित बहुजन आघाडीचे अयाज शहा यांना मतदारांनी चौथ्या व पाचव्या क्रमांकावर मागे लोटले.

शहरात प्रथम क्रमांकाची मते संजना जाधव यांनी पदरात पाडून घेतली. शहरात झालेल्या २३ हजार ८२ मतांपैकी संजना जाधव यांना ७ हजार ५४ मते मिळाली, उदयसिंग राजपूत यांना ५ हजार ४७८ मते मिळाली, हर्षवर्धन जाधव यांना ४ हजार ५५२ मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीचे अयास शहा यांना २ हजार ५९४ मते मिळाली अपक्ष मनोज पवार यांना १ हजार ३११ मतांवर समाधान मानावे लागले. १६ उमेदवारांपैकी संजना जाधव, हर्षवर्धन जाधव व उदयसिंग राजपूत या तीन उमेदवारा व्यतिरिक्त १३ उमेदवारांचे डिपॉझिट रक्कम जप्त झाली आहे. यामध्ये वंचित आघाडी व मनसे या प्रमुख पक्षाच्या उमेदवारांचा समावेश आहे.

## २८ परीक्षा उपकेंद्राच्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश

अहिल्यानगर दि. २७- महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त सेवा पूर्व परीक्षा २०२४ चे आयोजन दि. १ डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत जिल्ह्यातील २८ उपकेंद्रांवर करण्यात आले आहे. परीक्षा उपकेंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी उप विभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षा उपकेंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी. आय.एस.डी, फॅक्स केंद्र, ध्वनीक्षेपक, झेरॉक्स मशिन, स्कॅनिंग मशिन, मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वस्तु कार्यान्वित ठेवण्यात येऊ नयेत.

परीक्षा उपकेंद्राच्या परिघामध्ये परिक्षार्थी म्हणून घोषित केलेले उमेदवार व परीक्षा पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना वाहनांने अथवा पायी फिरण्यास, उभे राहण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## भारतीय संविधान दिन शासकीय कार्यालयात अधिकाऱ्यांवीना साजरा





तभा वृत्तसेवा

कन्नड:- ७५ वा भारतीय संविधान दिन शासकीय निमशासकीय, शाळा,महाविद्यालयात दि.२६ रोजी साजरा करण्यात आला.

भारतीय संविधान दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान कन्नड येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले यावेळी कन्नड सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक अनिल शिरसाट, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गणेश मोरे, बहुजन क्रांती मोर्चाचे तालुका अध्यक्ष कडुबा पवार, डॉ नितीन सरोदे, सतीश धनेधर,संदीप कनकुटे, अमोल साळवे, बापूसाहेब मोरे, शकुंतला देहाडे,सागर मोरे, राहुल जाधव आदी सह उपस्थित होते

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालय येथे भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला तसेच २६/११ च्या मुंबई येथील आतंकवादी हल्ल्यातील शहीद जवानांना विनम्र अभिवादन करण्यात आले

यावेळी विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे, प्रदीप भोकन यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले, दिपक जाधव यांनी संविधान दिनाविषयी सविस्तर अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सामूहिक संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे वाचन केले. यावेळी जगमोहन मुंडवाडकर, ज्ञानेश्वर नायकुडे, योगेश जंजाळ, दत्तात्रय गायके,लक्ष्मण पांडव,संतोष आग्रे, सुनिता दाबके, सुनिता बाविस्कर,यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान म्हैसमाळे यांनी केले

### शासकीय अधिकाऱ्यांमध्ये गांभीर्य नाही दिसले

शहरातील शासकीय कार्यालयात भारतीय संविधान दिन साजरा झाला पण कार्यालयीन अधिकाऱ्यांची मात्र अनुपस्थिती होती यातील सार्वजनिक बांधकाम विभाग,सामाजिक वनीकरण विभाग,आदी महत्वाच्या कार्यालयात कार्यालयीन अधिकारी उपस्थित नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे,एकीकडे शासन भारतीय संविधान दिन साजरा करण्यासाठी आदेशीत करत असताना मात्र तालुक्यातील अधिकाऱ्यांनी त्याचे गांभीर्य न ठेवता आपल्या मनमर्जीने वागत आहेत याकडे वरिष्ठांनी बघणे गरजेचे आहे,एरवी कार्यालयाकडे ढुंकून न पाहणारे अधिकारी निदान भारतीय

## शेतकऱ्यांसाठी फलोत्पादन विषयावर प्रशिक्षणाचे आयोजन

अहिल्यानगर दि.२७- मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना फलोत्पादन व अनुषंगिक विषयावर संस्थानिहाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असून इच्छुक शेतकऱ्यांनी प्रशिक्षणासाठी कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे. शेतकऱ्यांना फळे व भाजीपाला रोपवाटीका, कृषी व्यापाराबाबत धोरण व निर्यातीबाबत माहिती, जुन्या फळबागांचे पुनरुज्जीवन, ड्रॅगनफ्रुट व जिरॅनियम व नाविन्यपूर्ण पिकांचे उत्पादन, प्रक्रिया व विपणन, हरितगृह, पॉलीहाऊस व्यवस्थापन हॉर्टीकल्चर एक्सपोर्ट प्रशिक्षण, फळे व भाजीपाला काढणीपश्चात व्यवस्थापन आदींबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तीन ते पाच दिवसांच्या या निवासी प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षण साहित्य, चहापान, भोजन व निवास व्यवस्था आदी सुविधा पुरविण्यात येणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

## अनाथ बालक प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करावेत

अहिल्यानगर दि.२७- अनाथ बालकांना शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा यासाठी 'शासन आपल्यासोबत (साथी)' अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पात्र अनाथ बालकांना अनाथ प्रमाणपत्रांचे ३० नोव्हेंबर, २०२४ पर्यंत वितरण करण्यात येणार आहे. अनाथ बालकांनी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी एन.बी. कराळे यांनी केले आहे.

आई-वडीलांचा मृत्यू बालकाचे वय १८ वर्षे पूर्ण होण्याअगोदर झालेली बालके अनाथ प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर करू शकतात. प्रमाणपत्रासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, वंदे मातरम कॉलनी, नगर-कल्याण रोड, शिवाजीनगर, अहिल्यानगर येथे अर्ज सादर करावेत,असेही कळविण्यात आले आहे.

# लाडक्या बहिणीने मोठे पक्षअपक्षासह छोटे पक्षही संपवले

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी विरुध्द महायुतीतील तूल्यबळ उमेदवारांच्या प्रतिष्ठेच्या लढाईत महाराष्ट्र नवनिर्माण सेना, एमआयएम, बहुजन समाज पार्टीसह अन्य छोटे पक्ष व अपक्ष उमेदवार अक्षरशः भूईसपाट झाले.

परभणीत राष्ट्रीय समाज पक्ष, एमआयएम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या घटक पक्षांबरोबर मोहम्मद गौस झैन व अन्य अपक्षांचा सुपडा साफ झाला. तर जिंतूरातही राष्ट्रीय समाज पक्ष, एमआयएम व बहुजन समाज पार्टीच्या उमेदवारांन नगण्य मते मिळाली. गंगाखेडात महाराष्ट्र नवनिर्माण सेना व भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष विठ्ठल रबदडे यांना नगण्य मते मिळाली. पाथरीतून चौघा तूल्यबळांव्यतिरिक्त माधवराव फड यांनी १० हजार ५४४ मते मिळवून थोडाफार प्रभाव दाखवला. परंतु, वंचित बहुजन आघाडी व अन्य अपक्षांचे डिपॉझिट जप्त झाले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत परभणी जिल्ह्यातील ९५-जिंतूर विधानसभा मतदारसंघातून बोर्डीकर मेघना दिपक साकोरे (पक्ष-भारतीय जनता पार्टी), ९६-परभणी विधानसभा मतदारसंघातून डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील (पक्ष-शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे), ९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघातून गुट्टे रताकर माणिकराव (पक्ष-राष्ट्रीय समाज पक्ष), ९८-पाथरी विधानसभा मतदारसंघातून राजेश उत्तमराव विटेकर (पक्ष-नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी) हे विजयी झाले.विधानसभा मतदारसंघनिहाय उमेदवारांचे नाव, पक्ष व त्यांना मिळालेली मतांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.




९५-जिंतूर विधानसभा मतदारसंघ- अनिल बन्सी चव्हाण (बहुजन समाज पार्टी)-६९२, बोर्डीकर मेघना दिपक साकोरे (भारतीय जनता पार्टी)-११३४३२, भांबळे विजय माणिकराव (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)-१०८९१६, नागरे सुरेश कुंडलिकराव (वंचित बहुजन आघाडी)-५६४७४, डॉ. प्रभाकर बुधवंत (राष्ट्रीय समाज पक्ष)-१०९१, रमेश भिमराव राठोड (जय सेवालाल बहुजन विकास पार्टी)-४६१, शेख सलिम शेख इब्राहिम (ऑल इंडिया मजलिस-ए-इन्कलाब-ए-मिल्लत)-३७०, सुभाष किसन वाव्हळे (बहुजन रिपब्लीकन सोशलिस्ट पार्टी)-२७९, अच्युत लिंबाजी कदम (अपक्ष)-२२३, अतुल निवृत्ती अंभोरे (अपक्ष)-२०२, अमोल लक्ष्मण डंबाळे (अपक्ष)-५३९, राजीव किशनराव पंचांगे (अपक्ष)-४२२, विजय अण्णासाहेब ठोंबरे (अपक्ष)-१०३५, विनोद दत्तात्रय भवाळे (अपक्ष)-७४३०, सय्यद रियाज गफुर सय्यद (अपक्ष)-६६३, सुखदेव उद्धव भांबळे (अपक्ष)-७१४, ज्ञानदेव नारायणराव दाभाडे (अपक्ष)-१६४, नोटा-१३३५.

९६-परभणी विधानसभा मतदारसंघ- आनंद शेषराव भरोसे (शिवसेना)-९२५८७, डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील (शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे)-१२६८०३, श्रीनिवास सुरेशचंद्र लाहोटी (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)-९८६, ड.इम्तियाज खान (ऑल इंडिया मजलिस-ई-इत्तेहादूल मुस्लीमीन)-७६४, चकोर महामुनी सावित्री (राष्ट्रीय समाज पक्ष)-१७७९, विजय अदिनाथराव वरवंटे (बुलंद भारत पार्टी)-५२६, ड. अफजल बेग सहाब (अपक्ष)-१४६, गोविंद भैया रामराव देशमुख पेडगावकर (अपक्ष)-११०, चत्रगुण अवचार पाटील नेते (अपक्ष)-१७८, दिपक बलराम शिंदे (अपक्ष)-२२२, नासेर शरीफ शेख (अपक्ष)-५४४२, अ.पाशा.अ.गफार कुरेशी (अपक्ष)-११३, फारुख खान रौफ खान (अपक्ष)-२२८, मौहम्मद गौस झैन (अपक्ष)-१७७३, सुर्यकांत रोहिदास मोगल (अपक्ष)-७६९, नोटा-१३५५.

९७-गंगाखेड विधानसभा मतदारसंघ- कदम विशाल विजयकुमार (शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे)-११५२५२, देशमुख रुपेश मनोहरराव (महाराष्ट्र नवनिर्माण सेना)-२४७९, गुट्टे रताकर माणिकराव (राष्ट्रीय समाज पक्ष)-१४१५४४, माधव सोपानराव शिंदे (राष्ट्रीय मराठा पार्टी)-१२०३, विठ्ठल जिवनाजी रबदाडे (जनहित लोकशाही पार्टी)-२४६३, सिताराम घनदाट (मामा)(वंचित बहुजन आघाडी)-४३०२६, अलका विठ्ठल साखरे (अपक्ष)-६१७, नामदेव रामचंद्र गायकवाड (अपक्ष)-४६३, भोसले विष्णुदास शिवाजी (अपक्ष)-३३६, विठ्ठल सोपानराव निरस (अपक्ष)-४९६, विशाल बालाजीराव कदम (अपक्ष)-१४७०, ड. संजीव देवराव प्रधान (अपक्ष)-४९६, नोटा-१४७०.

९८-पाथरी विधानसभा मतदारसंघ- राजेश उत्तमराव विटेकर (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी)-८३७६७, वरपुडकर सुरेश अंबादासराव (इंडियन नॅशनल काँग्रेस)- ७०५२३, खान सईद (गब्बर)(राष्ट्रीय समाज पक्ष)-५४६४७, जाधव गणेशनाथ आदिनाथ (स्वराज्य शक्ती सेना)-६८७, इंजि. सुरेश किशनराव फड (वंचित बहुजन आघाडी)-५४१५, त्रिंबक देविदास पवार (ऑल इंडिया हिंदूस्थान काँग्रेस पार्टी)-७१५, अब्दुल खान लतिफ खान दुर्रानी (बाबाजानी)(अपक्ष)-४८२५७, अर्जुन ज्ञानोबा भिसे (अपक्ष)-३७३, किशोरकुमार प्रकाश शिंदे (अपक्ष)-१२३४, चंद्रसिंग एकनाथ नाईक (अपक्ष)-७०२, माधवराव तुकाराम फड (अपक्ष)-१०५४४, राजेश बालासाहेब पाटील (अपक्ष)-१०१९, शिवाजी देवजी कांबळे (अपक्ष)-११८३, समाधान अश्रोबा साळवे (अपक्ष)-७२२, नोटा-१६५७ असे आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### १ व २ डिसेंबर रोजी चतुरंगची व्याख्यानमालेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील चतुरंग प्रतिष्ठानच्यावतीने १ व २ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण स्मृती व्याख्यानमालेत १ डिसेंबर रोजी सौ. सिताबाई मोहिते व २ डिसेंबर रोजी प्रा. गणेश शिंदे हे या दोघा वक्त्यांचे व्याख्यान होणार आहे.

वसमत रस्त्यावरील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६ वाजता आयोजित केलेल्या या व्याख्यानमालेत सौ. सिताबाई मोहिते या 'मी केले तुम्ही करा, उद्योगाची कास धरा' या विषयावर तर प्रा. गणेश शिंदे हे 'संत परंपरा व आजची पिढी' या विषयावर विचार मांडणार आहेत.
यावर्षी व्याख्यानमालेचे हे २०वे वर्ष आहे. या व्याख्यानमालेत दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या वक्त्यांचा समावेश राहिला आहे.

### गंगाखेडात गुटख्याचा साठा जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** गंगाखेड येथील परळी नाका भागात स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या एका पथकाने गुटख्याचा साठा जप्त केला.

या पथकास गुप्त माहिती कळाल्याबरोबर पथकाने परळी नाका भागात स्वीफ्ट डिझायर हे वाहन थांबवून तपासणी केली, तेव्हा २७ पांढऱ्या रंगाच्या पिशव्यातून गोवा गुटख्याचा साठा सापडला. पोलिसांनी शिवम दिगंबर निरस यास ताब्यात घेतले. त्याने परळी येथील अजमत शेख याच्याकडून तो गुटखा खरेदी केल्याचे तपासातून पुढे आले. पोलिसांनी गुटख्याचा साठा व एम.एच.४८ एफ. १९२९ या कारसह एकूण ७ लाख ७२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला व दोघांविरोधात गुन्हे दाखल केले.

### अवलगावच्या युवतीचा सर्पदंशाने मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** सोनपेठ तालुक्यातील आवलगांव येथील एका तरुणीचा सर्पदंशाने मृत्यू झाला. सोमवारी (दि.२५) दुपारी ही दुर्दैवी घटना घडली.

या गावातील भाग्यश्री भरत मस्के (वय १९) ही तरुणी शेतातून घरी येत असतांना तीला रस्त्यातच विषारी सापाने दंश केला. कुटूंबियांनी तात्काळ या तरुणीला अंबेजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचार सुरु असतांनाच या तरुणीचा मृत्यू झाला. या घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

### पाण्यात बुडून एका व्यक्तीचा मृत्यू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील अंबरवाडी शिवारातील शेतामध्ये येलदरी धरणाच्या ओढ्याच्या पाण्यात मोटार लावण्याकरीता गेलेल्या एका शेतकऱ्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

प्रल्हाद आनंता घुगे (वय ५७) हे रविवार २४ नोव्हेंबर रोजी सकाळी शेतातील पिकांना पाणी देण्याकरीता मोटार लावण्याच्या कामात व्यक्त होते. त्यावेळी ही घटना घडली. बामणी पोलिस ठाण्यात या संदर्भात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### संविधान दिनानिमित्त हस्ताक्षर स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण व्हावी व सुंदर हस्ताक्षराला प्रोत्साहन मिळावे याकरीता शारदा विद्यालयाच्या प्राथमिक विभागाच्या वतीने मंगळवारी (दि.२६) भारतीय संविधान दिनाचे औचित्या साधून हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत पहिली-दुसरी आणि तीसरी-चौथी अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी भारतीय संविधानाच्या प्रस्तावना विद्यार्थ्यांना सुंदर हस्ताक्षरात लिहिण्यास देण्यात आला. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या अक्षराची स्वच्छता, वळण, आणि वाचनसुलभता यावर गुणांकन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संविधान दिनाचे महत्त्व व संविधान निर्मितीचा इतिहास शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. र.र. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सांगण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी अभिमान निर्माण करण्यासाठी लघु सादरीकरण देखील सादर करण्यात आले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

## राजेश विटेकरानंतर आता विधान परिषदेवण कोण ?

**परभणी,/प्रतिनिधी-** दोन महिन्यापूर्वीच विधान परिषदेवर निवडून गेलेले राजेश विटेकर हे या विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आल्यानंतर त्यांना विधान परिषदेचा राजीनामा द्यावा लागेल यानंतर जिल्ह्यातून या पदावर कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सुरुवातीला राजेश विटेकर यांच्या आई निर्मला विटेकर यांना विधानसभेची उमेदवारी जाहीर झाली होती परंतु नंतर काही घडामोडी घडल्यावर राजेश विटेकर यांना विधानसभेची निवडणूक लढवण्यास सांगण्यात आले होते राजेश विटेकर दोन महिन्यापूर्वीच विधान परिषदेवर निवडून गेलेले होते तरीसुद्धा त्यांनी अजित पवार यांच्या आग्रहाखातर विधानसभा लढले



व ते जिंकूनही आले आता राजेश विटेकर यांना विधान परिषदेचा राजीनामा द्यावा लागणार आहे त्यांच्या राजीनामा नंतर जिल्ह्यामध्ये कोणाची वर्णी लागते याबद्दल चर्चा सुरू आहे यात काही नावावर विचार होऊ शकतो यामध्ये रासपाकडून चांगली झुंज दिलेले सईद खान अनिल नखाते भावनाताई नखाते मानवत चे अंकुश लाड हरिभाऊ लहाने दादासाहेब टेंगसे यांची नावे देखील चर्चेमध्ये आहेत राजेश विटेकर यांना विधान परिषदेवर निवडून जाण्यासाठी मी मुख्यमंत्र्याला शब्द टाकला होता असे रासपाचे उमेदवार शहीद खान यांनी वारंवार आपल्या भाषणादरम्यान केला होता ते मुख्यमंत्र्याच्या अत्यांत जवळ असल्यामुळे विधान परिषदेवर त्यांची वर्णी लागू शकते किंवा विधान परिषद अजितदादा गटाकडे असल्यामुळे भावनाताई नखाते अनिल नखाते दादासाहेब टेंगसे यांचा देखील विचार निश्चित होऊ शकतो विधान परिषदेचा आमदार निवडताना राजेश विटेकर यांना ज्यांनी सर्वाधिक साथ दिली त्यांच्यासाठी विटेकर आग्रही राहतील असे बोलले जात आहे विधान परिषदेवर कोण जाईल हे काही दिवसात दिसून येणार आहे

## उसाने भरलेल्या ट्रॉली पडल्याने महिलेचा मृत्यू

### - मुदगल शिवारातील घटना

**पाथरी,/प्रतिनिधी-** उसाने भरलेल्या ट्रॉली मधील उसाची मोळी दुचाकीच्या हँडलवर पडल्यानंतर झालेल्या दुर्घटनेमध्ये ट्रालीच्या चाकाखाली आलेल्या दुचाकीवरील चाळीस वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सायंकाळी तालुक्यातील मुदगल शिवारामध्ये घडली आहे .
पाथरी तालुक्यातील मुदगल शिवारामध्ये सोमवार २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास ट्रॅक्टर क्रमांक एमएच ४४ सी २०३३ मुदगलच्या दिशेने उसाने भरलेल्या दोन ट्रॉल्या घेऊन जात होते .यावेळी पाथरीच्या दिशेने दुचाकी क्रं एमएच २२ एजी ३४२३ वर दुचाकीस्वार व पाठीमागील बाजूस महिला बसून येत होती .मुदगल शिवारातील एका शेत आखाड्याजवळ ट्रॉली मधील उसाची मोळी अचानक खाली खोसळून बाजूने जात असलेल्या दुचाकीच्या हँडलवर पडल्याने यावेळी दुचाकीस्वाराचे नियंत्रण सुटत दुचाकी खाली पडली . यावेळी पाठीमागील बाजूस बसलेली महिला नंदा मंच्छींद्र काळे ( वय ४० ) रा . चाटे पिंपळगाव ता .पाथरी ट्रॉलीच्या पाठीमागील बाजूस असणाऱ्या चाकाखाली आल्या . यावेळी त्यांच्या डोक्यावरून चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला .
यावेळी घटनेची माहिती कळताच पाथरी पोलिस ठाण्यातील पोना . अशोक धस व सहकारी घटनास्थळी दाखल झाले होते . यावेळी मयत महिलेचा मृतदेह पाथरी ग्रामीण रुग्णालयामध्ये पाठवण्यात आला आहे .

## शिर्शी चारी झुडूपांच्या विळख्यात

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** माजलगाव उजव्या कालव्यावरील शिर्शी चारी पडीक पडली असून या चारीमध्ये वेड्या बाभळीसह इतर झुडपांनी दाटी केली आहे तसेच चारीच्या कडेने जाणारा रस्ता दबला असल्यामुळे काँक्रीटचे गाळेही ये-जा करणाऱ्या वाहनांमुळे फुटून गेले आहेत. याकडे पाटबंधारे विभागाने तात्काळ लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.



माजलगाव धरणाच्या उजव्या कालव्यावरून सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे सिंचन करणारी शिर्शी चारी सध्या मरण अवस्थेत आहे. यावेळी परतीच्या पावसाने माजलगाव धरणामधील पाणी पातळीत वाढ केली असून, गहू, ज्वारी, हरभरा, भुईमू आधी रब्बी पिकांसाठी या चारीतून पाणी सोडण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. परंतु सदरची चारी नादुरुस्त असल्यामुळे पाटाच्या पाण्याचा अपव्य होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेक ठिकाणी काँग्रेसचे गाळे फुटले असून मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत त्या भेगांमध्ये झडपे वाढले आहेत तर कॅनलच्या मधोमध सुद्धा वेड्या बाभळी सारख्या निरनिराळ्या झुडपांनी गर्दी केली आहे.धारडिघोळ माळावरचे गेट तुटले असून तेथून सारखा पाण्याचा विसर्ग ओढ्यामध्ये सुरू राहतो. व ते पाणी वाया जाते. असे फुटलेले गेट बंद करून दुरुस्ती करण्याची गरज आहे.तसेच कॅनॉलच्या कडेवरुन असलेला रस्ता अनेक ठिकाणी दबला असून त्यावरील मुरुमाची पावसामुळे झीज झाली आहे. वाहने वागून रस्ता दाबल्यामुळे काँक्रीटचे गाळे फुटून नुकसान होत आहे. सदरील विभागाकडून यापूर्वी अनेक वेळा या चारीची डागडुजी करून लाखो रुपयांचे बिलं उचलण्यात आली. परंतु काम मात्र अतिशय निकृष्ट दर्जाची केले जात आहे पाटबंधारे विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष घालून कॅनल मधील झुडपे काढून टाकावीत. तसेच कडेवर असलेल्या रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये मुरूम भरून फुटलेले काँक्रीटचे गाळे दुरुस्ती करण्यात यावीत अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

### रेल्वे स्थानकावरील सरकता जीना अखेर सुरू झाला

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील रेल्वे स्थानकावरील सरकता जीना अखेर कार्यान्वित करण्यात आला असून त्यामुळे बालवृध्दांसह रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.
येथील रेल्वे स्थानकावरील सर्वात जूना दादरा वाहतूकीसाठी बंद करण्यात आला होता. त्यामुळे अबालवृध्दांसह महिला व लहान मुलांना प्लॅटफॉर्म क्रमांक दोन व तीन गाठण्याकरीता मोठ्या कसरतील कराव्या लागू लागल्या होत्या. स्थानकावरील सरकता जीना तात्काळ कार्यान्वित करावा, अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. अखेर त्यास उशीरा का होईना मुहूर्त लागला. दरम्यान, आनंद नगर परिसराच्या बाजूने जूना दादरा पाडण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. यावेळी प्रवाशी वर्गात आनंद दिसून आला होता.




**जिंतूर सेलु विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे व पोलीस उपायुक्त श्री दीपक जी साकोरे यांचा जिंतूर सेलु विधानसभा मतदारसंघावर दुसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना सुनीलजी भोबे पाटील व अभिजीत पारवे दिसत आहे.**

## मानवत व्यापारपेठेत पांढऱ्या सोन्याची व्यापाऱ्यांनी चालविली लुट; शेतकऱ्यांमधून होतोय संताप



**मानवत/ प्रतिनिधी-** मानवत तालूक्याला कापसाचे कोठार समजल्या जात असल्यामूळे राज्यात नव्हे एवढ्या जिनिंग व प्रेसिंग एका मानवत तालूक्यात आहे, मानवत व्यापार पेठेत शेतकऱ्यांच्या मालाचे रोखदाम मिळत असल्याने शेतकरी मानवत व्यापार पेठेला पहिली पसंदी देतो पण यंदा शासकीय खरेदी बरोबर खाजगी व्यापारी वर्गाने कमी भावात कापसाची खरेदी सूरू केल्यामूळे शेतकऱ्यांची लूट केल्या जात असल्यामूळे शेतकऱ्यामधून संताप व्यक्त करीत आहे.

सध्या तालूक्यात कापसाचे उत्पादन चांगले झाले असून खर्च पण अधिक झाला आहे, शेतकऱ्यांचे पांढऱ्या सोन्याला अधिक भाव मिळेल अशा आशेवर शेतकरी तग धरून उभा राहिला आहे. मानवत तालूक्यात मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादक तालूका म्हणून राज्यात ओखला जातो. त्या बरोबर मानवत व्यापार पेठेत शेतकऱ्यांच्या मालाचे रोख पैसे देण्याची मानवत कृषि उत्पन्न बाजार समितीचे युवा सभापती पंकज जाधव, आंबेगावकर यांनी व्यापाऱ्यांना पायंडा घालून दिला असल्यामूळे शेतकऱ्यांना मालाचे दाम पण नगदी व वेळेवर मिळत असल्यामूळे मानवत व्यापार पेठेला शेतकरी पहिली पसंदी देतो व आपला माल मानवत व्यापार पेठेत विक्रीसाठी आणतो पण पहिल्याच मालाला भाव कमी मिळत असल्यामूळे मानवत व्यापार पेठेत शेतकऱ्यांची उघड्या डोळ्याने लूट सूरू असल्यामूळे शेतकऱ्यामधून व्यापाऱ्या विषयी संताप व्यक्त होत आहे. शासकीय खरेदीदार पण यास हातभार लावत असल्यामूळे खाजगी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना कोंडीत पकडून पांढऱ्या सोन्याला कमी भावाने खरेदी सूरू केल्याने शेतकऱ्याची लूट होत आहे. शेतकऱ्यांची होणारी लूट थांबऊन चांगला भाव द्यावा अशी मागणी मानवत तालूक्यातील शेतकऱ्यामधून होत आहे.


CCI कापुस भाव 7521
सातबारा वर पिक पेरा कापूस असावा.
पाच दिवसात पेमेंट भेटत आहे
ज्याच्या नावावर घालायचे तो व्यक्ती स्वतः हजर असावा.
मार्केटमध्ये सध्या खूप लूट सुरू आहे त्यामुळे सीसीआयला कापूस जलाशक्य आहे त्यांनी घालावा.
7:14 pm
Forwarded
7:14 pm

### कमलाबाई मानवतकर यांचे निधन



**सेलू,/ प्रतिनिधी-** येथील डॉक्टर डॉ.अविनाश मानवतकर यांच्या मातोश्री श्रीमती कमलाबाई वामनराव मानवतकर (९२)यांचे शनिवार २३ नोव्हेंबर मध्यरात्री साडेबाराच्या दरम्यान निधन झाले. त्यांच्यावर सेलू येथील तहसील कार्यालय जवळील स्मशान भूमीत सकाळी ११ वाजता अंत्यासंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, जावई, सुना ,नातवंडे,पतवंडे असा मोठा परिवार आहे. जुन्या काळातील शिक्षक वामनराव मानवतकर यांच्या त्या पती होत. पंचक्रोशीत त्यांचा स्वभाव अंत्यत मनमिळावू होता. तसेच त्यांच्या जाण्याने मानवतकर यांच्या कूटूंबियांत मोठा शुकशूकाट झाला असून मोठी पोकळी निर्माण झाली असेही कूटूंबियांनी सांगितले.

# आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची मंत्रीपदी वर्णी लागल्यास विकास

## श्री संत नामदेव महाराज मंदिरात भाजप पदाधिकाऱ्यांकडून महापूजा



**विजय गुंडेकर**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे हे तिसऱ्यांदा विधानसभेवर निवडून गेले आहेत. मागील दहा वर्षात त्यांनी हिंगोली विधानसभेत ५ हजार कोटींचा निधी आणून विकासाची मोठी कामे केली आहेत. परंतु यावेळी त्यांना मंत्रीपद आणि पालकमंत्री पद मिळाल्यास याहीपेक्षा जलदगतीने जिल्ह्याचा विकास होईल अशी सामान्य कार्यकर्त्यांची भावना असून तान्हाजी मुटकुळे यांना मंत्रीपद मिळावे यासाठी श्री संत नामदेव महाराज मंदिरात भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी महापूजा केली आहे.

हिंगोली जिल्हा हा मागास जिल्हा असून या जिल्ह्याला अद्याप मंत्रीपद न मिळाल्याने जिल्ह्याचा विकास खुंटला आहे. जिल्ह्यात तीन विधानसभा मतदारसंघ असून हा जिल्हा शैक्षणिक, औद्योगिक तसेच इतर दृष्टीकोनातून उपेक्षितच राहीला आहे. या जिल्ह्याचा विकास करण्यासाठी तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासारख्या सर्वसमावेशक आणि विकासप्रिय अशा नेतृत्वाची गरज आहे. मागील दहा वर्षाच्या कालावधीत तान्हाजीराव मुटकुळे यांनी विविध माध्यमातून जिल्ह्यासाठी ५ हजार कोटींचा निधी आणला. या निधीतून मतदारसंघात रस्ते, वीज तसेच गावोगावी सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे या भागात सिंचनाची नितांत गरज आहे यासाठी मागील दहा वर्षापासून राज्यपालापासून ते मंत्री तसेच मंत्रालयापर्यंत तान्हाजीराव मुटकुळे यांनी पाठपुरावा करून सिंचनाचा अनुशेष वेगळा करीत हिंगोली जिल्ह्यात सिंचनाची कामे सुरू केली आहेत. कयाधू नदीवर बंधारे तान्हाजीराव मुटकुळे यांच्याच काळात झाली आहेत. त्यामुळे विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना त्याचा चांगला फायदा होत असून अजूनही सिंचनाची कामे बाकी आहेत. ही कामे करण्यासाठी तान्हाजीराव मुटकुळे यांना मंत्रीपद मिळाल्यास निश्चितच या कामांनाही गती मिळणार असून सिंचनाचा अनुशेष भरून काढण्यात मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्याचा विकास होण्यासाठी तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासारख्या संयमी आणि विकासप्रिय नेतृत्वाला या मंत्रीमंडळात संधी मिळाल्यास जिल्ह्याचा कायापालट होणार आहे. तसेच परभणी आणि नांदेड जिल्ह्यालाही याचा निश्चित फायदा होणार आहे.

यासंदर्भात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे आग्रही असून वरिष्ठापर्यंत मागणी केली जात आहे. विधानसभा निवडणुक प्रचारार्थ केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची जाहीर सभा झाली होती. या सभेत गृहमंत्री अमित शहा यांनी तान्हाजीराव माझे मित्र असून जनतेला तान्हाजी मुटकुळे यांना प्रचंड मतांनी निवडुन देण्याचे आवाहन केले होते. जनतेने तान्हाजीराव मुटकुळे यांना तिसऱ्यांदा निवडून विधानसभेवर पाठवले असून आता मंत्रीपद आणि पालकमंत्रीपद मिळावे अशी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे. यासाठी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी नर्सी येथील संत नामदेव महाराज यांच्या जन्मभूमीत संत नामदेव महाराजांची महापूजा, महाअभिषेक करीत साकडे घातले आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष माणिक लोडे, सेनगाव तालुकाध्यक्ष हिंमत राठोड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रब्बी हंगामासाठी इसापूर धरणातून तीन पाळ्या पाणी देण्यास मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

प्रतीवर्षी उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रकल्पावरील सिंचनासाठी पाण्याचे नियोजन करण्यात येते. यावर्षी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका-२०२४ ची आचारसंहिता लागू झाल्याने प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी संपन्न झाली.

या बैठकीमध्ये आगामी होणाऱ्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अधीन राहून दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या धरणातील (९६४.१० दलघमी) १०० टक्के इतक्या जिवंत पाणीसाठ्यावर आधारीत रब्बी हंगामात तीन (०३) पाणीपाळ्या व उन्हाळी हंगामात चार (०४) पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास मान्यता मिळालेली आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना व धरण जलाशय, अधिसूचित नदी-नाल्यावरील तसेच मुख्य कालव्यावरील प्रवाही व मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील हंगामी, दुहंगामी तसेच दुहंगामातील इतर उभी पिके या पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, कालव्यावरील उपसा, नदी-नाल्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास मागणी अर्ज नमुना ७, ७-अ मध्ये भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. हंगामी व दुहंगामी पिकांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर डावा कालवा व इसापूर उजवा कालवा व त्याअंतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलनाच्या प्रस्तावीत कार्यक्रमानुसार प्राप्त मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येईल. प्रकल्प क्षेत्रातील सर्व जनता व लाभधारकांनी पाणी मागणी अर्ज विहीत कालावधीत सादर करून, जलसंपदा विभागास सहकार्य करावे.

सिंचनासाठी पाण्याची गरज तसेच विहीत नमुन्यात प्राप्त मागणी अर्ज संख्या विचारात घेऊनच प्रत्यक्ष सिंचनासाठी पहिली पाणीपाळी दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ रोजी सुरू करून पुढील पाणीपाळ्या खालीलप्रमाणे सुरू करण्याचे अपेक्षित नियोजन आहे. सन २०२४-२५ च्या रब्बी हंगामासाठी तीन आवर्तनामध्ये पाणी सिंचनासाठी पाणीपाळी देण्याचे प्रस्तावित आहे. पहिले आवर्तन दि. ०१ डिसेंबर ते २२ डिसेंबर, २०२४ या कालावधीत २२ दिवस, दुसरे आवर्तन दि. १ जानेवारी ते २२ जानेवारी, २०२५ या कालावधीत २२ दिवस आणि तिसरे आवर्तन दि. १ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत २२ दिवस इसापूर उजवा व डाव्या कालव्यातून सोडण्याचे प्रस्तावित आहे. पाऊस किंवा आकस्मिक घटनांमुळे आवर्तनांच्या दिनांकात बदल होऊ शकतो. नमुना नं.७, ७-अ प्राप्त झालेल्या पाणी अर्जास खालील अटी व शर्तींचे अधीन राहुन मंजुरी देण्यात येईल.

लाभधारकांना त्यांच्याकडील संपूर्ण थकबाकी पाणीपट्टी भरावी लागेल. पिकांचे मागणी क्षेत्र २० आरच्या पटीत असावे. रब्बी हंगामी, दुहंगामी व इतर बारमाही पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, मंजूर उपसा, मंजूर जलाशय उपसा व मंजूर नदी, नाले उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे, त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात सादर करावे व अर्जासोबत उपसा सिंचन परवानगीची प्रत जोडावी. तसेच पाणी अर्जासोबत अपत्याबाबतचे प्रमाणपत्र व अल्प, अत्यल्प भूधारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकाची आहे. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच महाराष्ट्र पाटबंधारे प्रचलित नियमांचे लाभधारकांकडून उल्लंघन झाल्यास, कोणतीही आगाऊ सूचना न देता दिलेली मंजुरी रद्द करण्यात येईल व पाणीपुरवठा रद्द करण्यात येईल. सिंचन पाणीपाळी दरम्यान कालव्याची काही तुटफूट झाल्यास, त्याची दुरुस्ती झाल्यानंतरच कालव्यात पाणी सोडण्यात येईल. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी न भरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामुळे पाणी नदीनाल्यास वाया जावून ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही. शासन निर्णयातील प्रचलित दरानुसार पाणीपट्टीचे दर आकरण्यात येतील. उडाप्याच्या, अंतिम क्षेत्रास पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणी पाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टरद्वारे पाणी उपसा करणे अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे, त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसुली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे, अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही. सबंधीत प्रकल्पाच्या विभागामार्फत सर्व लाभधारकांना पाणी मिळेल या दृष्टीने पुरेपूर प्रयत्न करण्यात येत आहेत. याची संबंधित लाभधारकांनी नोंद कार्यकारी अभियंता अ. बा. जगताप यांनी केले आहे.

# श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात विनामूल्य सेवा देणाऱ्या चार महिला भाविकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**



श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिरात मागील दीड वर्षापासून राहोली बु.येथील चार महिलांनी प्रत्येक संकष्ट चतुर्थीला विनामूल्य सेवा दिल्याने त्यांचा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदीर संस्थानतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रत्येक चतुर्थीला हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. अशावेळी भाविकांना सुलभ दर्शन मिळावे यासाठी राहोली बु.येथील निर्मला अशोक नानवटे, कमल श्रीराम डोरले, पार्वती सखाराम डोरले आणि आशाबाई शिवाजीराव नानवटे या चार महिलांनी भाविकांचे स्वागत करून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे प्रत्येक भाविकांना गणपती बाप्पाचे दर्शन मिळावे यासाठी त्यांच्याकडून परिश्रम घेतले जात होते. श्री च्या पालखी उत्साहातही दहा दिवसात कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता भाविकांसाठी सदैव या चार तत्पर महिलांनी सेवा केली. त्यामुळे मंदीर संस्थानच्यावतीने या चारही महिलांना साडी, चोळी देऊन सन्मान करण्यात आला. महिलांनी दिलेल्या विनामूल्य सेवेबद्दल इतरांनीही त्यांचा आदर्श घ्यावा असे आवाहन श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदीर संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेण्याचे जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचे आवाहन

हिंगोली- केंद्रीय महिला व बालविकास मंत्री यांच्या हस्ते नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात उद्या दि. २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी बालविवाह मुक्त भारत मोहिमेचा शुभारंभ होणार आहे. या अनुषंगाने भारत सरकारच्या महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेशात ही मोहीम मोठ्या प्रमाणात यशस्वी करण्याविषयी निर्देशित केले आहे. त्यानुसार राज्यभरात जिल्ह्यातील सर्व विभाग व प्रत्येक गावात उद्या, दि. २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी शपथ/प्रतिज्ञा घेण्यात यावी व यथावकाश देण्यात येणाऱ्या लिंकवर सहभाग होईल, असे निर्देश शासन स्तरावरुन देण्यात आलेले आहेत. जिल्ह्यातील ग्रामपंचायत, निवडून आलेले प्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, आरोग्य क्षेत्रातील एएनएम, आशा, पीएचसी, सीएचसी, विधी सेवा प्राधिकरण-एसएलएसए, डीएलएसए, गृह विभागांतर्गत सर्व पोलीस स्टेशन, एडब्ल्यूडब्ल्यू, एसआरएलएम आणि एसएचजी यासह सर्व यंत्रणांनी बाल विवाह प्रतिबंधासाठी प्रतिज्ञा घ्यावी. त्याबाबतचा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्याकडे सादर करावा, असे आवाहन केले आहे.

### संविधान दिनानिमित्त गीतगायनाचा कार्यक्रम

हिंगोली- तालुक्यातील पारडा येथे संविधान दिनानिमित्त संविधान गौरव सोहळ्याचे दि २९ नोव्हेंबर शुक्रवारी आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मार्गदर्शक म्हणून दादासाहेब शेळके, उद्घाटक म्हणून मुनीर पठाण, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विजयकुमार एंगडे यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून किरण घोंगडे, आश्विनी खंदारे, सुरेखा मस्के, डॉ प्रसाद मस्के, शंकर घुगे, लक्ष्मण इसाये, धम्मपाल डोंगरदिवे, भगवान पठाडे, सिध्दार्थ इंगळे यांची उपस्थिती असणार आहे. यावेळी भव्य भीमगीतांचा कार्यक्रम विकास गायकवाड यांचा संच सादर करणार आहे. या कार्यक्रमास जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक गजानन वैद्य, अनिल दिपके तसेच समस्त पारडा येथील गावकऱ्यांनी केले आहे.

### लाच प्रकरणी जीएसटी कार्यालयातील अधिकाऱ्यास एक दिवसाची पोलीस कोठडी

हिंगोली- येथील केंद्रीय वस्तू व सेवा कर कार्यालयातील अधीक्षक मनोज मगरे यास १० हजारांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले होते. याप्रकरणी मगरे यास न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली असून मनोज मगरे याच्या छत्रपती संभाजीनगर येथील घराची पथकाने झडती घेतली असता एक कार, दोन दुचाकी, १४ तोळे सोने व ५६ हजार रूपये रोख आढळून आले आहेत.

# नारायणा इंटरनॅशनल स्कुल विरोधात बोंबाबोंब आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**



शहरातील महावीर नगरातील नारायणा इंटरनॅशनल स्कुलला मान्यता नसतांना तसेच यु-डायस क्रमांक नसतांनाही पालकांची दिशाभूल करून ही शाळा सुरू आहे. शिक्षण विभागाने शाळा बंद करण्याचे आदेश देऊनही शाळा सुरूच ठेवल्याच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांसह नागरिकांनी बोंबाबोंब आंदोलन केले.

शहरातील नारायणा इंटरनॅशनल स्कुलला कुठल्याही प्रकारची शिक्षण विभागाची मान्यता नाही तसेच या शाळेला यु-डायस क्रमांकही प्राप्त झाला नाही परंतु मागील सहा महिन्यांपासून ही शाळा सुरू आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केला. शिक्षण विभागने सदरील शाळेला दंड ठोठावत शाळा बंद करण्याचे आदेश दिले परंतु ही शाळा आजही सुरू असल्यामुळे बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय दत्तक दिनानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय दत्तक महिना निमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

नोव्हेंबर महिना हा आंतरराष्ट्रीय दत्तक महिना म्हणून साजरा करण्यात येत आहे. या आंतरराष्ट्रीय दत्तक महिन्याचा उद्देश या निमित्त जिल्ह्यातील बालगृहात प्रवेशित अनाथ, निराधार, निराश्रीत इत्यादी प्राधान्याने मोठ्या वयोगटातील बालकांना प्रतिपालकत्व या योजनेचा लाभ मिळवून देणे हा आहे.

या निमित्ताने जिल्हा बाल संरक्षण कक्ष व चाईल्ड हेल्प लाईन १०९८ कडून बालकासंदर्भात आणि बालकाशी निगडीत विविध विषयावर कार्यक्रम घेण्यात येत आहेत. तसेच जिल्ह्यात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा रुग्णालय, प्रसुतीगृह, गर्दीचे ठिकाण व बसस्थानक अशा विविध ठिकाणी भेटी देवून आंतरराष्ट्रीय दत्तक महिना निमित्त दत्तकासंदर्भात पोस्टर्स, बॅनर लावण्यात आले.

कोणतेही बालक परस्पर दत्तक देणे व घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. यासाठी ु.लरीर्‌ु.शव.सीं.ळप या संकेत स्थळावर नोंदणी करुन कायदेशीर प्रक्रिया पार पाडून दत्तक इच्छुक पालक बालकाला दत्तक घेऊ शकतात. तसेच जिल्ह्यातील कुमारी माता, विधवा माता यांना नुकतेच जन्मलेले बाळ नको असेल अशा बाळाचे सुखरुप समर्पन करण्याविषयीची तसेच बालकांचे कायदे व दत्तक प्रक्रिये संदर्भात जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे बाल संरक्षण अधिकारी (संस्थाबाह्य) जरीबखान पठाण यांनी माहिती दिली. तसेच बालहक्क सप्ताह व बालकांसाठी असलेल्या बाल संगोपन योजनेविषयीची माहिती बाल संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) गणेश मोरे व सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे यांनी दिली. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी केले आहे. यावेळी जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी, कर्मचारी व चाईल्ड हेल्प लाईन १०९८ चे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे व कर्मचारी उपस्थित होते.

# आजच सुरूवात करू या, पती-पत्नी मिळून कुटुंब नियोजनावर बोलू या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

कुटुंब कल्याण म्हणजे फक्त कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया नसून कुटुंब नियोजनाच्या विविध साधनांचा वापर करणे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवाड्याच्या निमित्ताने प्रत्येक कुटुंबाने आजच सुरुवात करून, पती-पत्नी मिळून, कुटुंब नियोजनावर बोलायला सुरुवात केली पाहिजे. पुरुषांनी स्वतःहून पुढाकार घेऊन स्वतःची नसबंदी करून, कुटुंब कल्याण कार्यक्रमास हातभार लावायला हवा.

कुटुंब नियोजन हे केंद्र शासनाचे अत्यंत महत्त्वाचे धोरण आहे. मोठ्या प्रमाणात प्रगती होऊनही कुटुंब नियोजनाची जबाबदारी बऱ्याचदा स्त्रियांनाच पार पाडावी लागते. कुटुंब नियोजनात पुरुषांच्या सहभागाला चालना देण्यासाठी पुरुष नसबंदी शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने पुरुष नसबंदी पंधरवाडा संपूर्ण जिल्ह्यात साजरा करण्यात येत आहे. कुटुंब नियोजन कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासाठी तसेच या कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग अधिक प्रयत्नशील व बळकट करण्यासाठी यावर्षी सुद्धा संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा-२०२४ हा दि. २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

पुरुष नसबंदी पंधरवाडा साजरा केल्याने पुरुष शस्त्रक्रियेबाबत समाजात जनजागृती होऊन पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेचे प्रमाण वाढविण्यास मदत होईल. हा पंधरवाडा यशस्वीपणे राबविण्याचे सूचना आरोग्य कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पुरुष नसबंदी पंधरवाडा हा दोन टप्प्यात राबविण्यात येणार आहे. पहिला टप्पा हा संपर्क आठवडा म्हणून दि. २१ ते २७ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. तर दुसरा टप्पा हा सेवा आठवडा म्हणून दि. २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया ही स्त्री नसबंदी शस्त्रक्रियेपेक्षा अत्यंत सोपी असून याकरिता रुग्णालयात भरती होण्याची आवश्यकता नसते. शस्त्रक्रियेनंतर अगदी अर्ध्या तासात पुरुष स्वतः चालू शकतो. शस्त्रक्रियेनंतर पुरुषामध्ये पूर्वीसारखाच जोम असतो. त्यावर कुठलाही विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे जास्तीत जास्त पुरुषांनी स्वतः शस्त्रक्रिया करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कैलाश शेळके यांनी केले आहे.

# दुसऱ्या दिवशीही न प च्या कामांची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ नोव्हेंबर**

नगर पालिकेच्यावतीने शहरात रस्ते विकास प्रकल्पांतर्गत कामे सुरू असून नांदेड येथील श्री गुरू गोविंदसिंग शासकीय अभियांत्रिकी येथील त्रयस्थ यंत्रणेमार्फत तिरूपती नगर भागातील हिरो होंडा शोरूम ते सोळंके यांच्या घरापर्यंत सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी यंत्रणेमार्फत कामाच्या दर्जाबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. मुख्याधिकारी अरविंद मुंढे, नगर अभियंता प्रतीक नाईक, तपासणी पथकातील अधिकारी देशमुख, गाडेकर, भगत यांची उपस्थिती होती.